
सूर योगिनीचे

# सुरोपनिषद्



डॉ. सुनील शास्त्री

महियर घराणे संगीत क्षेत्रातील एक उज्वल नाव. त्याची स्थापना करणारे महान संगीताचार्य, सुरांचे साधक अल्लाउद्दीन खान ज्यांना संगीताच्या साधकांमध्ये बाबा याच नावाने ओळखले जाते.

डॉ. सुनील शास्त्री यांनी लिहिलेल्या या पुस्तकाच्या केंद्रस्थानी आहेत. शिष्या-पुत्री माँ अन्नपूर्णा देवी आणि स्वतः बाबा अल्लाउद्दीन आणि पुस्तकाचा केंद्रभाव आहे सूरसाधानेतून समाधी व दिव्य आनंदाची अनुभूती.

डॉ. सुनील शास्त्री एक कुशल दंत चिकित्सक तर आहेतच पण त्याच बरोबर ते सुरांचे साधकही आहेत. अनेक वर्षं माँ अन्नपूर्णांकडून सतार आणि बासरी वादनाचे शिक्षण घेत आहेत. त्यांना सुरांची जाण उपजतच आहे. गुरूंकडून रीतसर शिक्षण सुरू होण्याआधीच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमामधून संगीतकार म्हणून त्यांच्या प्रतिभेचे दर्शन घडले होते.

डॉ. सुनील शास्त्री यांचे व्यक्तिमत्त्व बहुपेडी आहे. गीतेचा अभ्यास, अध्यात्मिक पुस्तकांचे वाचन, मनन, त्यांच्या तत्त्वाचे चिंतन करण्यात त्यांना विलक्षण रूची आहे. रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद ही त्यांची प्रेरणा स्थाने आहेत.

गुरुमाप्रतीचा भक्तीभाव आणि सुरसाधनेला शब्दरूप डॉ. सुनील शास्त्री यांच्यासारख्या बहुपेडी आणि इंद्रधनुषी व्यक्तिमत्त्वालाच शक्य आहे. लेखकाचा हा नम्र प्रयत्न वाचकांचे भावविश्व समृद्ध करेल तर आमच्या प्रयत्नाचे सार्थक होईल.



## सौ. ऊर्मिला राजेश आपटे

- एम. कॉम, एम.ए संस्कृत,.
  हिंदी पंडित, बी.एड्.
- गेली तीस वर्षे सतार अभ्यासक
- १५ वर्षेपूर्णवेळ हिंदी-संस्कृत शिक्षिका
- केशवसुतांच्या कवितांना संगीत-दिग्दर्शन
- 'मामु' मासिकात संस्कृतावर लेखन



# सूर योगिनीचे सुरोपनिषद्

डॉ. सुनिल शास्त्री

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# सूर योगिनीचे सुरोपनिषद्

डॉ. सुनील शास्त्री

प्रथम आवृत्ती : जानेवारी २०१४

© डॉ. सुनील शास्त्री

मराठी अनुवाद :
सौ. ऊर्मिला आपटे

प्रकाशक
रोहित अक्षर साहित्य
६ राजधन अपार्टमेंट, प्लॉट नं. ३३
श्रीराम सोसायटी, वारजे, पुणे ५८
मो. ९८२२००२५१६
rohitaksharsahitya@gmail.com

मुद्रक
युनायटेड प्रिंटर्स, पुणे
२६४ / ४ रिव्हव्यू अपार्टमेंट
शनिवार पेठ, पुणे ३०
फोन : २४४३२२८०
Email : unitedprinters@rediffmail.com

मूल्य : रु. ...........

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

## अंतरंग


मनोगत

ऋषिकुमारांबद्दल लेख

अनुवाद करताना

१) सूर तपस्विनी ००

२) “लो ये तानपुरा”

३) माँ आणि पं. रविशंकर

४) मौन यात्री शुभो

५) प्रकृती वैभिन्य

६) व्रतदीक्षा

७) सर्जक गुरु बाबा

८) संघर्षयात्रा

९) सिद्ध संगीतज्ज्ञ बाबा

१०) नित्यक्रम

११) माँ अनासक्त साधक



ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

१२) अनुभूती

१३) ‘‘यहाँ खडे खडे ही बात होगी?
या आप अंदर आने को कहोगी?’’

१४) देवता पुष्कळ... पण माता एकच

१५) पुढच्या जन्मी हेच गुरू लाभोत...

१६) इतकं प्रेम कोणासाठी?

१७) वनवास ते विद्यावास

१८) मी बरा आणि माझं सरोद बरं...

१९) ह्य तर हिमालय... ज्ञानऋषी

२०) तसं तर मला आठवत नाही

२१) ह्या तर त्याच...

२२) सान्निध्य सुरयोगिनीचं

२३) परम प्राप्तीचे प्रेरक

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# मनोगत

मा अन्नपूर्णा देवी आणि बाबा अल्लाद्दीन खान संपूर्ण जीवनभर संगीताची सघन साधना केली. सुरांशीच नातंजोडलं आणि योग साध्य करून घेतला- दोघेही सुरयोगी.

उपनिषद हा शब्द उपसर्ग आणि धातूनी बनला आहे.

उप- म्हणजे जवळ, नि-निष्ठापूर्वक आणि सद- बसणे, निष्ठापूर्वक जवळ बसणे.

दोघेही निष्ठापूर्वक सुरांपाशी बसले. सत तत्व साध्य केले. त्यांच्या समग्र जीवन तत्त्वाचेच सुरोपानिषद झाले.

मांचे शिष्य प्रसिद्ध बासरीवादक नित्यानंदजींशी बोलताना सर्व अंतःकरणच खुले झाले. इतक्यावर्षांच्या मांच्या सानिध्यासेवनातून निर्माणस झालेले सगळे भाव प्रकट झाले. नित्यानंदजी म्हणाले हे सर्व तुम्ही लिहा.

तीनचार वेळा लेखणी घेतली पण ते मागेच पडलं. अखेरीसच्या गुरुपौर्णिमेनंतर या भावनेने जोर धरला. नित्यानंदजी म्हणाले तुम्ही आत्ताच्या आत्ता लिहा मी तर काही भावनानं शब्दबद्ध केलं, पण पुढे ही यात्रा अपोआप सुरु झाली. तिने एका छोट्याशा पुस्तकाचे रूप धारण केलं. या कामात श्री. ऋषिकुमारजी पंड्या आणि नित्यानंदजी आधारस्तंभ बनून उभे राहिले.

जे मनात असेल आणि काही करण्याचा संकल्प करून केले जाते ते तर आपल्या इच्छेनुसार घडले असे होते पण जे मनातही नसते आणि तरी आपल्या कडून एखादी अज्ञात शक्ती करून घेते ते तर परमेश्वराने घडवलेलेच कर्म

लिहिता लिहिता जाणवले की मा तर संपूर्ण पाने एक तत्वनिष्ठ व्यक्तिमत्व अन्त्यांना घडवणारे बाबा अल्लाद्दीनखान त्यांच्या मागे एक प्रकाशपुंज बनून उभे आहेत.

मी कोणी साहित्यिक नाही की संगीतज्ञ ही नाही. त्ङ्कांच्ङ्का बद्दल मी कसे काङ्क लिहू शकणार? हा तर शब्दे धारण केलेला माझा भाव मी तुलसीदला प्रमाणे मा आणि बाबांच्या चरणी अर्पण करतो आहे.

सर्व ईशवरप्रेमी आणि संगीतसाधकांच्या जीवनापाथावर  प्रेरणा प्रकाश निर्माण करून शकेल तर मी परमेश्वराचा ऋणी होईन.

**डॉ. सुनील शास्त्री**

घासवाला टॉवर्स, पि. जि. सोळंकी मार्ग,

लॅमिंगटन रोड,मुंबई

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# अनुवाद करताना...

दि. २१ एप्रिल २०१३ हा दिवस माझ्यासाठी एक विशेष दिवस ठरला.

वयाच्या नवव्या वर्षापासून माझ्या आईच्या इच्छेने मी सतार शिकू लागले. लवकरच मला त्यात गती आणि रुची प्राप्त झाली. परंतु काही वर्षांनंतर पुढील अभ्यासासाठी गुरूचा शोध सुरू झाला. अनेक दिग्गजांना व अभ्यासकांना विनंती केली. त्यातच पं. कार्तिक कुमारांशी संपर्क झाला व वरील दिवशी पंडितजींचे सूरबहार वादन ऐकण्यासाठी व श्रीमती अन्नपूर्णादेवींच्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभासाठी मी मुंबई गाठली.

कार्यक्रम ऐकायचा, पुस्तक विकत घेऊन वाचायचे (कारण मी स्वत: श्रीमती अन्नपूर्णादेवीच्या मार्गदशनाखाली १९९० ते ९३ शिकत होते) असा साधा विचार ! परंतु तिथे गेल्यावर कळलं की पुस्तक गुजरातीत आहे !

आता हे वाचायचं कसं? परंतु म्हणतात ना की ''ईश्वरेच्छा बलीयसी!'' तसेच झाले. अचानक सौ. चेतना गोसावी माझ्या संपर्कात आली की जिला गुजराती उत्तम वाचता येते. तिने मला पुस्तक वाचून दाखवायला / लिहूनही द्यायला अत्यंत मोलाची मदत केली. निम्मे पुस्तक झाल्यावर दोघींच्याही काही अडचणींमुळे पुस्तकाचे काम थांबले.

पुन्हा एकदा ईश्वराने माझ्यासमोर सौ. आशा शहा या गुजराती महिलेला आणले. जिने माझ्यासाठी रोज दोन तास पुस्तक वाचून हिंदीत समजावून सांगितले व त्या बैठकीत मी ते मराठीत लिहून काढले.

हे सर्व मला खूप विलक्षण वाटले. गुजराती पुस्तकासाठी पुढाकार घेणारे आणि माताजींचे मन वळवणारे त्यांचे पती / companion पं. ऋषीकुमार पंड्याजींचे (गुजराती पुस्तक प्रकाशनापूर्वीच) दु:खद निधन झाले. मी माताजींना दुखवट्याचे पत्र लिहिले व तेथून सुरू झाला हा अनुवादाचा प्रवास...!!

लेखक व नित्यानंदजींनी अनुवादासाठी नेमलेल्या परिक्षण समितीने माझे लिखाण पसंत केले.

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

मी चेतना आणि आशा दोघींचीही अत्यंत आभारी आहे. हे मी अतिशय मनापासून म्हणते आहे कारण त्या दोघींनी गुजराती समजावून सांगायला मदत केली नसती तर हा अनुवाद होऊच शकला नसता.

ह्या पुस्तकाची 'यशोदा आई' तर चेतनाच आहे कारण एकत्र बसायला वेळ नाही ही अडचण लक्षात घेऊन काही प्रकरणे तिने मला चक्क लिहून पाठवली. शिवाय प्रकाशन व वितरणाची मोठ्ठी जबाबदारी सुद्धा समर्थपणे पेलली. हे सर्व तिने फक्त आमच्या काही महिन्यांपूर्वीच्याच ताज्या पण पक्क्या मैत्रीखातर केले हे किती विशेष!!

अनुवाद करता करता माताजींचे व्यक्तिमत्त्व आणखीन आणखीनच समजून गेले व उलगडत गेले. संस्कृतची अभ्यासक व गीतेची पाठक असल्यामुळे भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायात श्रीकृष्णाने केलेली सांख्ययोग्याचे वर्णन म्हणजे मूर्तिमंत माताजीच असे वाटून गेले.

श्लोक भगवद्गीता, अध्याय २ श्लोक ४८

योगस्थ: कुरू कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनञ्जय ।

सिध्यसिध्यो: समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥

जगाची जाणीव नाही. फक्त ईश्वर, बाबा आणि संगीत साधना !!

भगवद्गीता वाचताना अनेकवेळा माझ्या मनात विचार येत असे की असा सांख्ययोगी आत्ताच्या काळात शोधून तरी सापडेल का? परंतु माताजींचे चरित्र अनुवाद करताना आणि जाणून घेताना 'सांख्ययोगी सापडला' असेच वाटते यात शंका नाही. लिहायला व रियाजाला एक वेगळीच धार आली. ''संगीत हे अथांग सागरासारखे आहे'' या अनेक दिग्गजांनी उधृत केलेल्या वाक्याचा पुन:पुन्हा प्रत्यय येत राहिला.

२० वर्षानंतर सुद्धा अन्नपूर्णादेवींसारख्या 'सिंधू'ने माझ्यासारख्या 'बिंदू'ला लक्षात ठेवले व आशीर्वाद दिले यापेक्षा अधिक काय हवे ! म्हणूनच हा लेखन प्रवास सुकर झाला.

अन्यथा मी काही कोणी लेखिका नव्हे व संगीताची ही अगदीच लहान साधक आहे !! शाळेच्या मासिकात मुलांच्या पुस्तकात लेख लिहिण्यापलीकडे मला अनुभव नाही.

श्रीमती अन्नपूर्णादेवींचे व्यक्तिमत्त्व... अनेक वर्ष अप्रकाशित पडद्याआड राहिलेले व्यक्तिमत्त्व... श्री. सुनील शास्त्री यांच्या लेखनामुळे प्रथम गुजरातीतून पुढे आले. तसेच ते सर्वभाषिकांना वाचायला मिळावे याच विशुद्ध इच्छेमुळे, माताजींवरच्या भक्तिभावामुळे त्यांनी मला त्याचे मराठीकरण करण्यास मोठ्या मनाने परवानगी दिली आणि याकामी पं. नित्यानंतर हळदीपूर (श्रीमती अन्नपूर्णा देवींचे शिष्य, सुप्रसिद्ध बासरीवादक) यांची मोलाची मदत झाली त्याबद्दल त्या दोघांचेही मन:पूर्वक आभार !!!

पुस्तकाचे काम चालू असताना प्रुफे तपासण्यासाठी माझे पती श्री. राजेश व सौ. चेतनाचे मदतनीस

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

रवी यांची मोलाची मदत झाली त्यांचेही मन:पूर्वक आभार.

ईश्वरेच्छा... गुरुकृपा आणि माताजींसारख्या महान व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव यामुळेच पुस्तकाला आकार येऊ शकला ही देखील एक वेगळ्या प्रकारची संगीत सेवा, गुरुसेवाच आहे... ठरावी... असे वाटून गेले.

बाकी सर्व वाचकांच्या हाती !

**सौ. ऊर्मिला आपटे**

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

# सूरतपस्विनी

एक शांत, स्वस्थ, आत्मस्थ मुखमुद्रा. अनिमिष दृष्टी नखशिखान्त साधेपणा विचार-वाणी आणि वर्तनातील एकरूपता हे असं व्यक्तिमत्त्व आहे माझ्या गुरुमाँ अन्नपूर्णा देवींचं !

त्यांचं घर म्हणजे माता सरस्वतीचं मंदिर ! जिथे माता सरस्वती मूर्तीरूपात राहात नाही, पण घरातील प्रत्येक कणा-कणात... अणू... रेणूत... संगीताची शक्ती विराजित झाली आहे. ज्ञानाचं ओझं नाही... महान संगीतकार बाबा अल्लाउद्दीन खाँ साहेबांची तनया आणि लाडकी शिष्या शिवाय संगीत संस्कृतीची खरी वारसदार असल्याचा जराही अभिमान नाही.

माता सरस्वती तीच जी गुरु बाबांच्या कृपेनं मिळालेलं संगीत आणि त्या संगीतातील सूक्ष्मातिसूक्ष्म ज्ञानासाठी सदैव जागृत, आणि एकही क्षण गुरू ऋणाचं भान न सुटलेलं सजग व्यक्तिमत्त्व!

त्यांच्यासाठी संगीत हेच साधन आणि साध्य आहे आंतरिक शक्ती, शांती - पावित्र्य - ईश्वर भक्ती. त्यांच्यासाठी संगीत आणि ज्ञानशक्ती हे माता सरस्वतीला अर्पण करण्याचं अतीसुंदर पुष्प आहे, जे अत्यंत श्रद्धेने, प्रेमाने, रुजवून त्याची निगराणी आणि सांभाळ करून पूर्ण उमलल्यावर प्रभुचरणी वाहण्याची एकमेव सामग्री आहे.

अन्नपूर्णादेवी हा सांगितिक क्षेत्रातील आध्यात्मिक जीव आहे. ''संगीत के माध्यम से परमात्मा तक पहुँच सकते हैं।'' हे वाक्य त्या ज्या कोणाला सांगतात त्यांना केवळ विश्वास ठेवल्याबरोबर अनुभूतीचा नाद ऐकू आल्याशिवाय राहात नाही. आणि श्रद्धेच्या अतूट बळाचं दर्शन झाल्याशिवाय राहात नाही. असं असूनही कुणाच्याही पुढे स्वत:च्या आध्यात्मिक असल्याचं अवडंबर नाही की कुणाच्याही जातीपातीचा आडून सुद्धा निर्देश नाही.

'निष्काम कर्मयोगाचं,' जिवंत उदाहरण आहेत माँ अन्नपूर्णादेवी. स्वत:च्या साधनेनं मिळवलेली

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com 

विद्वत्ता आणि सिद्धी आणि सिद्धींमुळे मिळालेली ‘प्रसिद्धी!’ याचा स्पर्श त्यांना कुठे झालाच नाही असं वाटतं. शिष्यांनाही आपली ज्ञानसंपदा वाटताना त्या संपूर्ण काळजीने आणि ओतप्रोत देतात. पण एकदा देऊन झाली की मग पूर्ण अलिप्तता ! विलक्षण व्यक्तिमत्त्व ! शिष्यांकडून कसलीच अपेक्षा नाही. शिष्यांनी त्यांचं ऋण मानो की नाही, त्यांचं नाव कोणी घेवो की न घेवो याची कसलीच पर्वा नाही. प्रसिद्ध बासरीवादक ‘श्री नित्यानंद हळदीपूर’ हे माँचे शिष्य ! एकदा त्यांच्या मैफिलिमध्ये स्वत:च्या प्रस्तुतीकरणावर ते नाखूष होते. खरा कलाकार स्वत:च्या प्रस्तुतीवर क्वचितच खूष होतो. ते माँना ही त्यांची भावना सांगत होते. माँ शांतपणे म्हणाल्या, ‘‘आप बाबा पर छोड दीजिए। कैसा ? क्या च क्यों? इसकी चिंता मत करों।’’ आपल्या शिष्याच्या सादरीकरणाबद्दल कोणताही विषाद नाही. आपल्या नावाचं काय? असा विचार कदापी नाही.

एखादा योगी भक्त ज्याप्रमाणे जपयज्ञाची साधना हातात जपमाळ घेऊन करतो त्याप्रमाणे सूरबहार हेच माँ अन्नपूर्णादेवींसाठी जपमाला रूपाने मिळालेलं साधन आहे. माता सरस्वतीचे जप-नाम-स्मरण स्वरमंत्राच्या गुंजनाने होते. रागाचा पहिला स्वर आणि शेवटचा स्वर हेच त्या जपमाळेचे मेरूमणी होते.

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

दृष्टीमधुनी प्रीत पाझरे ओठांमधुनी स्मित !



मॉं. अन्नपूर्णादेवी

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# लो, ये तानपुरा !

माँ अन्नपूर्णा देवींचा जन्म चैत्र शुद्ध पौर्णिमा हनुमान जयंती, २३ एप्रिल १९२६ मध्ये महियर मध्ये झाला. त्या दिवसांमध्ये बाबा अल्लाउद्दिनखाँ स्व. पं. रविशंकरजी चे थोरले बंधू आणि नृत्यदिग्दर्शक स्व. उदयशंकरजींच्या नृत्यवृंदासह युरोपच्या दौऱ्यावर गेले होते. माँ अन्नपूर्णा देवींच्या आईंचे नाव मदीना बेगम होते. महियरचे राजे ब्रिजनाथ सिंहांचे बाबा गुरू होते आणि राजदरबारातील संगीतकार होते. मुलीच्या जन्माची बातमी राजाजींना मिळाली. बाबा तेव्हा हजर नव्हते. महाराजांच्या इच्छेने मुलीचे नाव अन्नपूर्णा ठेवण्यात आले.

बाबा परत आल्यानंतर त्यांनी मौलवीजींबरोबर सल्लामसलत केली. महाराजांनी भलेही आपल्या कन्येचे नामकरण केले असले तरी इस्लाम धर्मानुसार तिचं आपलं नाव ठेवलं पाहिजे. इस्लाम धर्मानुसार अन्नपूर्णाचं नाव ठेवण्यात आलं. 'रोशन आरा' बाबांसारख्या महान संगीतकाराच्या सहवासात अन्नपूर्णा मोठी होऊ लागली. बालपण सरू लागलं.

अन्नपूर्णा साधारण सात वर्षांची असेल. ठिक्करपाणी, लगोर अशा खेळात रमत असेल.

अन्नपूर्णांचा मोठा भाऊ अली अकबर खान त्या काळात बाबांकडून सरोद शिकत होता. दररोजच्या क्रमानुसार शिकलेलं अली अकबरला पक्कं करायला सांगून बाबा बाजारात जायला निघाले. अन्नपूर्णा खेळत होती. अली अकबर, शिकवलेला पाठ सरादेवर घोटत होता. अन्नपूर्णा ऐकत होती. अली अकबर जवळ जाऊन ही सात वर्षाची छोटी बहीण म्हणाली, ''बाबा ने ऐसा तो नहीं सिखाया है!'' असे म्हणून बाबांनी शिकवलेला अंश अन्नपूर्णाने गाऊन दाखवला. पण अली अकबर एकदम गप्प होता. अन्नपूर्णा मात्र गातच होती. भाऊ इतका गप्प का? हे तिलाही कळत नव्हते? काय झालं होतं?

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com 

झालं असं होतं की बाबा बाजार करायला म्हणून निघाले पण स्वत:चं पाकिट विसरले म्हणून अर्ध्या रस्त्यातून घरी परतले. त्याचवेळी बाबांनी शिकवलेला अन्नपूर्णा पाठ गाऊन दाखवून सुधारणा सांगत होती.

बाबांनी त्यांच्या मुलींना संगीत शिकायला मनाई केली होती. बाबांसारखे महान संगीत साधक काय संकुचित विचारांचे होते? स्त्रियांना ज्ञानापासून वंचित ठेवण्याच्या पक्षातले होते हेही त्याचे कारण नव्हते. परंतु बाबांच्या आयुष्यात एक विलक्षण करुण घटना घडली होती.

बाबांना एक मोठी मुलगी होती. जहान आरा तिचं नाव. तिला बाबांनी गायला शिकवलं होतं. ती फार गोड गायची. तिला सासरी पाठवताना बाबांनी तानपुरा भेट दिला होता. ज्यायोगे सासरी मुलगी संगीतापासून वंचित/दूर राहणार नाही. स्वत:ची संगीत साधना चालू ठेवू शकेल. सासरची मंडळी जुन्या विचारांची आणि रुढी परंपरांना मानणारी होती. त्यामुळे तिच्या सासरी संगीताला आणि त्यातही स्त्रीच्या संगीताला काहीच स्थान नव्हते. दुर्दैवाने बाबांनी दिलेला तानपुराही त्यांनी जाळून टाकला होता. पुढे जहान आराला जलोदर झाला आणि त्यातच तिचा दुर्दैवी अंत झाला.

मोठ्या मुलीच्या जीवनाचा असा दारुण अंत झाल्यावर बाबांनी विचार केला आणि त्यांच्या संवेदनशील मनानं ठरवलं की अन्नपूर्णेला सर्वकाही द्यायचं पण संगीतविद्या मात्र नाही. कारण हिला ही सासरी संगीतामुळे त्रास होऊ नये. बाबांचा हा निश्चय घरात सर्वांनाच माहीत होता.

सरोद वाजवायला बसलेला अली अकबर खान आणि त्याच्या समोर गोड गळ्याने बाबांचा पाठ कंठस्थ, सहजतेने म्हणणारी अन्नपूर्णा आणि पाठीमागे उभे असलेले बाबा ! मोठ्या मुलीच्या भूतकाळाने व्यथित, शिस्तीच्या बाबतीत आग्रही बाबांसमोर - अली अकबर खानचे सूर आणि शब्द गोठून गेले. पण याची जाणीव अन्नपूर्णाला कुठे होती? बाबा जेव्हा पुढे आले तेव्हा प्रसंगाचं गांभीर्य तिला कळलं. फार मोठी आगळीक घडल्याची भीती दोघा बहीणभावांच्या चेहऱ्यावर पसरली.

बाबा शांत होते. माँ सांगतात, ''मेरी चोरी पकडी और मुझे अंदर के कमरे में लेकर गए। मुझे सामने खडा रखा । मेरे हाथ में बाबा ने तानपुरा दिया । प्रेमसे पुछा ''संगीत सिखोगी?'' मी तर गप्पच होते. काय बोलू?

''लो ये तानपुरात्र'' - अन्नपूर्णा देवींची संसगीत साधना तिथपासून सुरू झाली.

मोठ्या मुलीच्या इतक्या मोठ्या शोकांतिकेने बाबा व्यथित होते. पण त्या महान संगीतज्ञाला, इतक्या लहान वयातही इतकं अवघड संगीत आत्मसात करण्याची शक्ती असलेला हा जीव ओळखू

ebook by e sahity pratishthan
 www.esahity.com

येण्यास कितीसा वेळ लागणार होता? ती ही खेळात रमणारी पोर !

महान जीवांसाठी परमात्मा अशा प्रसंगांच्या निमित्ताने काहीतरी कारण उभं करतो. काही कारणाशिवाय का ती या महापुरुषाच्या घरात जन्मली होती? बाबांनी अन्नपूर्णामध्ये असलेली ग्रहणशक्ती ओळखली. ताबडतोब पण शांत चित्ताने विचार केला आणि घरातील मुलींना संगीत न शिकवण्याचा विचार बदलला.

बाबांनी हातामध्ये तानपुरा देणं हीच अन्नपूर्णेची व्रतदीक्षा होती. मुलांचा खेळ पण विधीची करामत !

बाबांना स्वत:च्या ज्ञानासाठी उत्तराधिकारी शोधत बसावे लागणार नव्हते. परमेश्वरानेच तो त्यांना दिला होता !!

ebook by e sahity pratishthan

# माँ, आणि पंडित रविशंकर

बाबा अल्लाउद्दिन ज्या उदयशंकरांच्या बरोबर परदेश प्रवासाला गेले होते, त्याच नृत्यवृंदामध्ये रविशंकरही नर्तक होते. त्यांना स्वत:चा व्यवसाय म्हणून खरं तर नृत्यच स्वीकारायचे होते. परंतु बाबांचे अगाध संगीतज्ञान, वाद्यांवरती अद्वितीय पकड, प्रेमळ, निष्ठावान आणि सरळ व्यक्तिमत्त्व या साऱ्याच्या प्रभावामुळे ते वाद्यवादनाकडे आकर्षित झाले. खूप विचार करून त्यांनी बाबांकडे संगीत शिकायचे ठरवले. पण बाबांकडे संगीत शिकण्यासाठी दिवसरात्र गुरूगृही राहणे आवश्यक होते. कडक शिस्तीच्या बाबांना शिष्यांकडून अत्यंत संयमी आणि समर्पित जीवनाची अपेक्षा होती. त्यासाठी महियर येथेच राहणे आवश्यक होते. संपूर्णपणे बाबांना समर्पित केलेला शिष्यकाळ व्यतीत करणे आवश्यक होते. पं. रविशंकरांनी ते स्वीकारले. महियरला आले. विदेशातील सर्व सुखसोयींचा त्याग केला. बाबांच्या इच्छेनुसार राहिले. बाबांनी सुद्धा पंडितजींना उदयशंकरांची ठेव समजून पुत्रवान प्रेमपूर्वक सांभाळ केला, आणि शिकवले. पंडितजी सात वर्षे बाबांजवळ राहिले. दिवसरात्र केवळ संगीत संगीत आणि संगीत! अविरत साधना !

या काळात एक घटना घटली. बाबा पंडितजींना 'कृंतन' - सतार किंवा सरोदवर वाजवण्याच्या स्वरसमूहाचे एक तंत्र- वाजवण्याची पद्धती शिकवत होते. पंडितजींना काही ते येत नव्हतं. बाबांनी पुष्कळ प्रयत्न केले पण व्यर्थ! अगदी सुरवातीचे दिवस होते ते. बाबा रागावले आणि म्हणाले की एवढंही येत नाही तर जा बाजारातून बांगड्या आण आणि भर हातात.

पंडितजी बाबांना न सांगताच निघाले... महियर स्टेशनवर... महियर सोडण्यासाठी...

बाबांना ही बातमी समजली. त्यांना फारच वाईट वाटले. मी असे शब्द बोलायला नको होते असे वाटून ते दु:खी झाले. अली अकबर खानला ही गोष्ट समजली. खानसाहेब स्टेशनवर पोहोचले. पंडितजींना समजावण्याचा प्रयत्न केला पण पंडितजी काहीच ऐकायला तयार नव्हते.

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

अली अकबर खान त्यांना म्हणाले ‘‘अरे ही गोष्ट त्यांनी तुझ्या हितासाठी, ज्ञानासाठी बोलली. बाबांचा राग तुला माहीतच आहे. तू परत चल. बाबा खूप दु:खी झाले आहेत.’’

रविशंकरांनी ते मान्य केले. परत आले. घरी आले तर बाबा त्यांचा फोटो साफ करून भिंतीवर लावत होते... डोळ्यांत पाणी होते... रविशंकरने हे बघून बाबांना नमस्कार घातला.

असे आहेत भारतीय गुरुशिष्य परंपरेचे भावबंध ! क्रोध आणि व्यथांची अभिव्यक्ती! विद्वान गुरू स्वत:च्या शिष्यांवर रागावतात आणि त्यांच्यासाठी अश्रू गाळतात. शिष्याच्या हितांसाठीच बोललेल्या कठोर शब्दांवर स्वत:च स्वत:ला दोष देऊन व्यथित होतात.

बाबांकडून मिळालेले संस्कार, संगीतातील प्रावीण्य आणि अत्यंत सुशील वर्तन असलेल्या अन्नपूर्णेमुळे उदयशंकर खूप प्रभावित झाले होते. ‘रविसाठी कोणी योग्य असेल तर अन्नपूर्णाच’ अशा निष्कर्षाप्रत उदयशंकर पोचले होते. या कारणाने त्यांनी बाबांपाशी अन्नपूर्णाचा हात मागितला. हे एकाच क्षेत्रातले जीव ते संसारातही पती-पत्नी म्हणून एकत्र राहिले तर प्रवास सुखकर आणि प्रगतीमय होईल. अशी त्यांची भावना. बाबांना संकोच वाटत होता- कुठे हे शंकर - ब्राह्मण कुळातले आणि कुठे इस्लामधर्मी आपण! पण उदयशंकर गुणपूजक होते. त्यांना जातिभेद वाटत नव्हता. म्हणूनच ते स्वत:च्या निर्णयावर अटल होते. बाबांनाही उदयशंकर बद्दल आदर व प्रेम होते. त्यांनी त्यांच्या मागणीचा स्वीकार केला. बाबांची नम्रता आणि सालसता त्यांच्या शब्दातून प्रगट होते. ‘‘मी भाग्यवान! मला ब्राह्मण जावई मिळाला.’’

माँ अन्नपूर्णा आणि रवीशंकर यांचा विवाह हा काही प्रेमविवाह नव्हता. अत्यंत मर्यादशील वातावरणात वडिलधाऱ्यांची मान्यता मिळवून ठरविलेला विवाह संबंध होता तो. बाबांची रीत अशी होती की जोवर हा संबंध नक्की होत नाही तोवर स्वतंत्र घरात पंडितजी राहात होते. जेव्हा वडिलधाऱ्यांकडून दोघांना जीवनसाथी होण्याची परवानगी मिळाली तेव्हाच दोघांना एकत्र शिकायला बसता येऊ लागले.

पं. रविशंकर, मा
अन्नपूर्णादेवी आणि
बाल शुभेन्द्र





उस्ताद अली अकबर खानसाहेब
शारदा मंदिर, महियर

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

# मौन यात्री शुभो

पंडित रविशंकरांबरोबर विवाहानंतर माँ अन्नपूर्णादेवींनी दि. ३० मार्च १९४२ या दिवशी एका पुत्रास जन्म दिला. नाव ठेवण्यात आलं शुभेन्द्र - ज्याला सगळे लाडाने शुभो म्हणत. दोन्ही महान कलाकारांच्या पोटी जन्मलेला शुभो कलेची जाण उपजत घेऊन आला होता. बाबांकडून सरोद शिकण्याचं भाग्य त्याला लाभलं पुढे त्याचं सूरसिंगार शिकावं अशी बाबांची इच्छा होती.

कालांतराने त्याने पंडितजींच्या इच्छेनुसार सतार आपलीशी केली. पंडितजी आणि माँ विभक्त झाल्यावर शुभेन्द्र माँ पाशीच होता. माँ नी त्याच्याकडून सतारीची साधना करून घेतली आणि त्याच्यातल्या कलाकाराला सुंदर रीतीने घडविले. बालपणापासूनच शुभेन्द्रला पेंटिंगचा फार शौक होता. त्याने जे जे स्कूल ऑफ आर्ट्स मधून कमर्शिअल आर्टिस्टची पदवी मिळवली.

असं सांगितलं जातं की या काळात एकदा पंडितजी एका रेकॉर्डिंग स्टुडिओ मध्ये रेकॉर्डिंगसाठी गेले होते तिथे त्यांनी सतार ऐकली. फारच प्रभावित झाले. रेकॉर्डिस्ट त्या विचारलं ''कोण वाजवतंय?'' वाटतोय तर आमच्याच घराण्याचा पण प. निखिल बॅनर्जी पण नाही वाटत. रेकॉर्डिस्ट हसायला लागला आणि म्हणाला, ''का आमची चेष्टा करता?'' पण पंडितजी गंभीर होते. रेकॉर्डिस्ट म्हणाला, ''अहो आपलाच मुलगा आहे! शुभो शंकर!'

तो किती उंचीचा कलाकार होता हे यावरून कळते. इतकी तालीम मिळालेल्या शुभोनी १९७१ मध्ये अचानक माताजींकडून पंडितजींकडे जायचं नक्की केलं आणि घर सोडलं. या पुत्रवियोगानं माँना अतिशय विषाद झाला. त्यांना वाटत होतं की शुभोनं आणखी तीन वर्ष सतारीचं शिक्षण घेतलं तर तो खूप चांगल्या दर्जाचं ज्ञान मिळवू शकेल.

शुभो पंडितजींकडे अमेरिकेत गेला. तो ऑटिस आर्ट इन्स्टिट्यूटमध्ये कमर्शिअल आर्टिस्ट

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

झाला. सतार चालू होतीच. न्यूयॉर्कच्या कार्नेजी हॉलमध्ये त्यानं पंडितजींबरोबर वादन केलं. त्या कॉन्सर्टचं नाव होतं Father and Sons उ. उल्लारखाँ आणि उ. झाकिर हुसेन यांनीही या कॉन्सर्टमध्ये वादन केलं होतं म्हणून या मैफिलीचं नाव असं देण्यात आलं होतं.

त्यांच्या आयुष्याचा मोठा काळ त्यानं कमर्शियल आर्टिस्ट म्हणून काम केलं वीस वर्ष त्यांनी माँ शी भेट झाली नव्हती. १९९१ मध्ये ते भारतात आले तेव्हा माँना भेटायला गेले. असं सांगतात की ती फारच भावोत्कट भेट होती. माँची परवानगी मागितली. ''मला पुन्हा सतार शिकायची आहे शिकवशील ना?''

माँ म्हणाल्या, ''का नाही? तू तर माझाच मुलगा आहेस.'' पण विधीला/नियतीला ते मान्य नव्हतं. ना तो परत येऊ शकला ना माँकडून सतार शिकू शकला.

१९९२ ला १५ सप्टेंबरला न्युमोनियानं लॉस एंजेल्समध्ये त्यांच देहावसान झालं. माँचा एकमात्र नाळसंबंध संपुष्टात आला. त्यांच्या मृत्यूची बातमी ज्या दिवशी आली त्यावेळी मला शिकण्यासाठी जायचं होतं. मला ऋषीभाईंनी ही वार्ता दिली. मी माँना भेटायला गेलो. त्या खूप दु:खात होत्या. मी माझ्या आयुष्यात माँच्या डोळ्यात पाणी बघितले नव्हते. माझे स्वत:चे दोन भाऊ लहान वयात मृत्यू पावले होते. माँना हे माहीत होते. अश्रुभरल्या डोळ्यांनी माँ म्हणाल्या, ''ऐसे समय माँ का दु:ख कौन समझेगा? आपकी माँ को पता होगा जो माँ होती है उसे ही पता चलेगा गा।''

माझ्याजवळ सांत्वनासाठी केवळ मौन होते.

# प्रकृती वैभिन्य

दिव्य वृत्ती घेऊन आलेल्या आणि मनुष्य जीवनात ज्या गुणांच्या विकासाच्या परिसीमेला पोचतात अशा व्यक्ती हे गुण जन्मजात धारण करून आलेल्या असतात आणि त्यांचा स्वभाव लहानपणापासून वेगळा असतो. जिथे धैर्य, त्याग, ध्येयनिष्ठा आणि पावित्र्य यासारख्या गुणांचा समन्वय होतो तिथे प्रामाणिक कर्मयोग आणि परंपरांचा सन्मान होतो. भौतिक सुखाबाबत वैराग्य ही सहजच होत असतं; शिवाय हे वैराग्य, 'कोल्ह्याला द्राक्षं आंबट' अशा तऱ्हेने निर्माण होत नाही पण प्रतिष्ठेसाठी कोणताही मोह अंत:करणात उत्पन्न होत नाही ही सत्य गोष्ट आहे.

याच कारणाने माताजी कुठल्याच सांसारिक सफलतेकडे आकृष्ट झाल्या नाहीत. याच कारणाने बाबांच्या साधनेची फलश्रुती रूप संगीतविज्ञान देण्याचा निर्धार बाबांनी माताजींसाठी केला. या विद्येचे अधिकारित्व मिळण्यासाठी गांभीर्य, पावित्र्य, अलोभ आणि अनासक्ती सारख्या गुणांचा ज्या जीवामध्ये सहज विकास होतो तोच त्या अधिकाराला प्राप्त होतो. बाबांनी माताजींना सांगितलं की सूरबहार वर वाजणारं संगीत जनसामान्य नापसंत करतील कदाचित, त्याची अवहेलनाही करतील पण गुणीजन मात्र हे समजतील त्याचा रसिकतेनं आस्वाद घेतील आणि मनापासून प्रशंसाही करतील. हे जगदीश्वरासाठीचं संगीत आहे जगासाठी आहे. केवळ बाह्य कर्णानं हे ऐकायचं नाही तर अंत:करणानं त्याची पूजा करायची असते. हे शरीराला बांधणारं नाही तर शंकराशी जोडणारं आहे. हा स्वभाव माताजींसाठी प्रयत्नसाध्य नव्हता तर ही त्यांची जन्मजात प्रकृती आहे.

पंडित रविशंकरांनी त्याच माताजींबद्दल खूप लिहिलय.त्या गोष्टींमध्ये तिखट मीठ लावलेली रसिकता अथवा निंदा वृत्तीचेच पोषण दिसते. सामान्य माणसांची इतरांच्या आयुष्यात विनाकारण नाक खुपसण्याची व क्षणिक आनंद मिळवण्याचीच वृत्ती लक्षात येते. पण या दोन्ही व्यक्तींना एकत्र

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

न राहण्याचं कारण काय? त्यावर दृष्टिक्षेप टाकला तर या क्षुद्र गोष्टी बघण्याची इच्छाच होत नाही. विसंवाद किंवा विच्छेद घडला. त्यावेळी काय झाले यापेक्षा तसे का घडले हे महत्त्वाचे आहे.

दोघांचीही मूळ प्रकृती भिन्न होती.

संगीतावरील दोघांचे आत्यांतिक प्रेम, दोघांचा कर्मठपणा, मेहनती स्वभाव, समान गुरू आणि दोघांचीही निस्सिम गुरुभक्ती हे दोघांमध्ये समान गुण.

असमानता मुख्यत्वे ही की माताजींची अंतर्मुख प्रतिभा आणि पंडितजींचे पूर्णतया बहिर्मुख व्यक्तिमत्त्व.

माताजी भारतीय विचार आणि आदर्शांच्या भोक्त्या तर पंडितजींवर पाश्चात्त्य शैलीचा रंग. बाबांचे मूल सूत्र होते ''एक साधे सब सधे'' - माताजी या सूत्रानुसार चालणाऱ्या, तर पंडितजींचं वैविध्यात रमणारं मन, बाकी सर्व गोष्टीत हे एकवेळ ठीकही असेल पण स्त्री-पुरुष संबंधांमध्ये वृत्तीची ही चंचलता सिद्ध झाली.

या काळात बाबा अल्लाउद्दिन खाँ एक समर्थ संगीतज्ज्ञ संतव्यक्ती आणि उत्तम पथदर्शक गुरू म्हणून ख्याती पावले होते. ''अशा या व्यक्तीचे संगीत खऱ्या अर्थानं कोणी आत्मस्थ केले?'' असा प्रश्न जेव्हा आमीरखान साहेबांचे शिष्य राजीव बोरा यांनी त्यांना केला तेव्हा खानसाहेब म्हणाले ''अली अकबर खाँनसारखा परफॉर्मिंग आर्टिस्ट नाही आणि बाबा अल्लाउद्दिन खाँनच्या संगीताच्या जवळपास कोणी असेल तर त्या अन्नपूर्णादेवी आहेत.'' ''तर मग रविशंकरांचे काय?'' खानसाहेब म्हणाले ''खरा पण दूर'' खानसाहेबांनी तर टक्केवारी पण दिली होती पण ही गणितं केवळ मोठे संगीतकारच समजू जाणे. इथे महत्त्वाचा मुद्दा असा की गुणीजनांमध्येही अन्नपूर्णेला स्वतंत्र्य प्रतिष्ठेचं स्थान होतं. असं सांगितलं जातं की पंडितजींबरोबर केलेल्या कार्यक्रमात सुद्धा माँच्या संगीत प्रतिभेची प्रशंसा होत असे.

पुरुषप्रधान समाजात बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या व्यक्तीच्या अहंकाराचा प्रश्न हा अत्यंत संवेदनशील मुद्दा विवाहाच्या स्थैर्यासाठी फार महत्त्वाचा असतो.

माताजींसाठी प्रयत्नसाध्य प्रसिद्धीपेक्षा गुरुंचा प्रसाद रूपाने मिळालेला संतोष अती महत्त्वाचा होता. प्रापंचिक यश आणि वाह-वाह यांसाठी वैवाहिक जीवनाच्या स्थिरतेची किंमत फार जास्त होती. स्वत:चा संसार सांभाळण्यासाठी माताजींनी बाहेर न वाजवण्याचा निर्णय घेतला. बाबा आणि सरस्वतीच्या प्रतिमेसमोर स्वत:चा हा निर्णय जाहीर केला.

पण पुरुषाच्या चंचल वृत्तीचे काय? पंडितजींनी स्वत:च्या भ्रमरवृत्तीचा जाहिरपणे आत्मवृत्तांमध्ये, मुलाखतींमध्ये अनेकवेळा स्वीकार केला आहे. जी व्यक्ती काया-वाचा-मनाने भारतीय विवाहाच्या आदर्शांना मानते ती याच्या विपरित असलेल्या केवळ बाह्यसुखासाठी असलेल्या

रस-रंगाने भरपूर जीवन कसं मान्य करू शकेल? माताजींना पंडितजींचा हा स्वभाव जराही मान्य नव्हता.

दैवयोगाने या दोन्ही व्यक्ती, महान व्यक्ती, एकत्र जीवन व्यतीत करू शकल्या नाहीत पण शिष्यांपाशी माताजी नेहमीच पण्डितजींची प्रशंसा करीत.

महियर/महियर घराण्याचे आधारस्तंभ आणि विश्वविख्यात कलाकार म्हणून त्यांच्याकडे माताजी कायम सन्मानानेच पाहतात. पडिंतजींच्या गुरुभक्तीची कायम स्तुतीच करतात. संगीतावरची निष्ठा त्यासाठी केलेला त्याग आणि तप संगीताच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरक समजला जातो.

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# व्रतदीक्षा


बाबा अल्लाउद्दिन खान - संगीतातले ऋषी, महान साधक आणि माता शारदेचे भक्त. माता शारदेच्या कृपेने बाबा सिद्ध झाले. संगीताच्या क्षेत्रामध्ये आदर, सन्मान व पूजनीयता त्यांनी कमावली. त्यांचे अनेक शिष्य संगीत क्षेत्रामध्ये विविध वाद्यांचे प्रतिभावंत कलाकार झाले. जगप्रसिद्ध झाले. बाबा गुरूंचेही गुरू होते. (Master always creates Masters.)

बाबा स्वत: २८-२९ वाद्ये वाजवीत. त्यामुळेच शिष्यांना त्यांची आवड आणि प्रकृती ओळखून त्यांनी वेगवेगळी वाद्ये शिकवली. त्या वाद्यातून शिष्यांची प्रकृती अभिव्यक्त होईल असे संगीत त्यांनी शिष्यांना शिकवले. त्यांनी उस्ताद अली अकबर खाँना सरोद, पं. रविशंकरांना - सतार, पं. पन्नालाल घोषांना - बासरी, पं. निखिल बॅनर्जीना सतार आणि माँ अन्नपूर्णादेवींसाठी - सूरबहार -

सूरबहार या वाद्याची प्रवृत्ती गंभीर आहे. आलाप-जोड. आणि झाला हे मुख्यत्वाने यावर प्रस्तुत होतात. ज्या कलाकाराच्या स्वभावात खर्जातल्या सुरांचे गांभीर्य आणि रागाच्या शांत स्वरूपाचा भाव नसतो तो कलाकार सूरबहार आणि त्यातून उमटणारं संगीत- दोन्हीलाही न्याय देऊ शकत नाही.

सतारीपेक्षा मोठ्या आकाराचे, मंद्र सप्तकाच्या सुरांचे हे वाद्य आहे. जर कलाकाराची त्यावर उत्तम पकड असेल तर श्रोत्यांनाही अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करणारे हे वाद्य आहे. - माताजींची पूर्ण व्यक्तिरेखा बघितली तर असं लक्षात येतं की संगीताप्रती दैवी साधकत्व भाव त्यांनी बालपणीच आत्मसात केला होता. संगीत साधेनबद्दल खूप वेगळाच दृष्टिकोन त्यांचा होता. त्यामुळेच संगीत समुद्रात खोल बुडी मारून प्राप्त केलेल्या बाबांच्या दैवी संगीताच्या खऱ्या वारसदार अन्नपूर्णादेवीच दिसतात.

तू निर्लोभी अनासक्त तू सत्यनिष्ठ अधिकारी
शुद्धस्वरूपी संगीतसाधक, जीवनतत्त्व झळाळे ।



मा अन्नपूर्णादेवींकडून सूरबहारवर संगीत साधना करून घेणारे बाबा

जीवनात कोणत्याही क्षणी बाबांच्या या व्रताचा माँनी भंग केला नाही. आपल्या गुरुंच्या संस्कारांची परंपरा कधीच अपवित्र होऊ नये व सतत उज्ज्वल राहावी असाच कायम प्रयत्न माँनी केला.

भारतीय परंपरेमध्ये यज्ञेपवित संस्कारांचे एक वेगळेच महत्त्व/स्थान आहे. गुरु स्वत:च्या शिष्याला दीक्षा देतो. ज्ञानाच्या परंपरेचं रक्षण करण्याची, ईश्वर सत्याकडे जाण्याची ही दीक्षा हृदयस्थ करण्याचा हा विधी असतो. त्याचा मंत्र आहे-

''मम व्रते ते हृदयं दधामि।
मम चित्तं अनुचित्तं ते अस्तु ।।
मम वाचं एकतना जुपस्व ।
बृहस्पति त्वा नियवक्तु महयम्।।''

अर्थात - मी घेतलेल्या व्रतामध्ये तुझे हृदय असो. तुझं चित्तं माझ्या चित्ताचं अनुसरण करो. माझी वाणी तू एकचित्ताने ऐकावीस. यासाठीच बृहस्पतीने तुझी निवड करून माझ्याकडे पाठवले आहे.

जेव्हा बाबांनी अन्नपूर्णादेवींना दीक्षा दिली तेव्हा त्यांनी हा मंत्र म्हटला नव्हता, परंतु एका समर्थ गुरुकडून व्रतनिष्ठ शिष्याला दिल्या जाणाऱ्या या मंत्राचे अक्षरश: पालन अन्नपूर्णादेवींनी विद्यार्जनाच्या काळातच नव्हे तर नंतरही केले.

अशा महान संगीतकारांना घडवणारे, सगळं जग ज्यांच्या कलेच्या सन्मानार्थ नतमस्तक झालं असे हे बाबा अल्लाउद्दिन कोण होते? माँचं जीवन आणि जीवनतत्त्व यांच्या मागे उभे असलेले हे व्यक्तिमत्त्व कोण होतं हे समजून घेणं आवश्यक आहे.

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com 

# सर्जक गुरू : बाबा

बाबा अल्लाउद्दिन खान - महियरच्या महाराजांच्या दरबारात संगीतकार  तर होतेच पण महाराज ब्रीजनाथसिंहांचे गुरुही होते. महाराजांनी बाबांचा गुरु म्हणून स्वीकार केला ती गोष्टही मोठी ऐकण्यासारखी आहे.

महाराज स्वत: संगीतप्रेमी होते. त्यांनी अनेक वाद्ये जमवली होती. त्यांची अट होती की जो कोणी ही वाद्ये वाजवू शकेल आणि उत्तम रीतीने गाऊ शकेल त्यालाच ते गुरू म्हणून स्वीकारतील. महाराजांचा एक मित्र होता. श्री जुगलकिशोर - ज्याचा बाबांशी परिचय होता आणि ज्याला महाराजांची अटही माहीत होती. तो महाराजांना म्हणाला संपूर्ण भारतात या अटीची पूर्तता करू शकणारे खानसाहेबच आहेत. त्यांनी महाराजांजवळ बाबांची खूप स्तुती केली. बाबा २८-२९ वाद्ये वाजवू शकत आणि गाऊही शकत.

सकाळचा प्रहर, शांत वातावरण, बाबांनी महाराजांच्या दरबारात प्रवेश केला. ज्या दालनात वाद्यं होती तिथे बाबांना बसायला सांगितलं गेलं. बाबांनी ती अनेक वाद्यं बघितली. तिथे अशी व्यवस्था होती की बाबांनी कोणतंही वाद्य वाजवलं तरी मायक्रोफोन द्वारा दुसऱ्या दालनात महाराज ऐकू शकत होते. बाबांना वाद्य वाजवण्यास सांगण्यात आलं. ज्या तऱ्हेने बाबांनी विविध वाद्ये वाजविली त्याने महाराज खूष झाले. दुसऱ्या दिवशी दरबारात सरोदवर स्वत:चं संगीत सादर करण्याचं निमंत्रण दिलं.

महाराजांच्या समोरच बाबांचं आसन होतं. दरबाऱ्यांनी सभागृह भरलेलं होतं. संध्यासमयी सूर्य अस्तांचलाला निघाला होता. बाबांचं सरोदवादन सुरू झालं. राग खूप गंभीर होता. खर्जातून येणाऱ्या स्वरांनी एक वेगळाच माहोल तयार केला. बाबांनी दरबारात रागाचं स्वरूप उभं केलं. पाच ते सात मिनिटांची मांडणी झाली असेल, महाराज स्वत:च्या स्थानावरून उठले आणि दुसऱ्या खोलीत निघून गेले. बाबा

ebook by e sahity pratishthan


www.esahity.com

आणि इतर दरबारी आश्चर्यात/ बुचकळ्यात पडले, पण बाबांनी स्वत:चे वादन सुरूच ठेवले. मनात विचार आला स्वत:ला संगीतप्रेमी म्हणवणाऱ्या राजाचं हे असं असभ्य वर्तन? अजून राग सुरूही झाला नाही, तर कोणतीही पूर्वसूचना न देता चालले गेले? हा संगीतविद्येचा अपमान होता. बाबांनी राग पूर्ण केला. वातावरण गंभीरच होतं. त्यांनी काय करावं? आणि काय समजावं?

त्याचवेळी सर्वांना चकित करीत स्वत:च्या हातात सत्काराची आणि गुरुपूजनाची सामग्री सहित महाराजांनी प्रवेश केला. सगळे स्तिमित होऊन बघतच राहिले. महाराजांना बाबांना गुरू म्हणून स्वीकार करून त्यांचा सत्कार करण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र राग चालू असताना, तेही बाबांसारखी विद्वान व्यक्ती वादन करीत असताना, त्यांनी मधूनच निघून जाण्याचे कारण सर्वांना अज्ञातच होते. महाराज बाबांपाशी आले आणि प्रणाम करून म्हणाले, ''माझा शिष्य म्हणून स्वीकार करावा.''

बाबा अजूनही रागातच होते. म्हणाले ''तुमच्यासारख्या अविवेकी माणसाला शिष्य म्हणून कसे स्वीकारणार? ज्याला संगीत विद्येचा मान राखता येत नाही. वादन चालू असताना तुम्ही तर मध्येच उठून गेलात.'' हे ऐकून महाराजांनी नम्रपणे उत्तर दिले ''तुम्ही कोणता राग वाजवत आहात कल्पना नाही पण सुरुवातीच्या काही क्षणातच त्या सुरांनी माझ्यावर एवढा परिणाम केला की माझे अष्टसात्त्विक भाव जागृत झाले आणि डोळे भरून आले. एक राजा या नात्यानं दरबाऱ्यांसमोर असं दिसणं बरं नाही म्हणून मी अंतर्गृहात गेलो. असं संगीत आजवर कधीच ऐकलं नाही. आपली अनुज्ञा न घेता मी आसन सोडलं ही माझी चूक आहे. क्षमा असावी.''

बाबांनीही महाराजांच्या अहंच्या मागे वाहणाऱ्या भावनांच्या शुद्ध झऱ्याकडे पाहिलं. संगीतमुग्ध राजा आणि भावमुग्ध बाबा शिष्य-गुरुंच्या संबंधाच्या स्वस्तिवचनाचा घोष करू लागले.

या प्रसंगानंतर महाराज ब्रिजनाथसिंह बाबांचे शिष्य बनले. शिष्याच्या अदबीने, शिस्तीचे पालन करीत ते बाबांपाशी संगीत शिकले. गुरू म्हणून बाबा शिस्त आणि अचूकता याबाबत आग्रही होते. त्यांचं बारीक लक्ष असायचं. शिष्याच्या चुकीमुळे रागस्वरूप अशुद्ध होईल अशी कोणतीही गोष्ट त्यांना चालत नसे. एकदा शिकत असताना महाराजांचे काहीतरी चुकले. जवळच दांडुका होता. रागाच्या भरात मारला महाराजांना ! त्यानंतर त्या दिवशीचं शिकवणं तर थांबलंच! पण घरी येऊन विचार केला. --बस्स! संपलं आता! महियरच्या महाराजांसोबतचा व्यवहार खुंटला ! मी भलेही गुरू असेन... पण ते महाराज आहेत रयतेचे स्वामी ! मी रागाने दंडुका मारायला नको होतो. त्यांनी सांगण्याआधीच मी गाशा गुंडाळायला हवा. बाबा सामानाची बांधाबांध करायला लागले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच सामानाची बांधाबांध चालू असताना महाराजांची बग्गी बाबांच्या

घरासमोर येऊन उभी राहिली. महाराज बाबांच्या भेटीला आले होते. ‘‘गुरुदेव ! ये आप क्या कर रहे हैं?’’ बाबांना घर आवरताना पाहून महाराज म्हणाले, ‘‘आप मेरे गुरू हैं। यदि गुरू के स्थानपर रहकर आप ने मुझे सज़ा फर्माई है तो योग्य ही है। आप महियर छोड़कर नहीं जा सकते ।’’

महाराजांच्या गुरुभक्ती, प्रेम आणि विनम्रतेचा विजय झाला. बाबा जन्मभर महियर मध्येच राहिले आणि पुढे त्यांच्या प्रख्यात घराण्याचा जन्म झाला... महियर घराण्याचा...!

माँ अनेकदा म्हणतात की ‘‘आज वे राजा-महाराजा नहीं रहे जो बाबा जैसे विद्वान पुरुष का सम्मान करते थे, उन लोगों की उदार भावनासे शास्त्रीय संगीत को आधार मिला.’’

बाबा जेव्हा महियर मध्ये होते तेव्हा महियर आणि आजूबाजूच्या प्रदेशात प्लेगसारख्या जीवघेण्या रोगाची साथ पसरली होती. अनेकांनी प्राण गमावले आणि अनेक बालकं अनाथ झाली. या बालकांची काळजी घेणारं, त्यांच्या भविष्याची चिंता करणारं, त्यांच्या उपजीविकेचा विचार करणारं कोणीच नव्हतं. त्यातल्या २४-२५ मुलांना बाबांनी घरी आणलं. त्यांना संगीत शिकवण्याचा निश्चय केला. त्यातल्या काहींना त्यांचे सगेसोयरे येऊन घेऊन गेले. बाकीच्यांना बाबांनी संगीताची तालीम दिली आणि त्यातूनच उभा राहिला ‘महियर बँड’ जो आजही अस्तित्वात आहे. असं सांगतात की या बँड साठी बाबांनी हजारो संगीत रचना केल्या. (compositions) त्यातल्या कित्येक रचना आजही त्याच स्वरूपात वाजवल्या जातात.

बाबा या मुलांना तालीम देत होते तेव्हा ब्रिजनाथ महाराजांच्या लक्षात आलं की बाबांनी किती जणांना किती वाद्यांवपर तयार केलं होतं. हा वाद्यवृंद (orchertro) अतिशय कर्णमधूर संगीत वाजवत होता. महाराजांनाही हा बँड ऐकायची इच्छा होती. दिवस आणि वेळ नक्की झाली. बाबांचा उत्साह काय वर्णावा? विधात्याच्या रोषाने अनाथ झालेल्या त्या मुलांना ऐकण्यासाठी महियर भूमीचा नाथ येणार होता. त्या मुलांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. ठरल्या वेळी नवे कपडे घालून आपापली वाद्ये घेऊन बसले. महाराजांची वाट पाहत बसले. परंतु ते महाराज ! दिलेली वेळ विसरले आणि आलेच नाहीत पुष्कळ वेळ वाट बघून बाबा आणि मुले थकून गेली. मुलांचा उत्साह ओसरला आणि बाबांनाही फार वाईट वाटले. मुले वाट बघून थकून घरी गेली.

रात्री महाराजांना अचानक आठवण झाली की आपल्याला महियर बँड ऐकायचा होता. तातडीने बाबांना सांगावा गेला की ते बँडचं संगीत ऐकण्यासाठी येत आहेत. बाबांनी विचार केला की आता काय? एका क्षणाचाही विलंब न करता बाबा स्वत: मुलांना आणण्यासाठी त्यांच्या घरी गेले. बरीचशी मुले तर झोपी गेली होती. सगळ्यांना पुन्हा तयार केलं आणि महाराजांसमोर महियर बँडची प्रस्तुती झाली. थकलेल्या अवस्थेत सुद्धा मुलांनी एकत्र येऊन अतिशय सुंदर सादरीकरण केलं.

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

समेवर येताच दिलखुश
सूर आणि तालाचे द्वैत



बाबा अल्लाउद्दिनखान यांना तबल्यावर साथ करताना कंठे महाराज



बाबा अल्लाउद्दिनखान

परमहंसाजवळ आपले सूरपुष्प अर्पण

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

''अद्भुत-अद्भुत !'' महाराज स्तुती करताना थकतच नव्हते. शास्त्रीय संगीतात इतकं सुंदर समूहवादन होऊ शकतं यावर त्यांचा विश्वासच बसत नव्हता. महाराज स्तुतीसमुनांचा वर्षाव करत होते. पण सर्व वेळ बाबांचा चेहरा मात्र गंभीरच होता. ते एक अक्षरही बोलत नव्हते की अभिवादन स्वीकारत नव्हते. राजाने गुरुकडे पाहून जाणलं की ते नाराज आहेत. म्हणाले ''माझं काही चुकलं का? काय झालं?'' त्यावर बाबा म्हणाले ''मी माझ्या दरबारी संगीतकार पदाचा त्याग करत आहे. माझा राजीनामा स्वीकारावा. आता मी इथे राहणार नाही.'' वातावरण गंभीर झालं राजाने धीर करून विचारलं ''का बरं?''

''का काय? तुम्ही मुलांना शब्द दिला होता की तुम्ही संगीत ऐकायला याल आणि तुम्ही विसरलात? ही निष्पाप मुलं तुमची वाट पाहात राहिली. त्यांना कोणी पाणीसुद्धा विचारलं नाही? संदेश मिळाल्यावर मी स्वत: प्रत्येकाकडे जाऊन त्यांना घेऊन आलो. तयार केलं. सगळी जमवाजमव केली. जिथे संगीताची इतकी अवहेलना होते तिथे मला नाही राहायचं. मुलं लहान असली म्हणून काय झालं? कलाकार आहेत. कलेला समर्पित आहेत. कलेची कदर करण्यासाठी सुद्धा काही नियम असतात. मनमानी चालत नाही. मला आपल्या सेवेतून मुक्त करा. मी केवळ संगीताचा साधक आहे.''

महाराजांना स्वत:ची चूक उमजली. बाबांची त्यांनी मनापासून क्षमा मागितली. बाबांमधला प्रेमळ गुरु द्रवला. बाबा महियर मध्येच राहिले. कधी कधी जीवनात असं घडतं की उदात्त हेतुसाठी व्यक्तीला स्वत:चा स्वभाव बाजूला ठेवावा लागतो आणि कधी कधी सिद्धान्त / तत्त्व सांभाळण्यासाठी व्यक्तिगत फायदाही बाजूला ठेवावा लागतो.

एकदा बाबा अल्लादिन खान महियरच्या राजमहालात प्रवेशत होते, त्यांना लोखंडाच्या नळ्या एकमेकींवर आपटण्याचा आवाज आला. त्यांनी जाऊन बघितलं तर राजसेवक जुन्या झालेल्या बंदुकींच्या नळ्या कापून एकत्र करीत होता. बाबांनी विचारलं ''ह्याचं काय करणार?'' ''ह्या काही कामाच्या नाहीत. भंगारात टाकणार'' बाबा गेले महाराजांकडे. म्हणाले ''जुन्या बंदुकीच्या नळ्या जर तुम्ही काढून टाकणार असाल तर मला द्या'' महाराजांना आश्चर्य वाटले. ''आपण संगीतकार आहात. बंदुकीच्या नळ्यांचं तुम्हाला काय काम?''

बाबा म्हणाले, ''त्याचा उपयोग केल्यावरच मग सांगेन.'' घेऊन आले बंदुकीच्या नळ्या घरी! वेगवेगळ्या लांबीच्या नळ्या तयार केल्या आणि त्यांचा बनवला नळतरंग (pipetone). आजही महियर च्या बँडमध्ये नळतरंग केंद्रस्थानी आहे.

बाबा (Creative Genius) होते. एक सर्जनशील मेधावी पुरुष ज्यांना शस्त्राच्या नळ्यांच्या टणत्कारातही सुरांचा झणत्कार ऐकू आला. ज्या नळ्यांमधून दारूगोळा बरसात असे त्यातून त्यांनी सुरांना वाहते केले.

ebook by e sahity pratishthan

मागे उल्लेखिल्याप्रमाणे बाबांचं अनेक वाद्यांवर प्रभुत्व होतं. वाचकांच्या लाभासाठी या वाद्यांची सूची येणेप्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्लॅरोनेट | व्हायोलियन | चौघडा | सतार | सारंगा |
| शहनाई | बेन्जो | ढोलक | सूरबहार | रबाब |
| बासरी | तबला | डफ | सूरसिंगार | |
| पियानो | पंखवाज़ | डमरू | इसराज | |
| चेलो | नगारा | सरोद | सारंगी | |

इतर वाद्ये जी बाबांनी स्वत: बनवली आणि स्वत: वाजवत असत अशी - चंद्रसारंग, सितारबेन्जो, नळतरंग इ. इतर अनेक. वाद्य वादनातलं त्यांचं प्रभुत्व केवळ वाद्य-निर्मिती पुरतंच मर्यादित नव्हतं तर त्यांनी स्वत: कित्येक नव्या रागांची निर्मिती केली आहे. या रागांची यादी सुद्धा भली मोठी आहे.

हेमबिहाग, कौशी भैरव. मांझखमाज, हेमंत, मदनमंजरी, शुभावती, मृगमंजरी, अर्जुन, भीम, भगवती, चंडिका, धवलश्री, धनकोष, दीपिका, दुर्गेश्वरी, गांधी-बिलावल, हेमंती, हेमंतभैरव, यमनमांझ, जौनपुरी तोडी, केदारमांझ, कोमल मारवा, माधवश्री, माधवगिरी, मलय, मेघबहार, मुहम्मद, नटखमाज, प्रभाकली, राजविजय, राजेश्री, सुगंध, सूरसती - हे काम एखाद्या मोठ्या ताकदीचा संगीतज्ज्ञच करू शकतो. ज्याचं आसन, प्राशन, शासन, मनन, चलन आणि जीवन संगीतच असेल असा - म्हणजेच बाबा आणि फक्त बाबाच !

ग्रीष्मातील जाळणारी गरमी. धगधगणारं ऊन. मध्यप्रदेशातील महियर भूमी. सूर्यनारायण आपल्या उष्मेचे चटके प्रत्येक जीवाला देत होता. अशा वेळेस भविष्यात दिग्गज होणारा एक कलाकार आपल्या गुरुची वाट पाहात बसला होता. अन्नपूर्णेच्या डोक्यात एकच प्रश्न वळवळत होता. ''हे काय? या अशा गरमीमध्ये भाऊ म्हणजे अलिअकबरखान असा भारी पोषाख घालून का बसला असेल?'' एखाद्या लग्नाकार्यात घालतात तसा भरजरी कोट घालून अलिअकबर खान बसला होता. असं तर कोणीच करत नाही. जाऊन विचारावं. शेवटी तिने स्वत:च्या भावाला विचारलं ''याचं गुपित काय रे?''

हा प्रश्न विचारल्यावर खानसाहेब गंभीर झाले आणि म्हणाले, ''अगं बाई, तुला नाही कळणार. तुला नाही भोगावं लागत पण मला भोगावं लागतं.'' ''पण काय?''

''अग काय सांगू? बाबांचा स्वभाव तर तुला माहीतच आहे. जराशी चूक झाली तरी आफत

ebook by e sahity pratishthan

 www.esahity.com

आलीच म्हणून समज. इतका मार पडतो की सगळं अंग ठणकतं. म्हणून जरा जाड कोट घातला की आत कमी लागतं. एकवेळ सूर्याचा ताप सहन करणं सापे आहे पण गुरुंचा ताप सहन करणं फार अवघड. मी त्यांचा मुलगा असलो तरी शिष्य आधी मग मुलगा. त्यामुळे संताप भारी.''

बाबा अशा संतापी स्वभावासाठी प्रसिद्ध होते. त्यांच्या सोट्याचा भरपूर प्रसाद अलीअकबर खाँ साहेबांना मिळाला होता. एक जुनी म्हणच आहे ना - ''छडी लागे छम छम विद्या येई घमघम'' पण आता ती गोष्ट राहिली नाही. आता मारणे बंद झाले आहे.

माँ जेव्हा जेव्हा ही गोष्ट सांगतात तेव्हा बाबांच्या समोर खानसाहेबांच्या ''प्रसाद ग्रहण'' मार्गाचा उल्लेख करून खूप हसतात. म्हणतात, ''तुझे तो कभी डाँट नहीं पडी ! लेकिन भैया बहुत शरारती थे।''

महान व्यक्तींच्या जीवनातील घटना त्यांच्या अपत्यांना आणि अनुयायांना खूप प्रेरक आणि अनुकरणीय असतात. विशेषत: ज्या घटनांशी त्यांच्या आयुष्याचा तत्त्वबोध जोडलेला असतो. ते प्रसंग हृदयात परिणामकारकरित्या कोरून ठेवलेले असतात. बाबा अल्लाउद्दिन - आचार्य अल्लाउद्दिन खान म्हणून ओळखले जात असत. आचार्य शब्दाचा अर्थ असा की: आचिनोति च शास्त्रार्थ स्वयं आचरते च य: स: आचार्य:। जे जीवनाचं तत्त्वज्ञान स्वत:च्या आचरणातून शिकवतात ते आचार्य. 'आचति इति आचार्य:।'

बाबांनी जीवनात जे सत्य जाणलं, ज्या गुणांचा विकास करून स्वत:ला उच्च स्थितिला प्राप्त करून घेतलं ते गुण शिष्य्यांमध्येही बाणवण्याबाबत ते आग्रही होते.

असे अनेक प्रसंग आहेत की ज्यातून बाबांचं गुरू म्हणून पिता म्हणून आणि एक उत्तम माणूस म्हणून व्यक्तित्व प्रकट होते. या प्रसंगाचा गहिरा असर (सखोल परिणाम) माँच्या जीवनावर झाला आहे.

शरणराणी माथूर या बाबांच्या शिष्या होत्या. त्या बाबांकडे महियरला येऊन सरोद शिकत होत्या. अत्यंत सुखी आणि सधन कुटुंबातल्या त्या तेजस्वी स्त्री होत्या. त्यांनी जेव्हा बाबांजवळ महियरमध्ये राहून सरोद शिकण्याची तयारी दर्शवली तेव्हाचा हा प्रसंग आहे - सुरुवातीच्या दिवसांमध्ये स्वत:च्या घरात, ज्या खोलीत बाबांनी त्यांची राहण्याची व्यवस्था केली होती तिथे थोडी सौंदर्यप्रसाधने - जसे की - पावडर, लाली, लिपस्टिक, स्नोच्या डब्या इ. बाबांनी आणून ठेवले. दोन-चार दिवसांनी मुद्दाम जाऊन बाबांनी पाहिलं की कोणत्या वस्तू वापरल्या गेल्या आहेत? त्यांना आढळलं की वस्तू वापरल्या गेल्या आहेत. शांतपणे ते शरणराणींना म्हणाले ''तुमच्याकडून ही संगीत साधना होणार नाही. ज्यांना बाह्य सौंदर्याचं आकर्षण असतं, ते वाढवण्यासाठी साधनांची जरूरत असते. त्या

व्यक्ती ही साधना करू शकत नाहीत.''

शिष्याची अंत:प्रवृत्ती शोधून काढण्याची बाबांची ही अनोखी पद्धत होती. संगीताच्या साधनेसाठी शिष्याकडे त्यागवृत्ती नसेल तर त्याला काहीच मिळणार नाही. प्रसिद्ध संस्कृत सुभाषित आहे.

''सुखार्थी चेत् त्यजेत् विद्या। विद्यार्थी चेत् त्यजेत् सुखम्।''

सुखाची इच्छा करणारा विद्यार्थी होऊ शकत नाही. जो विद्यार्थी खरा असेल त्याने सुखाचा त्याग करावा.

त्यानंतर शरणराणी समजल्या. बाबांकडून शिकण्याचा निर्णय तर त्यांनी केलाच होता. या सर्व प्रसाधनांना त्यांनी तिलांजली दिली. पुढे इतकं मोठं नाव त्यांनी संगीताच्या क्षेत्रात मिळवलं की भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' देऊन गौरवलं. सन्मानित केलं.

बाबांच्या जीवनात अनेक आश्चर्यकारक घटना घडल्या. बाबांचं पशु-प्रेम प्रकट करणारी ही एक रोचक गोष्ट आहे.

महियर गांवात त्यावेळी नुकतीच वीज पोहोचली होती. एकदा दारावरून जाणारी विजेची तार उघडी होती. ह्या उघड्या तारेमुळे एका वानराला विजेचा झटका बसला आणि ते बेशुद्ध होऊन पडलं. बाबांनी ते पाहिलं. लागलीच त्याला उचलून घरात आणलं. पाणी मारलं जखमांवर मलम लावलं. वानर शुद्धीवर आला. हळूहळू बरा झाला. तेव्हापासून बाबांचा भक्तच झाला. बाबांबरोबर सतत सावली सारखा राहू लागला. त्यामुळेच की काय बाबांना अंगरक्षक लागला नाही.

कोणालाही... विशेष करून अपरिचित माणसाला तो बाबांजवळ येऊ देत नसे. बाबा जेव्हा सरोदचा रियाज करीत, तेव्हा तो बाजूला शांतपणे बसून राही. बाबाही प्रेमाने त्याला जवळ ठेवीत आणि त्याच्या त्यांच्यावर मालकी गाजवण्याची मजा घेत. काही काळानंतर त्या वानराला बाबांची भाषा समजू लागली. बाबा त्याला लाडाने 'हनुमानजी' म्हणून बोलवीत. ''अरे! हनुमानजी शांत'' असं म्हटलं की वानर शांत होई. ''अरे यह तो माँ है।'' म्हटलं की नम्रपणे उभा राही. एखाद्याची गंमत करण्यासाठी म्हटलं की ''हनुमानजी! ये आदमी ठीक नहीं है - इसको मत आने देना'' तर हा आज्ञाधारक अंगरक्षक वानर त्यांच्यावर गुरगुरायचा. वातावरण मोकळ्या हसण्यानं भरून जायचं.

दुर्दैवाने गावातल्या कुत्र्यांनी त्याची शिकार केली. तो मृत्युमुखी पडला. बाबांना खूप दु:ख झाले. बाबांनी त्याचे अंत्यविधी केले. असं सांगतात की बाबांच्या आसपासच्या काही लोकांनी तर सुटकेचा नि:श्वास सोडला कारण वानराने बाबांना जवळ जवळ ताब्यातच घेतलं होतं त्यामुळे अनेकांना बाबांच्या जवळ जाण्याची भीती वाटू लागली होती.

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

एकदा बाबांनी आपल्या महियर मधल्या घराचं नवीन बांधकाम केलं होतं. त्या काळात हे घर फारच देखणं होतं. महियर सारख्या गावात इतकं सुंदर घर पाहून कोणाच्याही मनात ते पाहण्याची जिज्ञासा निर्माण होणं स्वाभाविक होतं. कसं बरं असेल हे इतकं सुंदर घर? एक भगिनी - जी रस्ते झाडण्याचं काम करी जिला आपण भंगी म्हणून ओळखतो तिच्याही मनात हे घर पाहण्याची इच्छा निर्माण झाली असावी. मुख्य दरवाज्याच्या आडोशाला उभे राहून, जेणेकरून तिला कोणी पाहणार नाही अशा तऱ्हेने आत डोकावून पाहत होती. लहानग्या अन्नपूर्णेचं तिच्याकडे लक्ष गेलं आणि तिच्या डोळ्यात थोडा अनादर व्यक्त होत असलेला, बाबांच्या नजरेतून सुटला नाही.

बाबा स्वत: उठले, बाहेर गेले आणि त्या भगिनीला म्हणाले ''अरे माँ, आप बाहर से क्यों देख रही हो? अंदर ओजो!'' खूप विनयपूर्वक बाबा त्या स्त्रीला आत घेऊन आले. घर दाखवलं नंतर अन्नपूर्णेस त्यांच्या पाया पडायला सांगितलं. कुठल्या व्यक्तीला कधी कमी लेखलेलं बाबांना आवडत नसे. बाबा कित्येकदा म्हणत, ''या माणसांचे उपकार मानून तुम्ही ऋणी राहिलं पाहिजे यांनी सगळी स्वच्छता राखली नाही तर तुम्ही कसे जगणार?''

केवळ संगीतकार म्हणूनच नव्हे तर अत्यंत तरल असे माणुसकीचे संस्कार देण्यातही बाबा मागे राहिले नाहीत. लहान वयातच ज्या मुलांना असे मार्गदर्शन मिळते त्यांचा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो. यालाच म्हणतात 'दर्शन.' दृष्टिपरिवर्तना बरोबरच दृश्यही बदलून जाते. नवेच दर्शन प्राप्त होते. प्रत्येक व्यक्तीमधले गुण स्वीकारण्याची वृत्ती विकसित होते. माँच्या जीवनात हा गुण अगदी खोलवर विकसित झालाय. कोणाच्याही बाबतीत कसलाही भेदभाव त्या करीत नाहीत. कुठल्याही स्तरातील व्यक्ती असू दे माँ त्यांचा चांगल्या तऱ्हेने मान राखतात.

ह्या काळात अली अकबर खान आणि रवी शंकरांचेही नाव झाले होते. हे सर्व लोक कार्यक्रमात वाजवण्याचे जितके पैसे घेत त्यापेक्षा कमी पैसे बाबा घेत असत. या सर्व शिष्यांना ही गोष्ट माहीत होती व त्यांना ती रुचत नसे. आपल्यापेक्षा आपल्या ज्ञानी गुरुंचा पैशाच्या दृष्टीने कमी सन्मान होतो हे त्यांना विचित्र वाटायचे. एकदा सगळे मिळून ही गोष्ट बोलण्यासाठी बाबांकडे आले म्हणू लागले, ''आप इतने ज्ञानी महान कलाकार प्रोग्रॅम में बजाने के लिए हम लोगों के चार्ज से भी कम चार्ज लेते हैं यह हमें अच्छा नहीं लगता।'' म्हणण्याचा अर्थ होता की बाबांनी चार्ज वाढवायला हवा. बाबांनी त्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकले व म्हणाले, ''खरोखरच तुम्हाला असं वाटतं की मला तुमच्यापेक्षा जास्त पैसे मिळायला हवे?''

सगळे उत्साहाने 'हो' म्हणाले.

''तर मग तुम्ही सगळे लोक माझ्यापेक्षा कमी पैसे का नाही घेत? माझा मान आणि तुमची

इच्छा सगळंच राखलं जाईल.''

माताजींनी जेव्हा बाहेर वाजवणं बंद केलं तेव्हा जे त्यांच्या वादनाविषयी जाणत होते असे संगीतप्रेमी आणि बाबा व माँचे भक्त बाबांना भेटायला आले.

''तुमचं संगीत मला जगाला ऐकवायचंय अशा संगीतापासून जग विमुख का रहावं? मी कलकत्याच्या सुभाषचंद्र बोस स्टेडियममध्ये तुमच्या अटींवर तुमचा कार्यक्रम ठेवतो.''

तीन लाख रुपयांनी सुरुवात करून त्या बंधूंनी तेरा लाखापर्यंत किंमत देऊ केली. अखेर संपूर्ण थैलीच उघडी करून समोर ठेवली. ''तुम्ही म्हणाल तितके देतो पण कार्यक्रमात वाजवायला हो म्हणा.''

इथे या गोष्टीचा उल्लेख अशासाठी केला की पंडितजी आणि अली अकबर खान पण त्या काळात जास्तीत जास्त तीन लाख घेत असत.

माताजींनी कलकत्याहून आलेल्या त्या सज्जन भक्तबंधूंना विचारले, ''तुम्ही मला पैसे देऊन काय करणार? आज लोकांची अभिरुची बदलली आहे. या गुणात्मक संगीताला ऐकण्यासाठी गुणीजन आहेत कुठे ? हे संगीत अनमोल आहे.''

भिन्न भिन्न काळात या दोन घटना घडल्या आहेत. त्यातून पिता आणि पुत्रीच्या स्वभावातील ऐक्य दिसून येते.

माताजी असं मानतात की संगीत ऐकण्यासाठी खरोखर गुणी आणि तृषित असेल तर पैशासारखी क्षुल्लक वस्तूमध्ये आणता कामा नये.

बाबा भारतवर्षातील महान संगीतकार होते.

या महान संगीतकाराची संघर्षयात्रा पुढच्या प्रकरणात सांगतो.

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

सूरांचेच आभुषणं ज्यांचे, शोभती सुरसिंगारे ।



बाबा अल्लाउद्दिनखान
सूरशिंगार वाजवताना



मदीना बेगम
(मा. अन्नपूर्णादेवींच्या मातोश्री)

सूरयोगिनीच्या जन्मदात्री
तुम्हास विसरू कधी ना,
आमचे वंदन स्वीकारावे
मातोश्री मदीना

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

# संघर्षयात्रा

बांग्लादेशाच्या हिरव्या भूमीवर एक छोटंसं गाव बसलेलं होतं. गावाचं नाव शिवपूर. गावाच्या बाहेर एक शिवालय होतं. शिवालयात सुंदर आरती गायली जात असे. भजन-कीर्तनानी वातावरण अतिशय पवित्र बनत आहे. गावापासून शिवालयापर्यंत वृक्षराजींनी आच्छादिलेली एक पाऊलवाट होती. ६-७ वर्षांचा एक लहानगा या पाऊलवाटेवरून झपाझप शिवालयाकडे जात होता. दूरवरून येणाऱ्या पखवाजाच्या घुमणाऱ्या आवाजाबरोबर त्याच्या पावलांचा ताल जमला होता. आवाजाची पावलांशी एकलय झाली होती. जाऊन पोचला मंदिरात. बसला. शिवस्तुतीच्या सुरात आणि पखवाजाच्या आवाजात तल्लीन होऊन गेला. जणुकाही सूरसागरात खोलवर बुडाला होता. घरून शाळेत जातो असं सांगून निघाला तर होता पण संगीतानी आकर्षित झालेले त्याचे पाय आपोआप शिवमंदिराकडे वळले, मग कुठे जायचे होते याचे भान कुठले ? हा लहानगा म्हणजेच अल्लाउद्दिन खान !

घरच्यांना जेव्हा समजलं की हे बाळ शाळेत न जाता शिवमंदिरात जातं तेव्हा त्यांना आश्चर्य ही झालं आणि दु:खही. समजावलं... धाक दाखवला... पण संगीताबद्दलच्या आंतरिक ओढीमुळे त्याचाही नाइलाज झाला. घरच्यांसमोर एकच उपाय होता- ''तुझं घराबाहेर पडणं बंद!'' मात्र यामुळे संगीताचं आकर्षण अधिकच वाढलं.

त्यानं निश्चय केला आता संगीतासाठी, ज्ञानार्जनासाठी घर सोडायचं. काही काळ लोटला. ऐकलं होतं की कलकत्त्यामध्ये महाज्ञानी संगीतकार राहतात. पण शिवापूर कुठे आणि कलकत्ता कुठे ? पण जायचं तर होतच. एक दिवस याने घरातून थोडे पैसे, कपड्यांची छोटी पिशवी घेतली आणि कुणालाही न सांगता निघाला... संगीताच्या, गुरुच्या शोधात. कुठलीही दिशा नव्हती कोणीही दर्शक नव्हता. न शक्ती होती न घरच्यांचा पाठिंबा ! एकच ध्यास होता... संगीत शिकण्याचा... मला गुरू केला पाहिजे.

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com 

काहीही करून मी संगीत शिकणारच ! पण शिकवणार कोण? कसंतरी करून स्टीमरनी सिचाल पर्यंत आला आणि तिथून आगगाडीने कलकत्ता !

हे तर संपूर्ण अनोळखी शहर ! प्रवासाचा थकवा आणि मनातले कल्लोळ ! कलकत्त्याच्या गंगातटावर मिळाला विसावा. झोप आली. कितीतरी वेळानं जाग आली पाहतो तर बरोबर आणलेली पिशवी गायब ! कोणीतार चोरून नेली होती. काही साधू गंगातटावर लंगर चालवीत होते. तिथे जाऊन जेवण घेतलं. गंगेचं पाणी प्यायलं. असे दोन-चार दिवस गेले. कुठल्याशा लंगरमध्ये जाऊन पिण्याच्या पाण्याबद्दल विचालं तर समजलं की नळातून पाणी येतं. नळंच मुळी पहिल्यांदा बघितला होता. अशीच कुतरओढ चालू होती. पण संगीताचा गुरू कुठे आणि कसा मिळणार?

विचारात मग्न बाबा गंगातटावर बसत. एक दिवस गंगा किनाऱ्यावर कुणीतरी म्हटलं, ''भय्या तुम्हें वो पागल पुजारी बुला रहा है। देखो वो वहाँ है।'' वळून बघितलं तर साधुपुरुषासारखी दिसणारी एक व्यक्ती बाबांना बोलवीत होती. या व्यक्तीबरोबर एक साध्वी स्त्री होती. हे दोघे दुसरे तिसरे कोणी नसून ते होते विवेकानंदांचे गुरू रामकृष्ण परमहंस आणि साध्वी सारदा माँ !

ईश्वरासाठी वेडे झालेले - संगीतासाठी वेड्या झालेल्या मुलाला बोलावित होते. सारदा माँ नी त्याला पत्रावळीवर जेवायला वाढलं.

बरीच मुलं गंगातटावर खेळायला येत. छोटा अल्लाउद्दिन प्रत्येकाला विचारीत असे की संगीत शिकवणारी कोणी व्यक्ती ओळखीची आहे का? विचारता विचारता एकदा एक मुलगा म्हणाला की माझ्या आई-वडिलांना संगीताची आवड आहे आणि संगीतातल्या कोणीतरी तज्ञ माणसाला ते ओळखतात. तो अल्लाउद्दिनला आईवडिलांकडे घेऊन गेला. एक अवघा आठ वर्षाचा मुलगा संगीताची आस घेऊन गुरूच्या ओढीनं घर सोडून कलकत्त्याला आला आहे याचं त्यांना फार अप्रूप/कौतुक वाटलं. सृष्टीचा नियमच आहे. कोणीही जर एखाद्या उत्तम प्रतीच्या ध्येयानं वेडी झालेली व्यक्ती असेल आणि अंतरात अतूट विश्वास असेल तर परमेश्वर कुठल्या न कुठल्या प्रकारे मार्ग दाखवतोच. त्या मुलाचे आईवडील नूलोगोपाल नावाच्या कलकत्त्यातील एका नावाजलेल्या गायकांना ओळखत होते. संगीताच्या या सच्च्या जिज्ञासूला तालीम सुरू झाली. अखेर गुरू भेटला. ही तालीम पाच वर्षे चालली. या पाच वर्षात अनेक राग आणि हजारो पलटे बाबा शिकले.

त्यानंतर विवेकानंदांचे चुलतभाऊ हबुदत्त यांच्याकडे बाबा क्लॅरोनेट आणि पखवाज़ शिकले.

एक ख्रिस्ती संगीतकार लोबो - ज्यांनी सुरवातीला काळा मुलगा म्हणून बाबांना शिकवण्यास नकार दिला होता - त्यांच्या संगीताची जाण असलेल्या प्रेमळ पत्नीच्या मदतीने बाबा त्यांच्याकडून व्हायोलिन शिकले. त्यांच्याकडून Western Notation ची पद्धत सुद्धा शिकले. बाबा एक असे संगीतकार

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

होते ज्यांना हिंदुस्थानी आणि पाश्चात्य अशा दोन्हीही स्वरलिपी वाचता येत होत्या.

पुढे हजारी उस्ताद यांचेकडून बाबा नगाडा आणि चौघडा शिकले. याच काळात ते बंगालातील प्रसिद्ध नाटककार गिरीश घोषांच्या नाटक कंपनीशी जोडले गेले. श्री. गिरीश घोष रामकृष्ण परमहंसांचे भक्त होते. अतिशय सुसंस्कृत / संस्कारपूर्ण नाटके सादर करीत ज्याला अनेकदा रामकृष्णांना पण निमंत्रण देत. तिथे कन्हैयालाल नावाच्या शहनाई वादकाकडून बाबा शहनाई शिकले आणि राम कन्हाईजींकडून तबला. अशा विविध, जाणकार संगीतगुरूंकडून बाबांनी गायन-वादनाची तालीम घेऊन उत्तम ज्ञानसंपादन करून घेतले.

त्यासुमारास जुगल किशोर नावाच्या संगीतप्रेमी आणि प्रतिष्ठित माणसाशी बाबांचा परिचय झाला. आपण अनेक प्रकारची वाद्ये वाजवतो असे बाबांनी त्यांना सांगितले. ''असं! पण उस्ताद अहमद अली साहेबांना कधी ऐकलं आहे का? जा त्यांचं ऐका.''

बाबांनी त्यांचे पत्र घेऊन दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच उ. अहमद अलींचे घर गाठले. बाबांच्या शब्दात सांगतो, ''उस्तादजी सरोदवर तरफेच्या तारा लावत होते. मग त्यांनी निषादापासून षड्जापर्यंतची आलापी सुरू केली. ऐकताच माझ्या अहंकाराला तडा गेला. डोळ्यातून पाणी वाहू लागलं. फार प्रगल्भ संगीत होतं ते. इतकी वाद्य वाजवू शकण्याचा माझा अहंकार पूर्ण गळून पडला. हे असं परिणांमकारक संगीतच खरं संगीत आहे. जर मी संगीत शिकण्यासाठीच सर्वस्वाचा त्याग करून आलोय तर ते मी मिळवणारच.'' साश्रू नयनांनी अहमद अलींना, शिष्य बनवून घेण्याची त्यांनी विनंती केली. बाबा म्हणाले, ''मी आपला सेवक आहे. तुमच्या घरातील सर्व कामे करीन. अगदी कपड्यांपासून स्वयंपाकापर्यंत. साफसफाई सुद्धा करीन. पण मला संगीत शिकवा.''

बाबांनी खरोखर अशी गुरूसेवा केली. बाबा तेव्हा सरोद शिकत आणि वायोलीन वाजवून उपजीविका करत. बाबांची ग्रहणशक्ती अजब होती. केवळ संगीतावरच प्रेम केल्यामुळे त्याच्या एकाग्रतेचा अतुलनीय विकास झाला होता. त्यामुळे कोणत्याही वाद्यावर ते पटकन प्रभुत्व मिळवू शकत. अहमद अली खानही बाबांवर खूश असत. ते जेव्हा वाजवीत तेव्हा बाबांना व्हायोलीनच्या साथीसाठी घेऊन जात. स्वत:ला मिळालेल्या पैशातून अर्धे पैसे बाबांना देत. बाबा त्यातून फक्त उपजीविकेसाठी लागणारे पैसे खर्जून बाकीचे बाजूला ठेवीत.

एक दिवस जमा झालेली सर्व रक्कम स्वत:च्या गुरूंना देऊन म्हणाले, ''हा तुमचा पैसा तुम्हाला अर्पण.'' खानसाहेब म्हणाले, ''हा पैसा माझा कसा?'' बाबांनी सर्व हकीकत सांगितली. गुरूंना बाबांचा खूप अभिमान वाटला. गुरुमाता पण म्हणाल्या, ''असा शागिर्द तर कधी बघितलाच नाही. तो अमका तमका तर स्वत:च्याच अडचणी सांगून तुमच्याकडूनच पैसे घेऊन गेला.'' याच

पैशातून अहमद अली साहेबांनी स्वत:चं नवं घर बांधण्याचं नक्की केलं. त्यात बाबांनी पण गुरुचं घर बांधण्यासाठी मेहनत घेतली. अगदी श्रमदान सुद्धा केलं.

अहमद अली खानसाहेबांकडे शिकत असताना एक वेळ अशी आली की खानसाहेबांकडे बाबांना शिकवण्यासारखं काहीच शिल्लक उरलं नाही. गुरुमाता त्याला म्हणाल्या, ''आता तुला शिकायचं असेल तर तुला नवा गुरू करावा लागेल.'' खानसाहेबांनीही या गोष्टीला दुजोरा दिला.

''घट माझाच रिता जाहला
कसा भरू मी तव प्याला''

बाबांची ज्ञानाची भूक अतिप्रचंड होती. आता अशी एकच व्यक्ती उरली होती जी त्यांच्या ज्ञानलालसेचा अग्नी शांत करू शकेल. संगीत विश्वाचे सूर्य वजिरखान साहेब ! पण ते कोणालाही सहजासहजी शिष्य म्हणून स्वीकारत नसत. स्वत: रामपूरच्या नवाबाचे गुरू. बाबांनी त्यांना भेटून त्यांचे शिष्यत्व मिळवण्याचा प्रयत्न केला. पण नशीब साथ देत नव्हतं. अन् वीणा शिकण्याची इच्छा इतकी तीव्र होती की चैन पडत नव्हतं.

जे हवं ते शिकायला मिळत नाही तर माझ्या जीवनाचा काय अर्थ? का माझ्या नशिबात समर्थ गुरू नाही? माता सरस्वतीची कृपा नाही? त्यासाठी जीवनाचा त्याग करणंच बरं ! जीव देण्याचा उपाय म्हणून बाबांनी अफूचा एक मोठा गोळा जवळ ठेवला. मशिदीत नमाज़ पढत असताना त्याची ती अवस्था एका मौलवींनी पाहिली. त्यांनी कारण विचारल्यावर आपल्या नैराश्याबद्दल बाबांनी मला सांगितले. मौलवीजींनी सांगितलं, ''नाही नाही, आत्महत्या ही धर्माविरुद्ध आहे.'' मग रामपूरच्या नवाबांना पत्र लिहिलं आणि बाबांजवळ दिलं.

एक दिवस रामपूरचे नवाब स्वत:च्या बग्गीत बसून उ. वजिरखान साहेबांचे 'भर्तृहरी' नाटक बघायला निघाले होते. तेव्हा बाबा बग्गीसमोर जाऊन उभे राहिले. आणि मौलवी साहेबांचे पत्र नवाबांना दिले. पत्रात लिहिलं होतें -

''गेले सहा महिने हा मुलगा उस्ताद वजिरखान साहेबांकडे संगीत शिकू इच्छितो. पण उस्तादजी त्याचा स्वीकार करीत नाहीत. खानसाहेबांनी याला शिष्य म्हणून स्वीकारले नाही तर जीव देईन म्हणून हा जवळ अफीम बाळगून आहे.'' नवाबाने विचारले, '' ही अफू तू आणणार कुठून?'' बाबांनी स्वत:जवळचा मोठा अफूचा गोळा दाखवला. नवाबही चकित झाले. आपल्याबरोबर इमीद मंजिल या हवेलीवर घेऊन गेले. सेक्रेटरीला सांगून खानसाहेबांना बोलावून घेतलं आणि म्हणाले, ''या तरुणाला आपण शिष्य म्हणून स्वीकारावे अन्यथा हा आत्महत्या करेल.'' खानसाहेबांनी दरबारातच बाबांचे गंडाबंधन केले.

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

ह्या प्रसंगानंतर पुष्कळ दिवस गेले. वजिर खान अत्यंत व्यग्र आणि स्वत:मध्येच मस्त ! कोणा तरुणाला आपण शिष्य बनवलं आहे ही गोष्ट साफ विसरून गेले. मात्र या काळात बाबा रोज खानसाहेबांच्या घरी जात. दाराबाहेर उभे राहात. कुणीही त्यांना आत याही म्हणत नसे.

त्या सुमारास शिवपुरात बातमी पोचली की बाबा रामपुरात आहेत. उ. वजिर खानांचे शार्गिद आहेत. बाबांचा विवाह खूप लहान वयात झाला होता. बाबा घरातून निघून गेल्यापासून त्यांची काहीच खबरबात नव्हती. बाबांच्या पत्नीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. ही दुर्घटना कळवणारं पत्रं बाबांच्या कुटुंबियांनी उ. वजिर खान साहेबांना लिहिलं. हे पत्र मिळताच वजिर खान साहेबांनी चौकशी केली. ''हा तरुण आहे तरी कोण?'' त्यांना घरच्यांनी सांगितलं की एक तरुण रोज येतो आणि तुम्ही बोलावण्याची वाट पाहात उभा राहतो आणि जातो.

''किती दिवसांपासून?''

''जवळ जवळ दोन वर्षं.''

वजिर साहेबांना धक्काच बसला. त्यांनी बाबांना बोलावलं. इतका काळ हा मुलगा प्रतीक्षा करत राहिला? त्यांना मग आठवलं की नवाबसाहेब त्याची स्तुती करत होते आणि आपण त्याचं गंडाबंधनही केलं आहे. त्या पत्राबद्दल बाबांना विचारलं, ''तू विवाहित आहेस?'' ''हा खूप लहानपणीच लग्न झालं.''

''कुटुंबाची हाल-हवाल जाणून घ्यावीशी वाटली नाही?''

''संगीतासाठी मी सर्वस्वाचा त्याग केला आहे. मला काय माहिती.'

वजिर साहेबांनी शिलपुरची गोष्ट सांगितली. म्हणाले, ''नक्की शिकवीन. तू पात्र शिष्य आहेस पण तीन महिने गावी जाऊन ये. त्या सर्वांना शांती मिळेल. तुझ्या पत्नीने आत्महत्येचा प्रयत्न केलाय. घरचे सगळे काळजी आहेत. तुला जायलाच हवं.''

''हे तर काही शक्य नाही. आपण का माझा व्रतभंग करीत आहात? मला का बंधनात अडकवता आहात? माझं ध्येय एकच - संगीत !''

ज्ञानोपासनेबद्दल त्याचा अढळ निश्चय बघून वजिरसाहेब म्हणाले, ''ठीक आहे. तुला एक महिना शिकवीन. मग तू शिवापुरला जाऊन पर यायचंस. पण जायचं हे नक्की आणि मी तुला शिकवीन हे नक्की !''

वजिर साहेब हे विद्वान, गुणी आणि प्रख्यात बीनकार (वीणावादक) होते. शिवाय उत्तम गायकही होते. धृपदच्या अंगानं वीणावादन करीत. बाबा उस्तादजींकडे बरीच वर्ष शिकले. त्यांच्या पत्नी उत्कृष्ट सतार वाजवत असत. बाबा त्यांच्याकडून सतारीच्या गती शिकले.

बाबांना खरं तर वाजिरखाँकडून वीणा शिकायची होती. पण ते त्यांच्या कुटुंबियांतील

सदस्यांशिवाय कोणालाही वीणा शिकवीत नसत. बाबांची ग्रहणशक्ती आणि ध्येयनिष्ठा बघून त्यांनी बाबांना पुष्कळ वर्ष सरोद शिकवले. बाबांनी स्वत:च्या घड्यात पुष्कळ विद्या जमविली. असं सांगतात की वयाच्या ५०-५५ व्या वर्षापर्यंत बाबा वजिरखान साहेबांपाशी शिकले.

साधनेच्या अखेरीच त्यांना निरोप देताना वजिनखानसाहेब म्हणाले, ''बेटा, भारत भ्रमण कर. शिक्षा, दीक्षा आणि परीक्षा हाच त्याचा हेतू! कित्येक विद्वान भेटतील, गुणीजन भेटतील, विविध प्रदेशातील विविध व्यक्तींच्या भेटी घडतील. तर अनेक अनुभव मिळवील. तुला जे मिळालय ते प्रस्तुत कर. लोकांना दे. तुझी परीक्षा आणि प्रशंसा दोन्ही होईल. अनुभवाने तुझे बाह्य व अंतरिक विश्व विस्तृत होईल.''

वयाच्या आठव्या वर्षी सुरू झालेली विद्यार्जनाची ही यात्रा ५५ वर्षांपर्यंत चालू राहिली. स्वत:ची उपजीविका, कुटुंब, ऐश्वर्य कसलीच पर्वा न करता कित्येक गुरू बनवले. प्रतीक्षा केल्या आणि दु:ख सोसलं. तहान-भूक सहन केली आणि विद्या संपादन केली. प्रचंड जिज्ञासा, अथक तप, प्रबळ त्यागवृत्ती, अद्वितीय गुरुभक्ती आणि पवित्र हृदयाचं मूर्तिमंत उदाहरण होते बाबा !

बाबांच्या या दीर्घ साधनेचं आणि संघर्षयात्रेचं वर्णन करण्याचं कारण हे की माताजी जेव्हा सांगतात की, ''बाबाने बहुत कष्ट करके पाया और हमें तो एकही जगह पर सब तैयार मिला । इसकी कीमत तो गुणी ही कर सकता है।'' यातलं सत्य, ज्याला बाबांची ही संघर्षयात्रा समजेल आणि जो यावर चिंतन करेल त्यालाच कळेल. आजच्या काळात ज्ञानासाठी प्रतिकूल परिस्थितीही लढा देण्याचं वेड आणि बळ भाग्यानंच एखाद्याला मिळतं.

त्यानंतर बाबा महियरला आले आणि दरबारी संगीतकाराचे स्थान त्यांना मिळाले हे आपण जाणताच !

खूप काळानंतर... एकदा बाबा बाजारात चालले असताना त्यांना उ. वजिरखानांचा टेलिगाम मिळाला की त्यांच्या पुत्राचे देहावसान झाले. कोणालाही न सांगता बाबा घातल्या वस्त्रानिशी स्वत:च्या गुरुंकडे जाऊन पोहोचले. वजिरखान साहेब अत्यंत दु:खात होते. तरुण मुलाचा मृत्यू ही फारच भयंकर गोष्ट. बाबांना भेटून खूप रडले. म्हणाले, ''मी तुला वीणेचे अंग वीणेवरच शिकवायला हवे होते. आता शिकवीन. तूच खरा उत्तराधिकारी आहेस.''

वजिरसाहेबांच्या घराण्याची परंपरा होती - कुटुंबाबाहेरच्या कोणासही वीणा शिकवायची नाही. बाबा म्हणाले, ''माझ्यासाठी आपण आपली कुटुंब परंपरा का मोडता?''

त्यांना खानसाहेबांनी सूरसिंगाश्वर हे अंग शिकवले आणि बाबांनी माँ ना सूरबहार वर !

विवेकानंद म्हणत, ''जो महान शिष्य होऊ शकतो तोच महान गुरू बनू शकतो.'' त्याची प्रचीती बाबांच्या जीवनातून येते.

संपूर्ण शतकामध्ये भारतातील, राजकीय, वैज्ञानिक, सामाजिक, सांस्कृतिक, व्यावसायिक


ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

स्तरावरील विविध कार्यांमध्ये मौलिक योगदान देणाऱ्या वीस व्यक्तींची नाव सरकारनं जाहिर केली. त्यात बाबा अल्लाउद्दिन खानांचे नाव आहे. निवड समितीच्या सदस्यांपैकी अर्ध्याहून अधिकांनी तर त्यांचे नाव पहिल्या सहामध्ये सुचविले आहे.

बाबा खरोखरच युगपुरुष होते. आणि त्यासाठीच जन्मले होते. त्यांची साधना होती वयाच्या आठव्या वर्षापासून एकशे दहाव्या वर्षांपर्यंत. या महापुरुषाने १०२ वर्षे संगीत-साधना, संगीत-सेवा केली. त्यांच्या अविरत साधनेकडे दृष्टिक्षेप टाकला तर असं दिसतं की महान होण्यासाठी जन्माला आलेल्या व्यक्तींना सफलतेच्या शिखरावर आरोहण करण्यासाठी किती संघर्ष, साहस आणि सहनशीलतेसारख्या गुणांनी जीवनसागरात बुडी मारावी लागते. असंख्य वर्षांपासून अशी विभूति साधकांना प्रेरणापंथ दाखवीत असतात. एक महामार्ग / दर्शकपथ तयार करत असतात ज्यायोगे इतरांना सुकर मार्गांनी गन्तव्यस्थांनी पोचता येते.

# सिद्ध संगीतज्ज्ञ बाबा

महियरमधील दीर्घ वास्तव्याच्या काळात महियरमध्ये विराजमान माता शारदेचे, बाबा अल्लादिनखान, निस्सीम भक्त होते. ७०० पायऱ्या असलेल्या टेकडीवर विराजित माता शारदेच्या दर्शनाला दररोज जात अन् जन्माने मुस्लिम असल्याने दिवसातून पाच वेळा नमाजही पडत. इस्लामच्या निर्गुण निराकार अल्लाची बंदगी करून कृतज्ञ माणूस म्हणून ईश्वराच्या सगुण साकार शक्तीरूपासमोर माथाही टेकवत. बांग्लादेशात / बंगालप्रांतला शिवोपासनेने सुरू झालेली स्वरयात्रा महियरमध्ये शक्तिउपासनेत परिवर्तित झाली / चालू राहिली.


निरपेक्ष धार्मिक वृत्तीचे ते संत होते, खंरतर ते संत म्हणून जन्मले आणि संगीतकार झाले असं म्हणणं योग्य होईल. संतस्वभाव हा परमेश्वराच्या असीम कृपेने मिळालेल्या जीवाचा गुणधर्म आहे तर समर्थ संगीतज्ञता ही साधनेच्या पराकाष्ठेला पोचलेल्या जीवावर शिव आणि शक्तीने केलेला अभिषेक आहे.

बाबांची सरस्वतीमातेवर अगाध श्रद्धा, पण दुसऱ्या धर्माचे असल्याने पुजारी त्यांना मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करण्यास अटकाव करीत. बाबा बाहेरूनच दर्शन करून जात असत. पण एक दिवस भल्या पहाटे पुजारी महाराजांना भेटायला आला. खूप घाबरलेला आणि चिंताग्रस्त होता.

महाराजांनी पुजाऱ्याला पाहून विचारलं, ''भूदेव ! इतक्या सकाळी सकाळी कसं काय येणं केलं?'' पुजारी म्हणाला, 'राजाजी ! काल रात्री एक विचित्र घटना घडली. आपली महियरची शारदा माता माझ्या स्वप्नात आली. खूप कोपली होती. मला विचारू लागली की माझ्या खऱ्या भक्ताला गाभाऱ्यात येण्यास प्रतिबंध करतोस?'' आता काय करू? कोणाचे ऐकू? देवीच्या आज्ञेचा उपमर्द करणे तर शक्य नाही.

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com




**बाबा अल्लाउद्दिनखान**

राजाजी म्हणाले ‘‘काही प्रश्न नाही तू त्या भक्ताला गाभाऱ्यात जाण्याची मुभा दे. माझी संमती आहे.’’

अशा तऱ्हेने एका सच्च्या भक्ताला देवीनं समोर येऊन आपल्या चरणांशी जागा दिली. दुसऱ्या धर्माचे असूनही शारदा मातेच्या मंदिरात गाभाऱ्यात प्रवेश करू शकणारे बाबा हे एकमेव भक्त होते.

भक्ती माणसाला धर्माने उभ्या केलेल्या भिंतींच्या पार घेऊन जाते. जिला कोणत्याही सीमा/मर्यादा नसतात. केवळ श्रद्धायुक्त संपूर्ण शरणागती हेच प्रमाणपत्र तिथे बघितलं जातं.

असाच एक प्रसंग बाबांच्या जीवनात घडला. बाबांच्या दक्षिणभारताच्या प्रवासात एक पिल्ले नावाचे मृदंगवादक होते. ते शिवभक्त होते. त्यांनी बाबांना आपल्या घरी बोलावले. तिथे शिवमंदिर आणि त्यात बांधलेली सुंदर पुजा बघून बाबांना स्वत:चं संगीत भोलेनाथाच्या चरणी अर्पण करण्याची बुद्धी झाली. त्यांनी श्री पिल्लेंपाशी ही गोष्ट काढली. पण पिल्ले कर्मठ हिंदू होते. थोडे घाबरत म्हणाले, ‘‘आपण जरूर वादन करा पण मंदिरात प्रवेश शक्य नाही.’’ बाबा म्हणाले, ‘‘काही हरकत नाही, बाहेर बसून वाजवेन.’’

मस्जिद मुल्ला बांग पुकारे क्या मेरा साहेब बहिरा?<br>
चींटी के पांव में नुपूर बाजे मेरा साहेब सुनता है ॥

या भक्त संगीतकाराच्या मागे महान संत कबीर उभे होते. मुंगीच्या इवल्याशा पायात बांधलेल्या घुंगरांचा नाद ऐकू शकणारा, माझ्या वाद्याचा सुरेल झंकार नक्कीच ऐकू शकेल. बाबांनी तल्लीन होऊन वादन केलं. भगवान शिवांचं स्वरपूजन केलं !

दिवस सरला. रात्री बाबा तिथेच राहणार होते. दुसऱ्या दिवशी पहाटे -पहाटेच श्री पिल्ले धावत आले आणि बाबांच्या पाया पडू लागले. म्हणू लागले, ‘‘बाबा मला माफ करा. माझ्याकडून अपराध झाला. तुमच्या आणि माझ्या कुलदैवताचा शिवाचा अपराध झाला.’’

बाबांना काहीच उमजेना. ते निरागस सहजतेने म्हणाले, ‘‘हे आपण काय करतायं? काहीच समजत नाही.’’

तेव्हा पिल्ले म्हणाले, ‘‘काल रात्री मी झोपलो अन् पहिल्या प्रहरीच भगवान शिव स्वप्नात आले म्हणाले, ‘‘हे तू काय करतोयस? माझ्या सच्च्या भक्ताला माझ्यापासून विन्मुख करतोयस ? त्याला मंदिरात प्रवेश का नाकारलास?’’ बाबांनी त्यांना शांत केलं आणि म्हणाले, ‘‘चिंता करू नका. आपण कुल परंपरेनुसार वागलात. अहो मी शिव मंदिराबाहेर होतो हे खरं ! पण शिवाजी माझ्या आत होते ना?’’

* * *

बाबांनी तेव्हा शंभरी पार केली होती. ‘पद्मविभूषण’ने सन्मानित झाले होते. देश-विदेशात त्यांच्या

ebook by e sahity pratishthan

 www.esahity.com

संगीताचा खूप बोलबाला झाला होता. अनेक शिष्यांनी पण मोठं नाव काढलं होतं. इतक्या वर्षांची संगीतसाधना, अनेक वाद्यांवरचं प्रभुत्व ! त्यांना एकांनी विचारलं, ''आपलं इतकं अगाध ज्ञान, अनुभव आणि यश - बाबा आपल्याला आता कसं वाटतं?''

खूप विनम्रपणे बाबा म्हणाले, ''बेटा ! अभी संगीतकी थोडी समक्ष आने लगी है, तब जाने का वक्त आ गया।''

या वाक्याचा अर्थ कळायला एक समर्पिज जीवन जगावं लागतं. अंत:करणाच्या गहराईतून, संगीताच्या सधन साधनेनंतर माँ शारदेच्या चरणावर माथा टेकवणाऱ्या संगीत सम्राटाची ही अनुभती आहे.

माँचे शिष्य बासरीवादक श्री नित्यानंद हळदीपूर दोन वर्षापूर्वी बांग्लादेशाला गेले होते. त्यांना तिथे बासरीवादनासाठी निमंत्रण मिळाले होते. बांग्लादेशाचे सुप्रसिद्ध वकील श्री. तौफिक नवाझ यांनी त्यांचे कॉन्सर्ट ठेवले होते. नवाझ साहेबांच्या पत्नी श्रीमती दीपु मौनी सध्या बांग्लादेशच्या विदेशमंत्री आहेत.

श्री ऋत्विक घटक म्हणून एक प्रतिष्ठित चित्रपट निर्मिते दिग्दर्शक होते. चांगल्या दर्जाच्या चित्रपट निर्मात्यांमध्ये त्यांचे नाव गणले जाते. त्यांनी बाबांवर एक फिल्म बनवली होती. ज्या कार्यक्रमात श्री. नित्यानंदांनी वादन केले त्याच्या श्रोतृंगणामध्ये श्री ऋत्विक घटक यांच्या भगिनी श्रीमती प्रोतितीदेवी होत्या. त्यांनी त्यांच्या आठवणीतला एक घडलेला प्रसंग सांगितला -

''तेव्हा माझं वय खूप लहान होतं. अवघं आठ नऊ वर्षांचं असेल. बाबा एकांतामध्ये स्वत:च्या रियाझ करत असत. तेव्हा त्यांना बांग्लादेशातच कार्यक्रमाचं निमंत्रण मिळालं होतं. त्यांचा मुक्काम आमच्याकडेच होता. बाबा जेव्हा रियाझ करीत तेव्हा तिथं कोणी जाऊ शकत नसे. रात्रीच्या शांत वातावरणात सरोदचे मधुर स्वर वाहात होते. सगळं वातावरणच संगीतमय झालं होतं. मी आणि माझी आई दाराआडून बाबांना कळणार नाही अशा तऱ्हेने उभ्या राहून पाहात होतो आणि ऐकतही होतो. बाबा शांतपणे डोळे मिटून वाजवत होते. पुष्कळ काळ गेला. जणू सूरसमाधीमध्ये लीन झाले होते. लय जसजशी वाढत गेली तसे बाबा आणखी खोल उतरू लागले. बाहेरच्या जगाशी काही संपर्क उरला नाही. त्यांना कसलंच भान नव्हतं. त्यावेळी विश्वास बसणार नाही अशी घटना घडली. बाबांच्या शरीराचा वर्ण तेजोमय होऊ लागला. कांती सुवर्णमय दिसू लागली. माझं बालमन आश्चर्याने थक्क झालं. मी आईला म्हणाले, ''आई हे ग काय?'' आई एवढंच म्हणाली, ''हा तर दिव्य पुरुष ! देवमाणूस !'' ही गोष्ट प्रत्यक्षात बघितली. अनुभवली तरच कळेल. बाबा कोण होते? कसं सांगू तुला?''

बाबा तल्लीन झाले होते. स्वत:चं अस्तित्व विसरून अहंकार शून्य झाले होते. त्यांचं काहीच राहिलं नव्हतं. अहंकार नाही - तुम्ही आहात. तुम्ही न करता सुद्धा कार्य घडत आहे. जो माणूस अशा अवस्थेला पोहोचतो त्याचं आंतरिक तेज संपूर्ण देशाला व्यापतं आणि त्याच्यातला 'दिव्य पुरुष' प्रकट होतो. त्याच्या तारा अनंताशी जुळलेल्या असतात.


स्वामी शारदानंदजी लिखित रामकृष्ण लीलामृतामध्ये ही परमहंसांच्या अशाच अवस्थेचे वर्णन केले आहे. साधनेच्या परमसीमेला पोचलेल्या रामकृष्णांचा देह सुद्धा स्वर्णमयी कांतीचा झाला होता. त्यामुळे लोक जेव्हा येत तेव्हा परमहंस कालीमातेला विनंती करीत की, ''हे रूप परत घे.'' ज्याच्या देहरूप साधनेच्या तारा अनंताच्या खुंटीला जोडलेल्या असतात त्यांच्या क्रिया दिव्य होतात. बाबा तर दिव्य होतेच परंतु ज्यांनी स्वत:च्या चर्मचक्षुंनी ही घटना बघितली त्यांचाही आदर वाटतो.

श्री तौफिक नवास हे श्री तौफिक उल रहमानांचे सुपुत्र ! ते पन्नालाल घोषांकडे बासरी शिकत असत. बाबांनी ज्या कार्यक्रमात वादन केले त्याचे तिकिटही तौफिक साहेबांनी जपून ठेवले आहे. दोन वर्षापूर्वी त्यांच्या पत्नी डॉ. दीपू मौनी बांग्लादेशच्या विदेशमंत्री म्हणून भारतात आल्या. त्या खास माँना भेटायला आल्या. माँना बघितल्यावर इतक्या वर्षांनीसुद्धा त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. माँनी त्यांना शांत केलं. आशीर्वाद दिला.

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

गगन गुहेतून याचे गुंजन
प्रसन्नता ओठांवर ।
अंतरंगीची तार जोडली
अनंताच्या खुंटीवर ।



बाबा अल्लाउद्दिनखान

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com 

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

# नित्यक्रम

संगीतविद्या आत्मसात करण्यासाठी खूप कठीण परिश्रम करावे लागतात. शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत महान संगीत कलाकार जेव्हा प्रस्तुती करतात तेव्हा श्रोतृवृंदांपैकी अनेकांना असं वाटतं की हे फारच सोपं आहे. पण प्रयत्न करणाऱ्यालाच कळतं की ते किती अवघड आणि दु:ष्प्राप्य आहे.

साधनेच्या काळात या महान संगीतकारांचा साधनाक्रम कसा असतो? किती काळ ऊर्जा (शक्ति) लावली तर कुठवर पोचता येते? संगीताच्या सच्च्या विद्यार्थ्यांना असे प्रश्न पडणं साहजिकच आहे.

माँनी स्वत:च्या महियरमधल्या साधनेच्या वेळापत्राबद्दल सांगितलं होतं की

सकाळी ४ वा. उठणे ४ ते ७ हाताची प्रॅक्टिस

७ नंतर अर्ध्यातासात हातपाय तोंड धुवून नाश्ता पुढे १० पर्यंत रियाज.

१० ते ११.३० स्नानादि नित्यक्रम / नित्यकर्म.

१२.३० ते १ रियाज मग जेवण व वाचन पुन्हा संध्याकाळी ६ पर्यंत रियाज.

नंतर थोडावेळ खेळायला/ विरंगुळा.

सायंकाळी ७.३० पासून १० पर्यंत बाबांकडून शिकणं. रात्री ११ वाजता झोपणं.

असा होता आमचा दिनक्रम. क्षण न् क्षण संगीतासाठी. कलेची सूक्ष्म जाण नैसर्गिकरित्या निर्माण होण्यासाठी पण अथक परिश्रमांची आवश्यकता असते. अन् तेही वर्षानुवर्ष केलं तर कुठे संगीताचं तत्त्व अवगत होतं. असं करता करता संगीत हाच तुमचा स्वभाव बनतो. अवघड रागांवर सहज प्रभुत्व मिळतं. विविध ताल छंद लयकारी सगळं काही कायमचं आत्मसात होतं.

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# माँ अनासक्त साधक

संगीत विश्वात मिया तानसेनांना कोण ओळखत नाही? अकबर बादशाहच्या नवरत्नांपैकी एक विद्वान संगीतकार! ज्यांनी आपल्या कंठमाधुर्याने अकबर बादशहालाही प्रभावित केले होते. अशा मधुर गाणाऱ्या गुरुंचे गाणे किती मधुर असेल? हा प्रश्न मनात येताच बादशहाला तानसेनांच्या गुरुंचे नाव ऐकण्याची इच्छा झाली. तानसेनांचे गुरू संत हरिदास हे त्यागी वृत्तीचे संत होते.

बादशहांच्या विनंती आणि आग्रहावरून सुद्धा ते दरबारात आले नाहीत. तीव्र इच्छा असल्याने बादहशाचा तानसेनांचा शिष्य बनून त्यांच्याकडे गेला. हरिदासांचे थेट अंतर्आत्म्याला स्पर्श करणारे गाणे ऐकून बादशहांच्या तोंडून सहजस्फूर्तीने 'सुभानल्ला सुभानअल्ला'' असे शब्द बाहेर पडले. स्वामीजींनी पण ''बादशहांचे स्वागत आहे'' असे म्हणून अभिवादन केले.

बादशहांनी आपल्या मनातला प्रश्न स्वामी हरिदासांना विचारला, ''जर तानसेन आपले शिष्य आहेत तर त्यांच्या आणि आपल्या गाण्यात इतका फरक कसा ? तुम्ही तर सर्वसंग परित्यागी मग आपल्या ज्ञानाचा काही भाग का बरं स्वत:पाशीच ठेवून घेतला? मिया तानसेनांना का बरं नाही शिकवला?

त्यांना स्वामी हरिदासांनी दिलेलं उत्तर संगीतविश्वासाठी एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे प्रेरणादायक आहे. फार अप्रतिम भाव त्यात बघायला मिळतो.

''जहापनाह ! तानसेन तर माझा प्रिय शिष्य ! मी तर साधू ! मी माझी विद्या बरोबर थोडीच घेऊन जाणार आहे ? न माझ्या शिकण्यात काही त्रूटी आहे ना तानसेनच्या रियाजात / साधनेत. पण फरक इतकाच की तानसेन दिल्लीच्या बादहशाला खुश करण्यासाठी गातो आणि मी विश्वाच्या बादशहाला खुश करण्यासाठी !''

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

हे उत्तर प्रत्येक संगीत साधकासाठी इतकं महत्त्वाचं आहे की ज्याला संगीतविद्येच्या चरम सीमेवर पोचण्याची इच्छा आहे आणि आत्मस्पर्शी संगीताची निर्मिती करायची आहे त्याने आपल्यातील गुणांचा विकास करण्याला पर्याय नाही.

ज्यांनी ज्यांनी या प्रसंगावर विचार केलास त्यांच्या लक्षात येतं की आजच्या काळात अशी व्यक्मितत्त्व कुठे असू शकतात? दूरपर्यंत नजर टाकली तरी अशी व्यक्तिमत्त्व दृष्टिपथात येत नाहीत.

जेव्हा आपले राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम होते तेव्हा श्रीमती सोनल मानसिंग संगीत नाटक ॲकॅडमीच्या चेअरमन होत्या. त्यांनी माताजींना पत्राने कळविले की संगीत नाटक अकादमीच्या फेलोशिपसाठी माताजींची निवड झाली आहे. जर त्या हा सन्मान घेण्यासाठी विज्ञानभवनात स्वत: आल्या तर राष्ट्रपती केवळ ४५ मिनिटे येण्याचा प्रघात मोडून ४५ मिनिटे अधिक वेळ थांबतील. राष्ट्रपतींनी दीड तास येऊन माताजींचं दैवी संगीत ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे.

हा एक असा सन्मान आहे की जो केवळ हयात असलेल्या ४० व्यक्तींना देण्यात येतो आणि त्यांच्यामधील ........................ माँनी पत्राने कळवलं की अनेक वर्षापासून माझे गुरू बाबा आणि सरस्वतीच्या मूर्तीसमोरच मी वादन करते. माझ्या शिष्यांना पण मी गाऊनच शिकवते. या कारणाने मी आदरपूर्वक हा पुरस्कार स्वीकारते पण तिथे न येण्याबद्दल क्षमा मागते.

एक अत्यंत ज्ञानी अणि विज्ञान उपासक अब्दुल कलामजीचं अशा व्यक्तीचे जीवनव्रत समजू शकतात. एकीकडे अशा मानसन्मान प्रसिद्धीची/प्रतिष्ठेची कुठलीही हाव नाही कसलाही प्रयत्न नाही. जणू झाडावरून पडलेलं फळ हे घेण्यास कोण येणार नाही? परमेश्वर आणि गुरूंचा प्रसाद समजून त्याचा स्वीकार केला.

आजच्या काळात असा सन्मान मिळत असताना आणि तोही जेव्हा राष्ट्राच्या राष्ट्रपतींनी नियमांमध्ये बदल करण्याची तयारी दाखवली असताना कोणाला मोह होणार नाही? कोणाचं मन डळमळणार नाही? त्या महान व्यक्तीचं मन राखण्यासाठी तरी एखादा तयार झाला असता; पण पूर्ण अनासक्ती ! अशा अनासक्त संगीतज्ज्ञासाठी, त्याच्या सन्मानासाठी असाच एखादा राष्ट्रपती नियमांना अपवाद करू कशेल. दोन्हींकडूनही उज्ज्वल संदेश घेण्यासारखा आहे. एका बाजूला राष्ट्रपतींकडूनही कसलाही आग्रह नाही तर दुसरीकडे मान-सन्मान मिळवण्याची कुठली लालसा नाही.

दिल्लीच्या बादशहाला स्वामी हरिदासांनी दिलेलं उत्तर आणि संगीत अकादमीच्या फेलोशिपचा स्वीकार करताना व्यक्त केलेली नम्र भावना !

केवळ ईश्वरलाच कलेचं समर्पण आणि शिष्यांना प्रसाद रूपानं देणं हाच संतोष !

स्वामी हरिदासांच्या उत्तराने माझ्यावर फार परिणाम केला होता आणि माँची भेट झाल्यावर अशा

# सोनल मानसिंगद्वारा मा अन्नपूर्णादेवींना संगीत-नाटक अकादमीच्या फेलोशिप स्वीकारण्यासाठी पाठविलेले निमंत्रण पत्र

Sonal Mansingh
CHARIMAN

संगीत नाटक अकादेमी Sangeet Natak Akademi
NATIONAL ACADEMY OF MUSIC, DANCE AND DRAMA

APRIL 8, 2005

Respected Smt. Annapoornaji
Namaskar.

It would be in the fitness of the occasion if you graciously agree to make an exception for the Sangeet Natak Akademi and the President of India by offering your divine music after the Awards Ceremony at Vigyan Bhavan, New Delhi. As you are aware the function is scheduled for 13th May 2005. For your kind information initially the President had given us only 45 minutes for the ceremony. Upon my request and assurance that you might agree to play on the occasion as a rare exception he has now agreed for another 45 minutes making one of the longest duration accepted by the President of India. I can only invoke Ma Sharada's blessings and revered Baba's name to persuade you.

I hope to hear from you at the earliest in this regard because the invitations have to be printed and mailed very soon.

With warm regards to you and Shri Rishi Kumar Pandya.

SONAL MANSINGH

Smt.Annapurna Devi Pandya
6A Akashganga
89 Warden Road
MUMBAI 400 026
MAHARASHTRA

RABINDRA BHAVAN, FEROZESHAH ROAD, NEW DELHI 110 001
Phone: 2338?648, 23387246-8. Telefax: 23?81621. Grams : NATAKADEMI

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

# मा अन्नपूर्णादेवींद्वारा सोनल मानसिंग यांच्या पत्राला पाठविलेले उत्तर

Padmabhushan Dr.. Annapurna Devi
Mumbai 400026

Ms. Sonal Mansingh, Chairperson
Sangeet Natak Akademi
New Delhi

April 11, 2005

Respected Sonalji,

Namaskar.

Thank you so much for you kind letter dated April 8, 2005.

With reference to your suggestion, may I humbly share my predicament with you? You might not be aware that for the last 35 years or so I have not gone out socially or performed anywhere. As a rule, I only meet my students when they come to learn from me.

As for playing, I took a vow to play/practice only in front of Baba's photo. Sonalji, I respect you immensely both as a person and as an artist. Had it not been for the vow, I would have definitely come and played...However, since that cannot be, I apologize to you for not being able to attend the Awards Ceremony at New Delhi. I hope you will forgive me for this. I also request you please to convey my apologies to Bharat Ratna Dr. A.P.J. Abdul Kalamsaheb, the . President of India. Thank you. Please also let me know, if I can send somebody to receive the Award on my behalf. I am really sorry for causing all this inconvenience to you.

Sonalji, may I take the liberty to suggest that if you are planning to have a music program on the 13th of May, please consider inviting either Shree Nityanand Haldipur, flute, Phone: 022-2646-0497 or Shree Basant Kabra, sarod, Phone: 0291-254-8656,

Shree Pandyaji sends his very best to you.

With apologies, thanks and regards, I remain,

Yours sincerely,

Annapurna Devi

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

व्यक्तीच्या चरणापाशी बसून त्याच्या सान्निध्याचा लाभ घेण्याची इच्छा परमेश्वरकृपेने पूर्ण झाली. माँच्या प्रत्येक शिष्याला यातील गौरव अनुभवास येतो.

पंडित रविशंकर जेव्हा दिल्लीत ऑल इंडिया रेडिओ मध्ये संचालक (Director) होते तेव्हा पं. जवाहरलाल नेहरू आणि श्रीमती इंदिरा गांधी यांनी पं. रविशंकर आणि अन्नपूर्णादेवी यांना अनेकदा ऐकलं होतं. माँच्या सतार आणि सूरबहार वादनाने इंदिराजी फारच प्रभावित झाल्या होत्या.

जगप्रसिद्ध व्हायोलिन वादक येहुदी मेन्युहीन यांनी पं. रविशंकरांबरोबर व्हायोलिन-सतार जुगलबंदी वाजवलेल्या अल्बममधील सर्व कलाकारांना Grammy award मिळालं होतं. येहुदी मेल्युहीन Human Understanding चा पुरस्कार घेण्यासाठी भारतात येणार होते. पं. नेहरूंच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार होता. त्यावेळी इंदिराजींनी माँचा सल्ला विचारला की या विख्यात संगीतकारास आपण भारत सरकारच्या वतीनं काय भेट द्यावी ?

माँनी त्यांना सांगितले की वाद्यांमध्ये भारताची ओळख निर्माण करणारं वाद्य म्हणजे - सरस्वती वीणा. त्यामुळे या महान तंतुवादकास रुद्रवीणाच भेट देणे योग्य. इंदिराजींनी पुढे यहुदी मेनन यांना रुद्रवीणाच भेट म्हणून दिली.

तसं तर माँनी फारच थोड्या मैफिलींतून वादन केलंय. पण दिल्लीच्या निवासादरम्यान माँ एक प्रतिभासंपन्न समर्थ संगीतकार म्हणून इंदिराजींना माहीत होत्या. त्यामुळेच माँना पद्मभूषण सन्मान देण्याचं त्यांनी नक्की केलं. माँचं नाव जाहीर करण्यापूर्वी त्यांनी फोन करून विचारलं, ''आप ॲवॉर्ड का स्वीकार दिल्ली में आकर करेंगी ना ?'' त्यांनी तितक्याच विनम्रपणे सांगितलं, ''आपको तो मालूम है मैं कहीं जाती नहीं । मुझे क्षमा करना ।'' दोन-चार दिवसातच पुरस्काराचं प्रमाणपत्र भारत सरकारकडून रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात आलं.

इंदिराजींसारख्या प्रतिभावान आणि स्वाभिमानी स्त्री असं कुणाला कधी विचारतील का? तुम्ही पुरस्कार स्वीकारायला याल ना? हा पुरस्कार मिळवण्यासाठी तर कित्येक लोक दिल्लीकडे तोंड करून बसलेले असतात. आपली वर्णी लागावी म्हणून धडपडत असतात. पैकी कित्येक तर मला पद्मविभूषण नको भारतरत्नच पाहिजे म्हणून अडून बसतात. अन् या सर्वांपेक्षा उलट माँ.... प्रयत्न किंवा आग्रह तर सोडाच, पण भारताच्या पंतप्रधानांनी दिल्लीला येण्याचं निमंत्रण दिलेलं असतानाही पुरस्काराचा विनम्रपणे स्वीकार करून समारंभापासून दूर राहणं पसंत केलं.

नोबेल पुरस्कार विजेते जगप्रसिद्ध कवीवर्य रवीन्द्रनाथ टागोरांनी स्थापन केलेल्या 'विश्वभारती' विद्यापीठातर्फे एक 'देशिकोत्तम' नावाचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार दिला जातो. इतर विद्यापीठांकडून दिल्या जाणाऱ्या 'डी.लिट्.'च्या स्तराचा हा पुरस्कार असतो. या पुरस्काराचं एक वेगळं स्थान आहे.

या पुरस्काराच्या वितरण सोहळ्यातही आपण उपस्थित राहू शकणार नसल्याचं माँनी उपकुलपतींना कळवलं होतं. उपकुलपती प्रा. सिन्हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी माँच्या घरी आले. प्रथा अशी होती की या समारंभात एखाद्या प्रसिद्ध गायकाचे किंवा वादकाचे गायन-वादन होत असे. त्यानुसार प्रसिद्ध सतारवादक अल्लादिन खाँ साहेबांचे सुशिष्य असलेल्या तिमिरबरणजींचे पुत्र इंद्रनील भट्टाचार्य यांचे माँच्या घरी सतारवादन झाले आणि त्यानंतर माँ ना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

लंडनमधील शास्त्रीय संगीताच्या चाहत्या असलेल्या एका सदगृहस्थांनी माँचं सगळं संगीत रेकॉर्ड करण्याची तयारी दाखवली होती. तुम्ही मागाल ते देतो. तुम्हाला जेवढं म्हणून वाजवता येते ते मी सगळं साठवून ठेवतो. तुम्ही मागाल ते देतो.

पण या तर अन्नपूर्णादेवी ! त्यांना संपत्ती आणि साधना या फार वेगळ्या गोष्टी !

माँ सारख्या महान संगीतकाराच्या संगीतापासून संगीतविश्व आणि संगीत साधक पिढी वंचित राहील. हे उत्कृष्ट संगीत ऐकून कोणीतरी ते शिकू शकेल अशी भावना या रेकॉर्ड करू इच्छिणाऱ्या माणसाच्या मनात असेल. माँच्या अनेक शिष्यांची पण अशीच इच्छा होती. कुठल्याही व्यक्तिगत अथवा भौतिक लाभाची अपेक्षा न ठेवता माँचं संगीत रेकार्ड केलं पाहिजे.

या सगळ्या बद्दल माँचं ठाम मत होतं की कोणाला जर भारतीय संगीताचे जतन शुद्ध स्वरूपात करायचे असेल तर ते कॅसेट, सी.डी. अशा गोष्टींनी नाही करता येणार. ही गुरुमुखी विद्या आहे. समर्थ गुरूच्या हाताखाली दीर्घ काळ तालीम मिळालेलाच शिष्य हे संगीत शिकू शकेल आणि जतन करू शकेल.

काही वर्षापूर्वी ही गोष्ट समाजायला/ पटायला अवघड वाटत होती. पण आता हे समजू लागलंय की आज संगीत विश्वातील कित्येक महान संगीतकारांच्या सी.डी. इत्यादी उपलब्ध आहेत. पण त्या ऐकून ऐकून किती जण त्या कलाकारांसारखं किंवा त्यांच्या जवळपास सुद्धा जाणारं गाऊ वाजवू शकतात? किती एकलव्य झाले? आणि संगीतविश्वात त्यांनी स्वत:चं नाव कमावलं? किती जण पं. रविशंकर, उ. अलि अकबर खान वा. उ. विलायत खानांसारखं वाजवतात? पं. भीमसेन जोशी अथवा ओंकारनाथ ठाकुर किंवा किशोरी अमोणकरांसारखं गातात?

ही गोष्ट माताजींच्या त्या ठाम मताचे प्रमाण आहे. समर्थ गुरूंचे मार्गदर्शन, शिस्तबद्ध तालीम

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

आणि अथक प्रयत्नच यशस्वी कलाकार निर्माण करतात.

माताजींना जगप्रसिद्ध संगीतकारांमध्येही किती मोठा मान होता हे समजून घेण्यासाठी हा प्रसंग जाणून घेणं महत्त्वाचं आहे.

१९७० च्या दरम्यान त्या काळातील बीटलस् ग्रूपमधील एक जॉर्ज हॅरिसन आणि यहुदी मेन्युहिन भारतात आले होते. त्या दोघांना इंदिराजींनी विचारलं भारतात आपण काय बघणार? तुमची काय सेवा आम्ही करावी? त्यावर यहुदी मेन्युहीन नी कळवलं, ''एक अशक्य गोष्ट आहे पण जर आपण आमच्यासाठी करू शकाल तर फार बरं होईल.'' ''काय बरं?'' इंदिराजींनी विचारलं.

''अन्नपूर्णादेवीचं संगीत ऐकायचं आहे'' मेन्युहीन म्हणाले.

श्रीमती इंदिरा गांधींनी माँ ना विनंती केली. त्यांचा मान राखण्यासाठी अन्नपूर्णादेवींनी कळवलं की मी रियाज़ करत असताना हे संगीताकार येऊ शकतात. येहुदी मेन्युहीनांच्या मातेची तब्येत बिघडल्यामुळे ते तिकडे रवाना झाले पण जॉर्ज हॅरिसन यांना माँ चे सूरबहार वादन ऐकण्याचे सौभाग्य मिळाले.

ही गोष्ट तर सर्वज्ञात आहे की माँ स्वत:च्या शिष्यांना सुद्धा गाऊनच शिकवतात. माँच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचे वादन सूरबहार चे साथीदार सोडून इतर कोणी ऐकू शकत असेल तर केवळ प्रा. ऋषीकुमार पंड्या आणि या कारणासाठी ऋषीकुमार पंड्या स्वत:ला भाग्यवान समजत.

सुप्रसिद्ध सरोदवादक, बाबांचे शिष्य आणि माँचे मोठे बन्धु पद्मविभूषण अली अकबर खान म्हणतात, ''तराजूच्या एका पारड्यात मी, रविशंकर आणि पन्नालाल घोषांना आणि दुसऱ्या पारड्यात माझी भगिनी अन्नपूर्णाला एकटीला टाकलं तरी पण तिचंच पारडं जड होईल.

हे एका महान कलाकाराचे विधान आहे. त्यातून त्यांचाही मोठेपणा, निरभिमानिता आणि महान कलाकाराची कदर करण्याची भावना स्पष्ट होते.

कोणालाही 'मिळवावं' असं वाटणारं मान-सन्मान-प्रतिष्ठा- ऐश्वर्य हे सगळंच कोणत्याही प्रयत्नाशिवाय माँच्या समोर आलं. अतिशय समर्थ लोकही या प्रलोभनांपासून दूर राहू शकत नाहीत. धन-संपत्ती पासून एखादा दूर राहू शकेल पण लोकप्रियता आणि प्रसिद्धी यामध्ये अडकलेला असतो.

हा जीव मात्र अशा कोणत्याच सांसारिक सिद्धींच्या मोहात पडला नाही. ह्या सर्वांहून अलिप्त ! जे समोर येईल त्याला नमस्कार ! परमेश्वराला प्रसाद ग्रहण - पण त्याविषयी जराही आसक्ती नाही. संपूर्ण अनासक्त !

अनेक वर्षांपूर्वी श्री. जतीन भट्टाचार्य, जे बाबा अल्लाउद्दिन खाँचे शिष्य आणि सचीवही होते ते

नंतर अन्नपूर्णादेवींकडे सरोद शिकत होते. एक दिवस माँनी त्यांना जे शिकवलं ते अर्धा पाऊण तास समजावल्यानंतरही जतीनजी सरोदवर वाजवू शकले नाहीत. माँनी सर्व प्रयत्न केल्यानंतरही ती गोष्ट त्यांना सरोदवर वाजवता येईना. माँ रागावल्या. पण हा राग त्यांनी शब्दातून व्यक्त केला नाही. स्वत:च्या हातात जी सतार होती त्याच्या सातही तारा त्यांनी एकदम हातात धरल्या, आणि सातच्या सातही तारा एका झटक्यात तुटल्या. जतीनजींना काय करू आणि काय नको झाले. ते माँ समोर नतमस्तक झाले.

जे सतार शिकतात किंवा वाजवतात त्यांनाही अशक्य गोष्ट ऐकून शंका वाटते. इतक्या तऱ्हतऱ्हेच्या (Thickness and material) धातू जाडीच्या तारा ज्यामध्ये तांब्याच्या, विविध घडणीच्या तारा सतारीला असतात. त्या सगळ्यांना असं एकत्र तोडू शकणं अशक्य खरेच !

एवढी ताकद येते कुठून ? जतीनजीं जवळ ह्याचं उत्तर नव्हते. दुसऱ्या दिवशी त्यांनी प्रयत्न करून पाहिला. खूप ताकद लावली. हात कापला, चिरा पडल्या पण व्यर्थ !

सतार शिकण्याच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नानंतर सांगतो ही गोष्ट अवघडच नव्हे तर अशक्य आहे. हे मी खात्रीपूर्वक सांगतो. माणसाच्या शक्तीच्या पलीकडचं आहे हे. कुठलीतरी अंतरिक शक्तीच हे करू शकते.

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

अनु-रेणूतून या विश्वाचे ज्यांचे क्षणक्षण स्पंदन त्या सर्वांस मम वंदन ।



**माँ अन्नपूर्णादेवी**

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

# अनुभूती

महियर - मध्यरात्रीचा प्रहर. माँ अन्नपूर्णा गुरुवर्य बाबा अल्लाउद्दिन खाँनी शिकवलेला मालकंस सूरबहार वर वाजवत होता. राग हळूहळू त्याच्या परमसीमेकडे प्रगती करत होता. बाबांच्या हवेली समोर एक पिंपळाचं झाड आहे. असं सांगतात की राग जसजसा स्वरूप प्रगट करू लागला तसतसा त्या पिंपळामध्ये शक्तीसंचार होऊ लागला. संपूर्ण वृक्ष सळसळ करीत डोलू लागला. वृक्ष कंप पावू लागला. हा अनुभव त्यावेळी माताजी व त्यावेळी महियर -मध्ये राहात असलेल्या अली अकबर खानांच्या पत्नीला आला. रात्रीच्या शांत एकांतात हे अधिकच स्पष्ट दिसत होते. बाबांना जेव्हा ही गोष्ट समजली तेव्हा त्यांनी माँ ना सांगितले, ''तुझा मालकंस सिद्ध झाला. यापुढे वाजवू नकोस कारण पुढे जाऊन असे अनुभव येतील की भीती वाटू शकेल.'' तेव्हापासून माँ मालकंस वाजवीत नाहीत.

हा प्रसंग सगळ्यांनाच चमत्कार वाटतो. पण आपल्या शास्त्रात चर्चिलेल्या अनुभवाच्या घटना खरोखरच निसर्ग नियमांच्या अधीन आहेत.

आपल्या संगीत शास्त्रांमध्ये रागांच्या परिणामाबद्दल विस्तृत चर्चा झाली आहे. तानसेनांच्या दीप रागाने उत्पन्न झालेली दाहकता आणि तानारीरींनी गायलेल्या मल्हार रागाने या दाहकतेचे शमन हे तर सर्वश्रुतच आहे. असे विशेष अनुभव संगीतसाधकांना झालेले आहेत. या चमत्कारांच्या पाठीशी असतो साधकाचा शुद्ध व पवित्र भाव आणि शास्त्रात सांगितल्याबरहुकूम केलेलं त्यांचं वादन अथवा गायन आणि त्यात साध्य केलेली एकाग्रता आणि लीनता. माताजींनी कोणता चमत्कार करावा म्हणून राग वाजवला नाही तर राग आळवताना आपोआप ही घटना घडली.

काही शास्त्रज्ञ याला स्वरशास्त्रांच्या (Sonology - science of sound) नियमानुसार स्वर-ध्वनी तरंगांच्या लांबीनुसार (frequencies) अनुकंपनामुळे निर्माण होणारा परिणाम मानतात.

जगदीशचंद्र बोस यांनी साऱ्या जगाला सिद्ध करून दाखवलं की वनस्पतींना सुद्धा जीव असतो. हा प्रसंग या सिद्धांताचंप्रमाण आहे.

जसे physics आणि Mataphysics एकत्रित सापडतात, जसे matter मधील spirit प्रकट होते तसेच जड आणि चेतन यांचा हा एकत्रित आविष्कार आहे.

कोण्या समर्पित संगीतकाराने / संगीतसाधकाने तारसप्तकाने उभी केलेली स्वरावली तिच्या परिमाणाने त्या वृक्षामध्ये निर्माण झालेल्या स्पंदनांना वृक्षाचं नर्तन म्हणतात. माँच्या मतानुसार हा माता सरस्वतीच्या स्वर आरतीचा प्रकाश आहे. त्यांनी छेडलेल्या आलापांनी वृक्षाला दिलेल्या उर्जेचा हा प्रतिभाव आहे. हा आहे स्वरपर्ण उत्सव !

मी असं ऐकलं होतं की माँना सरस्वतीच्या किंवा कुठल्याशा दैवी तत्त्वाचा अनुभव आला होता. पण ही गोष्ट मला माँ कडून ऐकायची होती. खूप संकोचत माँ ना मी ही गोष्ट विचारली. अत्यंत सरलतेने त्यांनी सांगितले की पूर्वी एके रात्री एकांतात त्या जेव्हा सूरबहारचा रिवाज करीत होत्या तेव्हा सर्व आसमंत गुलाबाच्या सुगंधाने भरून गेला. हा अत्यंत दैवी सुगंध होता. कोणीतरी स्त्री च्या कंकणांचा आवाज कोणीतरी स्त्री आपल्या साडीचा पदर सारखा करीत असल्यास सारखा अनुभव अनेकदा आला. पण प्रत्यक्ष कुणाचे दर्शन अथवा साक्षात्काराची गोष्ट माताजींनी सांगितली नाही.

त्यांच्या फ्लॅटच्या पॅसेजची सफाई जी बाई करत असे ती ते काम लक्षपूर्वक करीत नसे. एक दिवस बाबांनी स्वप्नात येऊन सांगितले की पॅसेजमध्ये स्वच्छता होत नसल्याने दैवी जीव तेथे येत नाहीत. तेव्हापासून माँ स्वत: काळजीपूर्वक स्वच्छता ठेवतात. असे इतरही अनुभव आले.

माँच्या जीवनात संघर्षकाळ खूपकाळ चालू राहिला. फार मोठा काळ त्यांनी एकांतात आणि परितापात व्यतीत केला. त्या काळातील घटनांच्या आठवणी क्लेशकारक आहेत. मन आणि बुद्धी शांत ठेवून अस्तित्व टिकवणं फार अवघड असतं. फक्त आत्मबलच हे काम करू शकतं. या कठीण काळात तुमचं आत्मबळ टिकवून ठेवणारं कोण? असा प्रश्न मी माताजींना केला होता.

''बाबा आणि ईश्वरावरील श्रद्धा !'' माताजी म्हणाल्या. ''या काळात एके रात्री स्वप्नात येऊन बाबांनी मला श्रीकृष्णांचा मंत्र दिला. त्या दिवसापासून मी शुद्ध भावाने या मंत्राचा जप करते. श्रीकृष्णाचे ध्यान करते. हाच माझा आधार होता.''

यज्ञानाम् जपयज्ञोऽस्मि - यज्ञामध्ये मी जपयज्ञ आहे - गीता

या काळात त्यांचा जपयज्ञ अविरत चालू होता.

सूर साधना एक प्रतीक्षा...



प्रो. ऋषिकुमार पंड्या

ebook by e sahity pratishthan
 www.esahity.com

# “यहाँ खडे खडे ही बात होगी?
# या आप अंदर आने को कहोगी ?

हे चार महिने मी तुमच्याकडे येऊन सतारीचे शिक्षण घेऊ शकणार नाही.’’ प्रा. ऋषीकुमार पंड्या, अलीअकबर खान साहेबांना म्हणाले, ‘‘उन्हाळ्याचे तीन आणि क्रिसमसचा एक महिना सुटी मिळते तेव्हा तुमच्या कॉलेजमध्ये येऊ शकतो पण मी (Indo-American Society) च्या उपक्रमांतर्गत भारतात जाणार आहे. तिथे माझी व्याख्याने आहेत. जो वेळ मी समारीसाठी काढू शकतो तोच नेमका तिथे जाणार आहे. मी काय करू?’’

प्रा. ऋषिकुमार पंड्या १९६६ पासून अलिअकबर खान साहेबांकडून सतार शिकत होते. जेव्हा ते अमेरिकेतून कॅनडामध्ये माँट्रियलला आले त्यानंतरही ते कॅलिफोर्नियातील खानसाहेबांच्या college of music मध्ये वर्षातून तीन महिने सतार शिकत होते. पण १९७३ मध्ये झालेल्या उपर्युक्त चर्चेनुसार इंडो-अमेरिकन सो. द्वारा संचालित सेमिनारसाठी त्यांना भारतात यायचे होते. पण मग सतार शिकण्याचे काय? असा प्रश्न उपस्थित झाला. कोणाही संगीताच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रश्न स्वाभाविकच होता. त्यातून जो अलिअकबरांसारख्या गुरूकडे शिकत असेल, संगीताला जीवनाचे अविभाज्य अंग मानत असेल त्याला तर संगीताची साधना अर्धवट राहून कसं चालेल?

अलिअकबरजी त्वरीत म्हणाले, ‘‘अरे यात चिंता करण्याची बाबच नाही. माझी बहीण मुंबईत राहते ती तुला शिकवेल.’’

‘‘पण त्या माझा शिष्य म्हणून स्वीकार करतील का?’’ ऋषीकुमारांनी विचारले. ‘‘माझं नाव सांग’’ खानसाहेब म्हणाले. ‘‘सांग की मी तुला पाठवलंय.’’

१९७३ च्या भारताच्या दौऱ्यात प्रा. पंड्या मुंबईला आले आणि माँकडे पोचले. त्यांनी दारावरची घंटी वाजवली. दरवाजा उघडण्याची वाट बघत उभे राहिले. दरवाजाबाहेर एक पाटी होती. ते वाचत होते. त्यावर लिहिलं होतं.

१) बेल केवळ तीनच वेळा वाजवावी.

२) जर दरवाजा उघडला नाही तर आपले व्हिसिटिंग कार्ड पत्रपेटीत टाकावे.

३) आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

(आजही ही पाटी तिथे आहे)

दरवाजा अर्धा उघडला. समोर माँ अन्नपूर्णा उभ्या होत्या. प्रा. पंड्यांना त्यांना ओळखायला वेळ लागला नाही. अलीअकबर खाँसाहेबांसारखाच गोल चेहरा.

माँ : हां जी किसका काम है?

प्रा. पंड्या : आपका ही ।

माँ : क्यों ?

प्रा. पंड्या : सीतार सीखनी है।

माँ : मैं तो किसीको सिखाती नहीं ।

प्रा. पंड्या : आपके भाई अलीअकबर खान साहेबने भेजा है।

प्रा. पंड्यांनी त्या काळातल्या प्रमाणे चांगले लांब केस वाढवले होते. आणि अमेरिका कॅनडामधल्या सगळ्या रीतीभाती त्यांनी जोपासल्या होत्या. प्राध्यापक म्हणनू त्यांचा विषयही Assertiveness आणि Art of Communication होता.

प्रा. पंड्या : इथे उभ्या उभ्याच बोलाचं लागेल की आपण मला आत यायला सांगणार आहात?

माँ : या....या....

पंड्या माँच्या घरात गेले. हा त्यांचा माँच्या घरातला पहिला प्रवेश... आणि हा गृहप्रवेश त्यांचा माँच्या जीवनातला प्रवेश ठरणार आहे याची तेव्हा दोघांनाही कल्पना नव्हती.

थोडी प्राथमिक माहिती देऊन झाल्यावर प्रा. पंड्यांनी सांगितलं की, ‘‘वर्षातील उन्हाळ्याचे तीन आणि नाताळचा एक असे चार महिने मी भारतातच राहणार आहे. या काळात आपल्याकडून सतार शिकण्याची इच्छा आहे. खान साहेबांनी सतार शिकवल्यामुळे दुसरं कोणीही भावणार नाही.’’

ebook by e sahity pratishthan

 www.esahity.com

वयाच्या सोळाव्या वर्षापासून प्रा. पंड्यांना सतारीचा शौक होता. अहमदाबादमध्ये राहात असताना आत्माराम बरोटजी प्रा. ऋषीकुमारांबरोबर होते. ते बारोट म्हणजे सुप्रसिद्ध बासरी वादक पन्नालालजी घोष यांचे शिष्य पं. भाईलाल बरोट यांच्याकडून त्यांनी महियर घराण्याचे बाबा, अलीअकबर खाँ साहेब तसेच अन्नपूर्णादेवी यांच्याकडून पुष्कळच ऐकले होते. हेही ऐकले होते की माँ सहजपणे कोणाचाही शिष्य म्हणून स्वीकार करीत नाहीत.

चर्चेदरम्यान प्रा. पंड्यांनी माँ ना हेही सांगितलं की त्यांनी यमन, शिवरंजनी, किरवाणी आणि चंद्रनंदन असे राग खानसाहेबांकडून शिकले आहेत. चंद्रनंदन हा खानसाहेबांनी बनवलेला राग. हा एक वक्र राग आहे आणि वाजवायला अतिशय अवघड आहे.

माताजी म्हणाल्या, ''अच्छा लीजिए सितार और कुछ बजाइए।'' प्रा.पंड्यांनी पहिल्यांदाच माँ समोर वादन केले.

माँ म्हणाल्या, ''ठीक है, यमन की गत उठाइये।'' आणि त्यांनी गाऊन शिकवायला सुरुवात केली.

प्रा. ऋषीकुमार पंड्या माँचे शिष्य बनले.

प्रा. पंड्या सांगतात, ''पहिल्यांदा यमनची गत उचलायला मलाअडीच तास लागले. जोवर ही गत नीट वाजली नाही तोवर माँ समोर बसून होत्या. ऐकत राहिल्या. शिकवत राहिल्या.''

पूर्ण होताच माँ म्हणाल्या, ''बस हो गया आपका सीखना, अब जाइए. सीख लिया ना? अब आनेकी जरूरत नहीं।''

ऋषीकुमार ''ऐसा थोडा चलेगा? शुरु किया है तो खत्म भी तो करना पडेगा नं? मैं तो फिरसे आऊँगा।''

हा होता ऋषीकुमारांचा माँबरोबरचा पहिल्या दिवशीचा पहिला अनुभव.

अशा तऱ्हेने १९७४ ते १९८१ पर्यंत दरवर्षी पंड्या भारतात येत आणि मुंबई असत त्यावेळी माँकडे जात आणि सतार शिकत. अनेकदा माँ दुसऱ्या शिष्यांना शिकवत तेव्हा तिथे बसून राहात. आणि जितके दिवस संगीत विद्येचा लाभ घेता येईल तितका घेत.

या काळात माँ N. C. P. A. मध्ये आठवड्यातून दोन दिवस सतार आणि सरोद शिकवायला जात असत. ऋषीकुमार आणि अंतराम जी- जे अली अकबर खानांचे शिष्य - त्यांना N. C. P. A. मध्ये घेऊन जात असत. तिथे प्रसिद्ध सारंगी वादक पद्मभूषण रामनारायण जी आणि तबलावादक अहमदनान थिरकवाँ साहेब सुद्धा येत असत.

या दिवसांमध्ये माँ ची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. N. C. P. A. द्वारा दिलं जाणारं मानधन आणि महियर मधील बाबांच्या जमिनीचा त्यांना मिळालेला हिस्सा यावर माँ आपला चरितार्थ चालवित. घरी जे शिष्य शिकायला येत त्यांच्याकडून तर माताजींनी तेव्हापासून आजतागायत कधीच फी घेतली नाही. ह्या कठीण परिस्थितीत सुद्धा घरी आलेल्या व्यक्तीला जेवू घातल्याशिवाय सोडत नसत! ते अन्नपूर्णेचं घर आहे !!

जमीन विकून आलेल्या पैशातून अल्लाउद्दिन खाँच्या सर्कलमध्ये कार्यक्रमही केले जात. अशाप्रकारे माँ आत्मनिर्भर आणि स्वाभिमानी आहेत. पैशासाठी त्यांनी कुणापुढेही हात पसरला नाही.

१९८१ मध्ये प्रो. पंड्यांनी भारतात कायमचे राहण्याचा निर्णय घेतला. पूर्वी जेव्हा भारतात येत असत तेव्हाच संगीत होत असे. परंतु आता महिन्यातील पंचवीस दिवस फक्त संगीत करण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली. फक्त पाच दिवस ते अर्थार्जनासाठी जात. आज मात्र ते संगीताशी पूर्ण तल्लीन होऊ शकतील. अनेक भारतीय तसेच बहुराष्ट्रीय कंपन्या, सरकारी कंपन्या, इनकमटॅक्स, पोलीस डिपार्टमेंट सुद्धा त्यांच्या सेमिनारसाठी तारखा घ्यायला येत. ते पाचच दिवस काम करतील हे सर्वांना मात्र होते. वर्ष सहा महिन्यांचा त्यांचा कार्यक्रम पहिल्यापासूनच ठरलेला असायचा.

त्या दिवसात माताजींची तब्येत ठीक नसायची. घराबाहेर पडणे कठीण होते. पण त्यांनी कधी तक्रार केली नाही. त्यांचे असे विचार होते की परमेश्वराने दिलेलं जीवन स्वीकारायचं. आणि गुरुवर पूर्ण निष्ठा ! एकदा ब्लडप्रेशर मुळे त्यांना चक्कर येऊन दृष्टी जाण्याची वेळ आली होती. परंतु ऋषीकुमारांनी त्यांना डॉक्टरकडे नेऊन त्यांच्यावर इलाज केला.

आठ वर्षे त्यांनी माँचं जीवन जवळून पाहिलं होतं. ते त्यांच्यावर खूप प्रभावित झाले होते. कठीण परिस्थितीमध्ये एकटी स्त्री आर्थिक परिस्थिती चांगली नाही. परंतु त्यांची जीवन निष्ठा विलक्षण होती. ठरवलं असतं तर खूप पैसा त्यांनी मिळवला असता. इतकी त्यांना आमंत्रणे येत. तरीसुद्धा त्याकडे त्या लक्ष देत नसत. कोणताही मान-सन्मान किंवा पैशाचं त्यांना आकर्षण नव्हतं. अडिग निश्चयाने अध्यापन कार्य नि:स्वार्थ भावाने करीत राहिल्या.

बाबा अल्लाउद्दिन खाँची संगीत शैली ज्यांनी जतन केली, त्यांच्या ज्ञानाला ओखळलं त्या अन्नपूर्णादेवींच्या प्रतिभेने व शिक्षणप्रणालीने प्रो. पंड्या दिपून गेले होते. खरं तर ऋषिकुमार स्वत: एक शिक्षक, परंतु माँची शिक्षणप्रणाली काही विलक्षण होती. ध्येयाचं मूर्तिमंत स्वरूप ! शिष्यांसाठी माँ तासनतास बसत असत. जसं शिकवलंय तसच यायला हवं हा त्यांचा आग्रह... मग त्यासाठी कितीही वेळ लागला तरी चालेल. त्या कधीही कंटाळत नसत किंवा त्या शिकवण्याचा त्यांना कधी ताणही येत नसे. त्यांचा हा गुण ऋषीभाईंच्या हृदयाला भिडला.

''तुम्ही त्यांच्याशी लग्न करण्याचा निश्चय केव्हा, कसा व कशासाठी केलात? असं वाटतं

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

की तुम्हीच पुढाकार घेतला असेल.''

माझ्या जिज्ञासेला उत्तर देताना ऋषीकुमार म्हणाले, ''मी तर ब्रह्मचारी होतो. अचानक माझ्या मनात विचार आला आणि मी ठरवलं की मी त्यांना विचारीन. पण खूप भीती वाटत होती. कारण आमचं नातं गुरु-शिष्याचं होतं. मनात वाटायचं की माँ ना वाटेल यांनी असा विचार केलाच कसा? आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हेफार मोठं धाडस होतं की त्यांनी जर नकार दिला तर ते त्यांच्याकडे शिष्य म्हणून तरी जाऊ शकतील का? मग मात्र कोणत्याच प्रकारे संबंध राहणार नाही आणि अशा तऱ्हेने संगीत साधना सुद्धा पेचात सापडेल. हे खरोखर साहसच होतं. खूप विचार केल्यानंतर त्यांनी हे धाडस करायचं ठरवलं.

एक दिवस ऋषीकुमारांनी माताजींना लग्नाबद्दल विचारले आणि म्हणाले यानंतरही मी आपला शिष्यच राहीन. एकदम शांता पसरली. ऋषीकुमार वाट पाहू लागले.

ऋषीकुमार सांगतात, ''हा क्षण परीक्षेचा होता. काय उत्तर मिळेल हे कल्पनेच्या पलीकडचं होतं.''

काही क्षणानंतर माताजी म्हणाल्या, ''मी विचार करते.'' त्यांच्या उत्तराने ऋषीकुमारांना थोडी शांती मिळाली. कारण त्या एकदम नाही तरी म्हणाल्या नाहीत. विचार करीन म्हणाल्या आणि रागवल्याही नाहीत.

काही दिवसांनी माताजी म्हणाल्या, ''हे पाहा ! मी आधीच ठेच खाल्लीय. आता पुन्हा ह्याच नात्यात पडताना भीती वाटते की पुन्हा तसेच नाही नं होणार? जर असं झालं तर मी स्वत:ला सावरू शकेन?''

या छोट्याशा वाक्यात त्यांनी केलेला संघर्ष, त्यानंतर त्यांच्या धर्मात त्यांना झालेला त्रास, त्यावर उपाय... सारं काही त्यांनी सांगून टाकलं.

ऋषीभाई माँ ना म्हणाले, ''मी तर तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्राचा शिक्षक आहे. जाणूनबुजून तर मी कधीच आपल्याला दुखवणार नाही. आपल्याला मी कोणतंही दु:ख देणार नाही.तरी पण आपल्याला तसं वाटलं तर जरूर सांगा. मी माझी चूक सुधारेन. कारण अज्ञानात झालेली चूक मला कशी उमजणार?''

''आणखी काही अट घातली त्यांनी?''

ऋषीकुमार, ''मुळीच नाही. इतक्या वर्षांच्या ओळखीनंतर आम्ही परस्परांना ओळखू लागलो होतो. कदाचित त्यांच्या मनातील अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांना स्वयंप्रेरणेने मिळाली होती. पण माझीच एक अट होती.''

''आपली अट?'' मला आश्चर्य वाटलं. कारण जी, गोष्ट बोलायला ऋषीकुमार घाबरतहोते

आणि माताजींचा होकार आल्यावर अट फक्त त्यांचीच असू शकते. ऋषीकुमारांची अट कशी असणार?

ऋषीकुमार म्हणाले, ‘‘छोटी मोठी व्यसनं तर मी सोडून दिली पण मला एक व्यसन होतं... स्वादिष्ट भोजनाचं... मला रुचीभोजनाची आवड...!’’ ‘‘तुम्ही स्वयंपाक करू शकता ना? मी खवय्या आहे!’’

माँनी हसत हसत सांगितलं, ‘‘वीस वर्षापासून एकटी राहण्यामुळे मला स्वयंपाकाची सवय आहे.’’

ऋषीकुमार म्हणाले, ‘‘काही हरकत नाही. तुम्ही केलं नाहीत तर मी करीन स्वयंपाक.’’

माँनी दिलेलं उत्तर फार मार्मिक होतं. ‘‘नाही ! मी करीन स्वयंपाक! मी थोडी रिस्क घेतली. तुम्ही थोडी घ्या.’’

‘‘तुम्ही माझ्या हृदयाची काळजी घ्या. मी तुमच्या पोटाची काळजी घेईन.’’

ह्या छोट्याशा गोष्टीतून दोघांनी गुरु-शिष्य नात्यातून पती-पत्नीच्या नात्यात प्रवेश केला.

८ डिसें. १९८२ मध्ये रजिस्टर लग्न झालं आणि ९ डिसें. १९८२ ला दुपारी आर्य समाजाच्या हिंदू पद्धतीप्रमाणे माँच्या घरी ऋषीभाई आणि अन्नपूर्णादेवी विवाहबद्ध झाले. आज या गोष्टीला तीस वर्षं झाली. त्यांची जीवनयात्रा अतिशय साधी, सरळ, व्यवस्थित आणि प्रेमाने चालू आहे.

लग्नानंतर ऋषीकुमारांनी अन्नपूर्णा माँना विचारलं होतं की, ‘‘मी एक फ्लॅट घेतो तेथे आपण राहूया.’’ परंपरेनुसार स्त्री पतीच्याच घरी राहते. त्या म्हणाल्या, ‘‘इतके वर्षं मी इथं एकटी राहते. अनेक आठवणी आहेतआणि दुसरं इथल्या कबुतरांशी ... ज्यांना मी रोज दाणे घालते... त्यांच्याशी माझं अतूट नातं आहे. म्हणून मला हे घर सोडायचं नाही.’’ आजही माँ आणि ऋषीकुमार याच घरात राहतात.

‘‘इतक्या वर्षांच्या सहवासात माँमध्ये आपण कोणती खास गोष्ट पाहिलीत?’’ मी विचारलं.

ऋषीकुमार म्हणाले, ‘‘जेव्हा त्या शिकवायला बसत तेव्हा त्या दुसरंच व्यक्तिमत्त्व होऊन जातं. शिष्यनात्यानं कोण आहे? जातीनं कोण आहे ? प्रतिष्ठित आहे ? पदाधिकारी आहे? हे त्यांनी कधीच पाहिलं नाही. किती उत्सुक आहे ? संगीतासाठी किती आतून इच्छा आहे? साधनेसाठी तत्पर आहे का ? हेच त्यांचं मोजमाप असायचं?’’

अन्नपूर्णा माँ आणि ऋषीकुमारांचं हे लग्न हेएक आश्चर्यच म्हणावं लागेल. ऋषीकुमार अहमदाबादचे नागर ब्राह्मण आहेत.शिक्षण व नोकरी व्यवसायानिमित्त त्यांचं तरुणपण कॅनडा मध्ये गेलं.

अन्नपूर्णांपेक्षा ते ११ वर्षांनी लहान ! शिवाय शिष्य !

ऋषीभाईंनी शिष्य, साथीदार आणि सेवकाचं नातं निष्ठेने पार पाडलं. माँसारख्या अंतर्मुखी व्यक्तीला सांभाळण्यासाठी ऋषीकुमारच योग्य व्यक्ती आहेत. माँच्या मनातही आधाराची अपेक्षा नव्हती. ऋषीकुमार म्हणतात, ‘‘लग्नाच्या आधी वनंतर सुद्धा दोघांचीही जी मनस्थिती होती तीच राहिली. त्यात काही फरक झाला नाही.’’

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com


चौऱ्यांशी वर्षाच्या वयात मोठ्या आजारानंतरही माताजी आजही तितक्याच स्वावलंबी आहेत. आजही त्या स्वत:चं काम स्वत: व्यवस्थित करतात.

व्यावहारिक जगाच्या दृष्टीनं ते पती-पत्नीच्या नात्यानं जगत असले तरी सुद्धा गुरु-शिष्याच्या भूमिकेवर दोघेही स्थिर आहेत. आश्चर्यआणि प्रेरणा दोन्ही बरोबर आहेत.

हे पती-पत्नीचं नातं विलक्षण आहे. एक विदूषी पत्नी आणि एक समर्थ शिक्षक !

मी या समर्थ शिक्षकाला खूप आज्ञाधारक शिष्यवृत्ती पार पाडताना पाहिलं आहे. या नात्याला समजण्यासाठी प्रत्यक्ष प्रचीतीच घ्यावी लागेल. जे तुम्हाला एका वेगळ्या जगात घेऊन जाईल. विशुद्ध ज्ञानाच्या क्षेत्रात पत्नी गुरूव पती शिष्य असं हे अजब नातं आहे.

समर्थ शिक्षक, सेवक-शिष्य, समर्पित जीवनसाथी



प्रो. ऋषिकुमार पंड्या

ebook by e sahity pratishthan

 www.esahity.com

# देवता पुष्कळ पण माता एकच . . . .

पं. श्री. राजीव तारानाथ हे ८० वर्षांचे बुजुर्ग... अली अकबर खान यांचे ते शिष्य... त्यांच्याबरोबर वार्तालाप करण्याची संधी मिळाली.

आता ते म्हैसूरमध्ये राहतात. पहिल्यांदा फोन केला तेव्हा वाटलं की त्यांची तब्येत ठीक नाहीये. मी ओळख सांगितली आणि फोन करण्याचं कारण सांगितलं. तर ते म्हणाले ''आज नाही. पुन्हा केव्हातरी संध्याकाळी बोलू.'' दोन दिवसांनी मी फोन केला. तर म्हणाले, ''तुम्हाला जे लिहायचंय त्यासाठी तुम्हाला म्हैसूरला यावं लागेल. माझ्या बरोबर राहा. मी जेवीन ते जेवा.''

''माझ्या आईची तब्येत ठीक नाही. म्हणून म्हैसूरला येणं कठीण आहे.'' त्यांना हे सांगून मी त्यांची क्षमा मागितली आणि विनंती केली.'' ''आपल्या सवडीनुसार आपण फोनवरच सांगितलंत तर कृपा होईल.''

''उद्या सकाळी फोन कराल?''

''जरुर ! तुम्ही म्हणाल त्यावेळी फोन करीन.''

''सकाळी साडेसहा वाजता !''

''खूप लवकर नाही नं होणार? आपली तब्येत ठीक नाही?''

''नाही नाही त्याची काळजी तुम्ही करू नका. मी साडेचार वाजता रियाजाला उठतो.''

दुसऱ्या दिवशी सकाळी साडे सहाला मी त्यांना फोन केला. एका वृद्ध व्यक्तीचा आवाज.... ''हाँ. मुलाखत सुरू करा. मी तयार आहे.''

सूर्योदयाला थोडा वेळ होता. खूप थंडी होती. राजीवजींनी सुरुवात केली. खूप विचार करून

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

कोण्या अनुभवी भावसमाधीत विचारांच्या माध्यमातून मन भूतकाळात गेले होते असे वाटले.

१९५६ या वर्षी ते अन्नपूर्णादेवींना कलकत्त्यात भेटले. तेव्हा राजीवजी २२-२३ वर्षांचे होते. ते अली अकबर खाँकडे शिकत असत. त्यांच्या अलीअकबर कॉलेजमध्ये सुद्धा जात असत. तेथे माताजी व्हाइस प्रिन्सिपॉल होत्या. ''माझ्यापेक्षा त्या दोन-तीन वर्षांनी मोठ्या... मी त्यांना दीदी म्हणत असे. पण त्या साक्षात माताच होत्या. कसं ते मी तुम्हाला नंतर सांगेनच.

जेव्हा जेव्हा खानसाहेब प्रवासाला जात तेव्हा मी थोडंफार माताजींकडे शिकत असे. त्या त्यांच्या शिष्यांना शिकवत तेव्हा मी तिथे बसत असे. माझं वय त्यावेळी २५ वर्षे होतं. खान साहेबांकडे मी म्हैसूरहून कलकत्त्याला सरोद शिकायला गेलो होतो. पण बंगालची हवा मला मानवली नाही. तिथे तेव्हा बऱ्याच जणांना 'क्रॉनिक डिसेंट्री' होत असे व मलाही तसंच झालं. दिवसेंदिवस माझी शक्ती ढासळू लागली. गरिबी होती. जवळ पैसे नव्हते. म्हणून डॉक्टरी इलाजही शक्य नव्हता. एका मोठ्या कलाकारानं सल्ला (!?) दिला की, ''तुम्ही पंचवीस वर्षाचे आहात, तुम्ही म्हैसूर कॉलेजातली प्रोफेसरी सोडून इथे आलात. तेथे काय वाईट होतं?'' एकतर पैशाची चणचण त्यात शरीराची साथ नाही. ''असं करा पुन्हा म्हैसूरला निघून जा. केव्हा कलाकार होणार? केव्हा नाव मिळवणार?'' सहानुभूतीपूर्वक ते म्हणाले, ''हे सरोद किती रुपयांना घेतलं? त्याच्या दुप्पट पैसे देतो. त्यातून डॉक्टरी इलाज होईल व पोटालाही पैसे मिळेल.'' तब्येत आणि गरिबी दोन्हींनी मी पुरता गांजलो होतो. मला ते ठीक वाटलं. मी म्हैसूरला जाण्याची तयारी केली. ही गोष्ट दीदींना समजली. त्यांनी मला बोलावलं. त्यावेळी एका इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर खानसाहेब राहात असत. तिथे दीदींची एक खोली होती. त्यांच्या हिंदीमध्ये त्यांच्या पद्धतीने त्या म्हणाल्या, (त्या कधीही कुणाचा एकेरी उल्लेख करीत नसत. सर्वांना 'आप' म्हणून संबोधत) ''तुम्ही कुठेही जाणार नाही. तसा विचारही करू नका. पैशाची काळजी करू नका.'' त्यांनी त्यांच्या फॅमिली डॉक्टरकडे जाऊन माझा इलाज करून घ्यायला सांगितलं. हातात पाच रुपये दिले आणि म्हणाल्या, ''दही खा, औषध घ्या. रियाज करा आणि परत जाण्याची गोष्ट विसरून जा.'' त्यांनी माझी खूप काळजी घेतली. जोपर्यंत बरा होत नाही तोपर्यंत काळजी घेतली. त्यांच्यामुळेच मी आज जिवंत आहे. त्यांनी मला जीवदान दिलय. मी माझ्या आईला २१ व्या वर्षी गमावलं पहा एक गोष्ट सांगतो, ''प्रेम तर सगळेच करतात. पण काळजी घेणारी आईच असते. त्या माझी आई झाल्या. तेव्हापासून माझ्या हृदयात त्यांना मातृस्थान आहे.

त्यानंतर माँ पंडितजींबरोबर मुंबईला आल्या. माझा त्यांचा संपर्क तुटला, पुन्हा ८१-८२ मध्ये संपर्क आला. तेव्हा पुन्हा मी थोडं त्यांच्याकडे शिकलो. तसं तर मी माँचा नाही खानसाहेबांचा शिष्य ! दोघांची पद्धत वेगळी ! रागाच्या स्वरांना कसं आत्मसात करायचं ते माँनी शिकवलं. आलापी शिकवली आणि म्हणाल्या हे धृपद अंग आहे. त्याची शुद्धता सांभाळ. रागाची शुद्धी आणि साफ वाजवायची गोष्ट माझ्या मेंदूत आणि हृदयात त्यांनी स्थिर केली की जी गोष्ट आज माझा सिद्धांत झाली आहे. माताजींनी

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

मला सरोदवर सतारीची धून शिकवली. आणि खास करून म्हणाल्या, ‘‘यामुळे हातात Balance येईल.’’

बाबा अल्लाउद्दिन खानांनी सतार आणि सरोदचे खूप सुंदर मिश्रण केले होते. आणि म्हणूनच या जगाला रविशंकर - अलिअकबरांच्या, सतार-सरोद जुगलबंदीचा लाभ घेता आला.

श्री राजीव तारानाथ M. A. Ph. D. आहेत. इंग्रजी साहित्यात M. A. करून त्यांनी डॉक्टरेट मिळवली आहे. स्वत: दक्षिणी असून अनेक भाषांवर त्यांचे प्रभुत्व आहे. खूप सुंदर उर्दू मिश्रित हिंदी बोलतात आणि म्हणतात, ‘‘बाकीची ओळख राहू दे. पण मी सरोद वाजवतो आणि सरोदचा आजीवन शिष्य आहे हाच माझा मोठा आनंद आहे. माँ, पंडितजी आणि आलीअकबर या त्रिमूर्तींनी माझ्यात कला स्थापित केली आहे. पण साहेब ! विशेषत्वाने सांगीन. देवता अनेक असतात. पण माता एकच असते. आपली रजा घेतो.’’ सूर्योदय झाला आहे... फोनवर थोडावेळ शांतता... मी त्यांना नमस्कार म्हटलं... संवाद पूर्ण झाला... पण त्याचा निनाद मात्र अजूनही कानात गूंजत राहिलाय...

‘‘देवता पुष्कळ असतात. पण माता एकच असते.’’

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# पुढच्या जन्मी हेच गुरू मिळोत...

''त्यावेळी बासरीवादक म्हणून माझं नाव झालं होतं. मोठे मोठे संगीत दिग्दर्शक मला आग्रहपूर्वक बोलवत असत. आणि माझी प्रशंसा करत असत. मला पैसा खूप मिळत असे. पण जेव्हा शास्त्रीय संगीताची गोष्ट निघतअसे त्यावेळी मला एक प्रकारची पोकळी जाणवत असे.'' हे शब्द आहेत सुप्रसिद्ध बासरीवादक पद्मविभूषण पुरस्कृत पं. हरिप्रसाद चौरसियांचे!!

ज्यांनी शास्त्रीय संगीत जगतात आपल्या बासरीच्या माधुर्याने आणि स्वरप्रभावाने विशिष्ट स्थान प्राप्त केलंय, ज्या बासरीनं हरीजींना जगभर नाम-काम आणि पैसा दिलाय, प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचवलंय अशा... बासरीसारख्या सुशीर वाद्यात फूँक मारत त्यांनी साऱ्या जगाला मुग्ध केलाय... त्या हरीजींच्या आयुष्यातल्या ह्या विशिष्ट पोकळीत फुंक कोणी मारली?

तसं पाहायला गेलं तर बासरी या वाद्याला शास्त्रीय वाद्याचं स्थान मिळवून देण्याचं श्रेय बाबांचे शिष्य पं. पन्नालाल घोषांकडे जातं. ज्यांनी खूप मेहनतीने बाबांकडून बासरी शिकली. बासरीवर 'खर्ज' अंगाच्या प्रस्तुतीकरणासाठी वेगवेगळ्या लांबीच्या बासऱ्या त्यांनी बनवल्या आणि बाबांच्या कष्टसाध्य संगीताला जगापुढे रुजू करू शकले. हरीजी सुद्धा पं.पन्नालाल घोषांना महान संगीतज्ज्ञ मानतात.

जेव्हा हरीजी अन्नपूर्णा माँकडे पोचले तेव्हा त्या त्यांना म्हणाल्या, ''तुम्ही तर आत्ता सुद्धा उस्ताद आहात. फिल्ममध्ये इतकं छान वाजवता. तुमच्याकडे वेळ नाहीए. तर आपल्याला माझ्याकडे काय शिकायचंय?'' तेव्हा हरीजी म्हणाले, ''मला शास्त्रीय संगीताची व्यवस्थित तालीम घ्यायची आहे. एक-दीड वर्षांची विनंती आणि सतत संपर्क केल्यानंतर माताजींनी हरीजींना शिष्य म्हणून स्वीकारलं. तेव्हा समजावून सांगितलं की, ''आपल्या घराण्याचं संगीत शिकायचं असेल तर पुन्हा सा, रे, ग, म पासून शिकावं लागेल आणि बाकी सर्व विसरावं लागेल. तरच शुद्ध संगीत शिकू शकाल.'' हरीजींनी त्यासाठी

ebook by e sahity pratishthan


www.esahity.com

पूर्ण तयारी दर्शवली. आधी हरीजी उजव्या बाजूला बासरी वाजवत पण माताजींच्या सांगण्यावरून स्वरशुद्धीसाठी डाव्या बाजूला वाजवायला सांगितली. दुसरी गोष्ट म्हणजे वेळ! त्यावेळी हरीजी फिल्मी संगीत वाजवत व त्यांच्याकडे खूप काम होतं ! माताजी म्हणाल्या, ''पूर्ण वेळ नाहीये तुमच्याकडे. मग तुम्ही खूप रियाज कसा व केव्हा करणार?'' हरीजी आपल्या विचारांवर दृढ होते. ते म्हणाले ''करीन मी ! तुम्ही सांगाल तसेच करेन.''

सुरुवातीला पंधरा दिवसातून एकदा शिकवायला माताजी तयार झाल्या. नंतर सात दिवसांनी व नंतर रोज शिकवायला सुरुवात केली. माताजींनी विचारलं, ''अशा तऱ्हेने रेकॉर्डिंगचे काय करणार?'' ते म्हणाले, ''इथं यायचं असेल तेव्हा रद्द (cancel) करीन.'' माताजींनी असं करण्यास मनाई केली. त्या रात्री काम संपल्यावर हरीजींना बोलावू लागल्या. प्रथम जेवू घालत. ''भुकेल्या पोटी रियाज कसा करणार?'' असं त्या म्हणत. मग शिकवायला सुरुवात करत.

तेव्हाच्या काळी इलेक्ट्रॉनिक तानपुरे नसत. कोणालातरी तानपुरा छेडत बसावं लागे. माताजी स्वत: तानपुरा धरत असत. रात्री उशीरा पर्यंत शिकवत असत. एखादा समर्थ गुरू तसं पाहिलं तर स्वत:च्या मर्जीप्रमाणे शिष्यांना वागवू शकतो. पण शिष्याची अनुकूलता प्रतिकूलता लक्षात घेऊन स्वत:चा कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न साधता ज्ञान देणारे गुरू कोण असतात? अशीच सहा सात वर्ष गेली. माताजी सांगतात, ''हरीजींनी पण खूप मेहनत केली. खूप वेळा हरीजी रात्री इतके उशीरा निघत की शेवटची ट्रेनसुद्धा मिळत नसे. प्लॅटफॉर्मवर बसून दुसऱ्या सकाळी पहिली गाडी पकडून घरी जात.'' आजकालच्या काळात शास्त्रीय संगीत त्याच्या मूळ स्वरूपाला विसरलंय. अशा वेळी योग्य शिष्य मिळत असेल आणि पारंपरिक संगीत मूळ स्वरूपात राहात असेल तर कोणत्याही अन्य अटीशिवाय ते देणाऱ्या मातेचं हृदय कसं असेल?

हरीजी म्हणतात, ''माताजींना भेटण्यापूर्वी जेव्हा वाजवत असे तेव्हा आलाप खूप कमी वाजवायचो आणि तालातली लयकारी जास्त करायचो. माताजींजवळ घेतलेल्या शिक्षणामुळे पहिल्यांदा मला आलापांमध्ये मिळणारी शांती आणि ध्यानावस्था समजली, उमजू लागली. गुरू माँ ना भेटण्यापूर्वी आलाप काय चीज आहे ते मी जाणतच नव्हतो. धृपद अंगाच्या विस्तृत आलापांच्या स्थिरतेचे ज्ञान माँ जवळ मिळालं. दुसरं म्हणजे तंतकारी, तंतुवाद्याचं संगीत प्रस्तुतीतलं महत्त्वाचं अंग- 'जोड' ज्याच्यात लय आहे पण ताल नाही. म्हणजे तबल्याच्या साथीची जरूर नाही पण लीन करणारं 'लय तत्व' आहे. हे माँ मुळे अवगत झालं. माझी संगीताची समज आणि प्रस्तुतीकरण यामध्ये आमूलाग्र बदल झाला. म्हणून कोणताही राग वीस मिनिटांपासून दोन तासांपर्यंत वाजवू शकतो.''

''माताजींनी मला दक्षिणी आणि हिंदुस्तानी संगीताच्या वेगवेगळ्या तालाचं ज्ञान दिलं. त्यांच्याजवळ शिकलं तर कळतं की ज्ञानाच्या त्या 'विशाल सागर' आहेत. त्यांची शिकवण्याची पद्धत

अशी आहे की त्या तुम्हाला एक परिपूर्ण-पक्व संगीतकार बनवतात. त्यांच्याकडे जाण्याआधी मी एक चांगला वादक होतो, त्यांच्याकडे शिकल्यानंतर मी एक समंजस संगीतज्ञ झालो.'' माँ आपल्याला संपूर्ण संगीतकारच बनवतात.

त्यांच्याकडून मिळालेलं ज्ञान मातेच्या दुधासारखं निर्मल, पवित्र आणि पोषक असतं. प्रेम आणि शुद्धतेचं ते जणू प्रतीकच आहे. एकच इच्छा आहे की पुढच्या जन्मी सुद्धा मला माँच गुरू म्हणून लाभूदे ! अजून खूप शिकायचं आहे.

हीच माझी ईश्वर चरणी प्रार्थना !!!

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# इतकं प्रेम कोणासाठी ?

कदाचित माताजी अशाच असतील ! मी तर त्यांना पाहिलं देखील नाही पण त्यांचं दिसणं असंच असेल!

पुण्याच्या मीना सुखटणकर... त्यांच्या घरासमोरून रोज जाणाऱ्या एका स्त्रीला पाहताना त्या विचार करत. त्यांना सतार शिकण्याची खूप इच्छा होती. जेव्हापासून माताजींबद्दल त्यांनी ऐकलं तेव्हापासून मनोमन त्यांनी माताजींनाच गुरू मानलं. ह्या हृदयातील भावनेमुळे त्या स्त्रीमध्ये त्यांना माताजी दिसत असत.

मीनाताई जेव्हा १५-१६ वर्षांच्या होत्या. घरात कोणालाही संगीताचा कान व जाण नव्हती. की कुणी कधी कोण्या गुरुंकडून रीतसर तालीमही घेतली नव्हती. पण तरीही मीनाताईंना संगीताविषयी जबरदस्त ओढ होती. पुण्यात त्यावेळी त्या बाबूमियाँ मिरजकरांकडे सतार शिकल्या. सतार घडवण्याकरता आजही 'मिरज' प्रसिद्ध आहे. बाबूमियाँ सतार घडवता घडवता संगीतज्ज्ञांकडून सतार शिकले आणि शिकवूही लागले. श्री. चंद्रकांत सरदेशमुख सुद्धा पुण्याचे व मिरजकरांकडे शिकत असत. नंतर चंद्रकांतजींनी पंडित रविशंकरांकडे शिकण्यास सुरुवात केली. पुण्यातील सवाई गंधर्व महोत्सवात अली अकबर खानांचं वादन होतं. मीनाताई ऐकायला गेल्या होत्या. योगायोगानं मीनाताईंच्या शेजारी खानसाहेबांचे कुटुंबीय बसले होते. कार्यक्रम सुरू असताना गप्पा-टप्पांचं, ओळखीचं रूपांतर नंतरच्या दिवसात गाढ मैत्रीत झालं. खानसाहेबांच्या पत्नी मीनाताईंना म्हणाल्या, ''मुंबईत कुलाब्याला आमच्याकडे जरूर या.'' हे तर असं झालं की पळण्याची इच्छा असणाऱ्याला उतारच मिळाला. योगानं मीनाताई दुसऱ्या दिवशीच मुंबईत जायच्या होत्या. खानसाहेबांना भेटल्या व नंतर त्यांच्याकडे सतार शिकू लागल्या. थोड्याचं दिवसात खानसाहेब परदेशी जाणार होते. खानसाहेबांच्या पत्नीची इच्छा होती की त्यांचे दोन्ही पुत्र राजेश व दिनेश यांनी संगीतक्षेत्रात पुढे जावे. पण खानसाहेब परदेशी असतील तर मुलांना कोण शिकवणार? म्हणून

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com 

खानसाहेब, पत्नी श्रीमती राजदुलारी यांच्या विनंतीनुसार माँ जवळ विनंती करायला जाणार होते, की त्यांच्या दोन्ही मुलांना शिकवा. मीनाताई त्याचवेळी तिथे होत्या. त्यांनी आपली माताजींकडे शिकण्याची इच्छा बोलून दाखवली. अशाप्रकारे खानसाहेबांच्या सांगण्यावरून मीनाताईंना माताजींच्या घरात प्रवेश मिळाला.

माँ ना त्यांनी जेव्हा पहिल्यांदा पाहिलं तेव्हा त्या म्हणाल्या, ''ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट होती की ज्या स्त्रीकडे पाहून मीनाताई माताजींच्या दिसण्याची कल्पना करीत... माँ अगदी तशाच होत्या.''

''एक महिन्यानी मी पुन्हा मुंबईला गेले. तेव्हा माँ मलबार हिल पावलोवामा मध्ये राहात असत. खूप गप्पा झाल्या पण सतारीबद्दल काहीच नाही. मी सुद्धा भान विसरून राहिले. जेव्हा खानसाहेबांकडे कुलाब्याला गेले तेव्हा त्यांच्या पत्नीनं विचारलं, ''कुछ सिखाया की नहीं? फिरसे कब बुलाया है?'' तेव्हा मी म्हटलं तसं तर काहीच बोलल्या नाहीत. तेव्हा राजदुलारी जी म्हणाल्या ''तुम्हाला त्यांना विचारावं लागेल. पुन्हा जाऊन जरूर विचारून या'' मी पुन्हा गेले. वेळ घेतली आणि सतारीची तालीम सुरू केली.

१९६८-६९ची गोष्ट आहे. अगदी पहिल्यापासून सतार सुरू केली. वर्ष-दीड वर्ष पहिला पल्टा चालू होता. त्यावेळी पं. रविशंकरजी परदेशात गेल्यामुळे चंद्रकांतजी सुद्धा पंडितजींच्या परवानगीने माँकडे शिकत होते. पुण्याहून निघून शनिवारी दुपारी ते माँकडे पोहोचत असत. शनिवारी मी व रविवारी चंद्रकांतजी ! असे शिकत असू. पुण्याला सोमवारी संध्याकाळी परतत असू. मग सोमवारी सकाळी काय करायचं? माताजी म्हणाल्या, ''इथं बसून रियाज करायचा. उगाच मुंबईत कुठं फिरत बसायचं नाही.'' आणि त्यांच्या घरूनच पुण्याला जायला निघायचो. शिष्याचं लक्ष रियाजात राहील, इतर गोष्टींची चटक त्याला लागणार नाही, त्याच्यातील 'शिष्यवृत्ती' कायम राहील याकडे माताजींचं बारकाईनं लक्ष असायचं. दोन दिवस माताजी स्वत: स्वयंपाक करून शिष्यांना जेवू घालत. अशी शिष्य आणि शिष्यवृत्ती दोन्हीचीही जपणूक त्या करत.

त्याकाळी सतार शिकणं खूप व्यवस्थित चालू होतं. अशीच गती आणि तीव्रता रहावी म्हणून मीनाताईंनी मुंबईत राहून जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये इंटिरिअर डिझायनरचा कोर्स पूर्ण केला. मुंबई-पुण्यात इंटिरिअरचा व्यवसायही केला. त्यानंतर पुणे विद्यापीठात जपानी भाषा शिकल्या व शिकवत होत्या. आजही मीनाताई जपानीचे काम करतात.

मीनाताई म्हणतात, ''माताजींचे ते दिवस परीक्षेचे, संघर्षाचे होते. पंडितजी निघून गेले होते. माताजी पावलो मधून आकाशगंगा मध्ये नवीन घरात राहिल्या होत्या. एकट्या होत्या. शिष्यांचं येणं-जाणं पण कमी होतं. त्यामुळे एकांत... एकाकी ! त्यांचे दिवस कसे जात असतील? आम्ही कल्पनाच करू शकत नाही. पण त्यांनी आम्हाला कधीच परत पाठवलं नाही. तब्येत बरी नाही, मन उदास आहे, मूडच नाही असं त्या कधीच म्हणाल्या नाहीत. त्याच उत्साहानं, धैर्यानं आा एकतानतेनं त्यांनी आम्हाला

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

शिकवलं. त्यांच्या शिकवण्यावर दु:खाची छाया कधीच पडू दिली नाही.

१९७० मध्ये माताजींचा पाय मोडला होता. पायाला प्लास्टर घालून त्या अगदी झोपून होत्या. तेव्हासुद्धा झोपून - झोपून माताजींनी आम्हाला तासन्‌तास शिकवले आहे. दुपारी जेवणाला वेळ देत असत नंतर पुन्हा त्यांच्या खोलीत बसून शिकवत असत. आम्हीच थकत असू व आम्हाला वाटत असे माताजींनी लवकर सोडलं तर बरं होईल. पण त्या सोडत नसत. अशा तन्मयतेने शिकवणाऱ्या गुरुची अपेक्षा आम्ही पूर्ण करू शकलो नाही याची जाणीव आम्हाला केव्हा झाली जेव्हा मी एकदा माताजींना विचारलं, ''आपण आम्हाला का शिकवताय?'' उत्तर मिळालं, ''मी मनोरंजनासाठी किंवा प्रदर्शनासाठी शिकवत नाहीये तर मंत्र शिकवल्याप्रमाणे शिकवत आहे. जसा तुम्ही जप करता तसाच या रागांचा पवित्र भावाने रियाज करा. तुमच्या मन:शांतीसाठी करा.''

ज्या व्यक्तीला मन:शांती आणि आत्मानुभूतीची खरी कदर असेल तो बाहेरच्या जगातील नाव, प्रतिष्ठा, पैसा याची पर्वा का करेल? कशासाठी? आणि कोणाला शिकवताना तरी अन्य कोणत्या उद्देशाने का शिकवेल? हा तर प्रेमाने दिलेला 'राग-मंत्र' !

१९८२ ची गोष्ट आहे. मी आणि नंदा सरदेसाई-आम्ही दोघी माताजींकडे शिकायचो. एक दिवस तालीम झाल्यावर माताजींनी आम्हाला सांगितलं, ''आज मला तुमच्याशी जरा बोलायचंय. तर जरा बसा/ थांबा.'' माताजी खूप गंभीर होत्या. त्यांनी ऋषीकुमार पंड्यांशी लग्न करण्याचा निर्णय आम्हाला सांगितला व म्हणाल्या, ''जर का तुम्हाला हा निर्णय खटकला असेल तर माफ करा पण तुमच्या मनात माझी जी प्रतिमा आहे त्याला या गोष्टीमुळे धक्का तर नाही नं लागणार?''

आम्ही दोघींनीही अत्यंत सहजपणे सांगितलं, ''त्यात वाईट काय आहे? आपली काळजी घेणारं कोणीतरी हवंच की ! आपल्यालाही साथीदाराची गरज आहे.'' आजही ही गोष्ट आठवते आणि इतक्या समर्थ असूनही इतक्या विनम्र गुरू ? इतक्या भावनाशील? आम्ही तर त्यांचे फक्त शिष्य. स्वत:च्या आयुष्यातील एवढ्या मोठ्या निर्णयाच्या वेळीही आम्हाला काय वाटेल याचा विचार त्यांनी करावा? गुरूच्या प्रतिमेला त्यांच्या या निर्णयानं काही नुकसान पोचलं असेल तर माफी? -- मस्तक अक्षरश: नत होतं !!!

सामान्यत: अशा वेळी व्यक्ती फक्त स्वत:च्या प्रतिमेचा आणि प्रतिभेचा विचार करते, की माझ्या प्रतिमेचं काय होईल? पण दुसऱ्याच्या मनातील त्यांच्या स्थापित प्रतिमेला धक्का लागला तर त्यांना दु:ख होईल! या भावनेला भाषेच्या व्याकरणात कोणता शब्द आहे! मानवतेपेक्षा सुद्धा कितीतरी तरल, स्वच्छ आणि पारदर्शी भावना आहे ही !!!

मीनाताई म्हणतात, ''दिवाळीच्या दिवसात कधी आम्ही माताजींना नमस्कार करत असू त्यावेळी त्या आम्हाला आवजून भेट देत असत. पण स्वत: काहीच घेत नसत. मला माझ्या आई-वडिलांनीही कधी दिवाळी भेट दिली नाही. हे नातं कोणतं आहे? कसं आहे? कशासाठी इतकं नि:स्वार्थ प्रेम?... अजूनही हे प्रश्न अनुत्तरीतच आहेत !!!

# वनवास ते विद्यावास........

‘‘मी आपल्याला नमस्कार करू का?’’ ज्यांना पाहून आपण आपोआप नतमस्तक होतो त्या माझ्या गुरु माँ अन्नपूर्णादेवी यांच्या प्रथम भेटीत मी हा प्रश्न विचारला. हे शब्द आहेत सरोदवादक श्री. प्रदीप बारोट यांचे. माँ नी त्यांचं अभिवादन सस्मित स्वीकारलं. तो दिवस होता २१ जानेवारी १९७४. माझ्या आयुष्यातील सर्वात भाग्यशाली आणि संस्मरणीय दिवस!

प्रदीपजी १९६८ पासून १९७३ पर्यंत स्व. श्री वसंत राय यांच्याकडे सरोद शिकत असत जे बाबा उल्लाउद्दिन खानांचे शिष्य होते. जेंव्हा वसंतरायजींनी स्थायी स्वरूपात अमेरिकेत जायचा निर्णय घेतला, तेंव्हा त्यांनी माताजींना प्रदीपजींना शिकवण्याची विनंती केली. माताजींनी प्रदीपजींना खूप प्रेमाने शिष्य म्हणून स्वीकारलं. तेंव्हा N.C. P. A. (National Centre for performing Arts) आकाशगंगा वॉर्डनरोडला होतं. तेंव्हा माताजी तिथे शिकवत असत. नंतर N.C. P. A. नरिमन पॉईंटला गेलं. त्यांची तालीम यमन रागाने सुरु झाली. मोठ्या मुष्किलीनं त्यांनी दिलेली चीज मी सरोदवर वाजवण्याचा प्रयत्न केला. यमन इतका विस्तृत होऊ शकतो आणि ह्या रागाचं स्वरगांभीर्य इतकं असू शकतं हे मला तेंव्हा समजलं. हा क्रम चार वर्ष चालला होता. मग भैरवीची अतिविलंबित गत जी मी कधीच ऐकली नव्हती आणि वाजवणं तर अशक्यच वाटत होतं ती त्यांनी खूप धैर्य आणि संयमानं शिकवली. माझ्यासारख्या अपरिपक्क शिष्याला अतिशय समजावून सांगितली. त्यावेळी त्यांनी सांगितलं, ‘‘बाबांची ही खास शैली आहे जी मी आपल्याला शिकवत आहे.’’

हे सगळं पाच वर्ष खूप छान चाललं होतं. मग माझा रियाज़ खूप कमी पडू लागला. रियाजाचा अभाव आणि परिणाम दोन्ही दिसत होतं. माताजींनी कारण विचारलं. मी कोणतंही उत्तर देण्यास असमर्थ होतो.....काय सांगू? कसं सांगू? विचारात पडलो. पण सत्य तर सांगायलाच हवं होतं. मी

ebook by e sahity pratishthan


www.esahity.com

शरमेनं झुकलो आणि कंपित स्वरात म्हणालो, ''माझं लग्न ठरलं आहे.'' संकोच आणि लज्जेमुळे मी सांगू शकलो नाही.

खरं तर माझ्या आई-वडिलांनी ही गोष्ट माताजींना सांगायला हवी होती.

ह्या बातमीनं माताजी खूप नाराज झाल्या. आता पहिल्यासारखं शिकता येणार नाही. खूप अडचणी येतील. माताजी काळजीच्या स्वरात म्हणाल्या, ''मला सांगितलं पण नाहीत? तुम्हाला गुरु-शिष्यांचं नातं माहीत नाही? आता ठरलंय लग्न तर होऊ दे.''

त्यानंतर सात वर्षांत प्रदीपजींची साधना अजिबात झाली नाही. प्रदीपजी म्हणतात, ''ह्या वर्षांमध्ये मला आणि माझ्या आईवडिलांना एक सखोल जाणीव झाली की संगीत साधना काय असते? जीवनात सद्गुरुचं स्थान काय? समर्पण आणि गुरुनिष्ठा कशी असायला हवी? पण आता खूप उशीर झाला होता. अध्ययनाच्या दृष्टीनं सात वर्ष माताजींपासून वंचित राहिलो.

त्या काळात सुरवातीला पत्नीबरोबर आशीर्वाद घ्यायला गेलो. तेंव्हा विचारलं तरी त्या नाराजच होत्या. त्यानंतर प्रदीपजींना तीन मुलं झाली. फिल्म-डिविजन मध्ये सरोद वादक म्हणून रुजु झाले. आकाशवाणीवर उच्चश्रेणी A ग्रेड मिळाली. ते सर्व बातम्या माताजींना सांगत. त्या बरोबरच, ''मी केंव्हा येऊ शिकायला?'' असं विचारत. पण एकच उत्तर मिळत असे, ''मेरा मन नहीं है।'' आणि पत्नी व मुलांची काळजी घ्या असे सांगत असत. ''सिखाया है उसका रियाज करो। अब सरोद कैसे बजेगा? मुष्किल है।'' असं म्हणत असत.

माझं दुर्दैव म्हणा.... किंवा आई-वडिलांची चूक म्हणा.... माताजींना दुखावलं अशी टोचणी लागून राहिली..... मन व्यथित झालं. माताजींकडून बाबांचं संगीत मिळत असे ते आता मिळणार नाही म्हणून निराशा आली. ट्युशन, रेकॉर्डिंग, छोटे मोठे कार्यक्रम करून काळ कंठित असे. माझ्या यशाबद्दल मी माताजींना सांगत असे. त्यांना आनंद होत असे. पण शिकवण्याबद्दल त्या काही बोलत नसत. कधी कधी तर असंही म्हणत की, ''मेरे पास ही क्यों सीखना है? दुसरे और भी तो कलाकार हैं उनसे सीखो।'' या उत्तराने मी खूप दुःखी व्हायचो. पण मला बोलायला जागा नव्हती. काय करणार? कुठे जाणार? त्या वेळच्या प्रसिद्ध सरोद वादक झरीन दारुवाला यांना भेटलो. मोठ्या मुष्किलीनं वेळ घेऊन त्यांच्याकडे सरोद घेऊन गेलो. वाजवायला सांगितलं ऐकलं आणि म्हणाल्या, ''तुमचा हात तर चांगला आहे पण तुम्ही गायकाकडे शिका. मला वेळ नाही.'' ताडदेवला एका स्टुडिओत झरीनजी रेकॉर्डिंग करत होत्या. पुन्हा एकदा प्रयत्न करून त्यांना विचारलं. त्या म्हणाल्या, ''तुम्हाला नाही म्हटलं तरी पुन्हा आलात? तुम्हाला कळत नाही?'' हे संभाषण योगायोगाने श्री. दखिणमोहन टागोरजींनी ऐकलं. ते माताजींजवळ इसराज शिकत असत. त्यांनी माताजींना सांगितलं. माताजींनी एक न दोन! लक्षच दिलं नाही. त्यानंतर झियाउद्दिन डागर साहेबांना भेटलो. माझं वादन

ऐकून ते म्हणाले, ''आपलं रेडिओवर ऐकलं आहे. हात छान आहे. आपणाला चांगलं शिक्षण मिळालं आहे. तुम्ही इथं-तिथं फिरू नका. माताजी तुम्हाला नक्की हो म्हणतील.

ह्या दरम्यान माझे आईवडिल माताजींना भेटले आणि अत्यंत भावविभोर होऊन आई म्हणाली, ''आप नहीं सिखाओगी तो हमें प्रदीप को सरोद छुडवाना पडेगा।'' हे ऐकून माताजी आणखीनच नाराज झाल्या आणि मला म्हणाल्या, ''गुरु की महानता के बारे में आपके माता-पिता को कुछ खबर नहीं है।''

सुधारण्याऐवजी प्रकरण आणखीनच बिघडलं आणि माझी चिंता जशी होती तशीच राहिली.

एक दिवस माताजींची नाराजी पत्करुन सुद्धा त्यांच्या घरात मी तसाच बसून राहिलो...... अत्यंत निराश......काय करू...... काय नको...... काही समजत नव्हतं. माझ्या डोळ्यातून सतत अश्रू वहात होते. श्री ऋषीकुमार पंड्या सुद्धा हे पाहून Disturb / दुःखी झाले. आत जाऊन माताजींना माझी मनस्थिति सांगितली. मला क्षमा करण्याबद्दल विनवणी केली. थोड्याच वेळात माताजी माझ्यासमोर आल्या आणि म्हणाल्या, ''यह क्या लड़कियों की तरह रो रहे हो? मैने तो सिर्फ़ कहा की मेरा मन नहीं है। नां थोडेही कहा? ऐसे रोने से क्या होगा? लड़कियों की जैसी चूडिया पहनो।''

ऋषिजी प्रयत्न करीत होते. माताजी द्रवल्या व अखेर म्हणाल्या, ''ठीक! अच्छा दिन देखकर वापस शुरू करेंगे।''

मी सुद्धा द्रवित झालो. ऋषिकुमारांना आनंद झाला. सात वर्षांच्या वनवासानंतर हा दिवस आला होता!

मी ह्याला पुनर्जन्म मानतो. माझ्या गुरुश्रद्धेचं फळ मानतो.

३० मार्च १९८७ गुढी पाडव्याच्या दिवशी माताजींकडे पुर्नप्रवेश केला. बाबांच्या फोटोला हार घालायला सांगितला. मी घाबरतच माताजींना नमस्कार केला. जणू काही काही झालंच नाही अशा तऱ्हेने माताजींनी शिकवायला सुरवात केली.

माताजी प्रदीपजींना म्हणाल्या, ''अब आप पर विशेष जिम्मेदारी है।'' प्रारंभिक सरोद कसं शिकवलं जातं याबद्दल सांगितलं आणि त्यांच्या नजरेखाली माझ्याकडून सरोद शिकवून घेतलं. त्याचा ट्यूशनला मला उपयोग होईल. मला एक महान मंत्र दिला ''आपकी जरुरतों को बढ़ाना मत। जिससे ज़्यादा ट्यूशन करने पडे। जो भी समय बचेगा वह रियाज़ में लगा देना।'' हा माझ्या जीवनाचा कायमचा मंत्र झाला.

संगीताच्या विद्यार्थ्यांना नेहमीच जिज्ञासा लागून राहिली आहे की अन्नपूर्णाजी कसं शिकवतात? ह्या संदर्भात प्रदीपजी म्हणतात, ''माताजी सर्वांना गाऊन शिकवतात. हे सर्वांना माहीत आहे. धृपद

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

गायकी शैलीनं आलाप, जोड अंग शिकवतात. ज्यामध्ये क्रमानुसार स्वरलगावाबरोबरच, बढत, आंदोलन, गमक आणि कृंतन आहे. छंद, तुकडा, लयकारी, गतकारी आणि तिहाई सर्वांचा समावेश आहे.

प्रदीपजी माताजींना संयम आणि समर्पणाचं श्रेष्ठ उदाहरण मानतात. माताजी एक धडा त्यांच्या शिष्यांना खास करून देतात की धैर्यानी शिकलेल्या रागांना आत्मसात करण्यासाठी खूप दीर्घकाळ रियाज़ करावा लागतो. अशा प्रामाणिक प्रयत्नानं प्रस्तुत केलेला राग तुम्हाला स्वतःला आणि श्रोत्यांना सुद्धा आनंद देईल.

अशा व्यक्तीचं दर्शन आणि त्यांचे आशीर्वाद मिळवण्याची इच्छा खूप साधकांना असते. असे संगीतप्रेमी शिष्य, शिष्यांच्या किंवा अन्य परिचितांकडून एकदा झलक मिळण्याची इच्छा / विनंती माताजींपर्यंत पोहोचवत. तेंव्हा माताजी खूप साधेपणे आणि सरळपणे म्हणत, ''मी काही देवी किंवा भगवान नाही की त्यांच्या दर्शनाची इच्छा, अपेक्षा बाळगावी. पण कोणी प्रेमाने आणि श्रद्धेने असे करत असेल तर त्यांना तसं आश्वासन द्या की या क्षणी तुमचे नमस्कार माताजींना पोचले तुमच्या भावनेप्रमाणे माताजींचा आशीर्वाद मिळाला.'' इतकं स्वचछ सरळ उत्तर कधी कोणाचं मी आजवर पाहिलं नव्हतं.

प्रदीपजी स्वतःची भावना व्यक्त करताना म्हणतात, ''बाबांनी पेटवलेल्या यज्ञकुंडात महियर घराण्याचे शिष्य, साधनारूपी आहूती देतात. हे अविरत आहे. नेहमी या यज्ञाची ज्योत तळपत राहो आणि माझी ही एक समिधा त्यात पडू दे हीच इच्छा!''

# मी बरा आणि माझं सरोद बरं.....

१९७७-७८ च्या आसपास श्री दामोदरलालजी, त्यांच्या १८ वर्षीय पुत्राला घेऊन माताजींकडे आले.

''हा माझा पुत्र वसन्त. ह्याला आपल्या स्वाधीन करतो. संगीतात खूप रस घेतोय. थोडं सरोद पण वाजवतो.''

श्री दामोदरलालजी काब्रा स्वतः सरोदवादक! ते स्वतः उस्ताद अली अकबर खानांचे शिष्य! जोधपूर मध्ये राहणारे! मुलगा वसंतची गोडी पाहून थोडं शिकवलं. वसन्तजी म्हणतात, ''खूप लहान वयात घरात संगीत, वाद्यं, महियर घराणं, बाबा आणि माताजीं बद्दल अत्यंत आदरानं बोललेलं ऐकलं होतं. माताजींबद्दल अत्यंद आदर आणि भक्ती मी माझ्या आईवडिलांमध्ये पाहिली होती. कदाचित माझ्या वडिलांची अंतरिक इच्छा सुद्धा माताजींकडे शिकण्याचीच असेल. पण माँ त्यावेळी सगळ्यांना शिकवत नसत. माँ नी दामोदरालालजींना सांगितले ''तुमच्या मुलाला घेऊन या. ऐकेन.'' म्हणून काब्राजी वसन्तला घेऊन गेले.

माँ नी काही वाजवायला सांगितलं. वसंतजींनी भैरवी वाजवली. त्यांच्या स्वभावाप्रमाणे माँ म्हणाल्या, ''तुम्ही छान वाजवता. भैया (अली अकबर) किंवा तुमच्या वडिलांकडेच का नाही शिकत?'' पण दामोदरजींनी निर्णय घेतला होता. शिकायचं तर माताजींकडेच जायचं. ''नाही नाही माँ! तुम्हीच याला शिकवा. मी वचन देतो की हा Sincere आहे. तुम्ही म्हणाल तसंच तो वागेल.'' दामोदरलालजींनी विनंती केली.

दामोदरलालजींच्या विनंतीवरुन नम्र, मितभाषी आणि अंतर्मुख बनलेल्या वसन्तला माताजींनी शिष्य म्हणून स्वीकारलं. त्यावेळची गोष्ट सांगताना वसंतजी म्हणतात, ''आज या गोष्टीला ३४ वर्षे

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

झाली. त्यावेळी गंडाबंधन विधी होत असे. गुरु जेंव्हा कोणाचा शिष्य म्हणून स्वीकार करायचा त्यावेळी गुरु शिष्याच्या उजव्या मनगटात गंडा बांधत असत. राखीप्रमाणे! गुरुशिष्य एकमेकांशी जबाबदारीच्या बंधनानं बांधले जात. गुरुने सांगितलेल्या मार्गाने जाण्याचं वचन शिष्य देतो आणि गुरुच्या शास्त्राची परंपरा टिकवण्या-वाढवण्याची प्रतिज्ञा करतो. मग गुरु ज्ञान देण्याची जबाबदारी स्वीकारतात.'' व्यवस्थित गणपतीपूजन, सरस्वतीपूजन, गुरुपूजन आणि गंडाबंधन! हा विधी कलकत्यात राहून माँची आई मदीनाबेगम यांच्या हस्ते झाला. कारण बाबांच्या कुलातील वयोवृद्ध, वडिल त्याच होत्या. दादी माँ ने वसन्तजींना आशीर्वाद दिला आणि म्हणाल्या, ''माझी मुलगी तुला खूप चांगलं शिकवेल.''

खूप मायाळू आणि प्रेमळ होत्या त्या. जेंव्हा जेंव्हा मी त्यांना भेटलो तेंव्हा तेंव्हा त्या विचारत की माझी मुलगी नीट शिकवते ना? अन्नपूर्णा माँ सारख्या शिस्तीच्या आणि नेमके पणाच्या भोक्त्या गुरुच्या बाबतीतही अशी विचारणा! इथं असं दिसतं की संपूर्ण गुरुचं कूलच एका परंपरेनं बांधलेलं असते. जबाबदारी पूर्ण करण्याची भावना संपूर्ण कुलात!

माताजींकडे शिकत असताना दीड-दोन वर्षात वसंतजींचे वडिल वारले. खूप कठीण दिवस आले. काय करावं वसन्तजीना समजत नव्हतं. वेगवेगळ्या लोकांनी खूप वेगवेगळे सल्ले दिले. त्यांचं वय फक्त वीस वर्षांचं. खूप मोठं पाठबळ होतं ते म्हणजे माताजींचं आश्वासन, 'आता तर तू माझी जबाबदारी आहेस.'' हे करुण वचन अंधारात प्रकाशाचा किरण होतं.

माताजींनी वसंतला स्वतःचा शिष्य म्हणून स्वीकारलं तेंव्हाच त्यांच्या वडिलांना माताजींनी सांगितलं होतं, ''तुम्ही त्याला फक्त संगीताची तालीम देऊ इच्छिता पण त्याच्या उदरनिर्वाहाची काहीतरी व्यवस्था करायला हवी. जरुर करा. ही संगीतविद्या आहे. तो कलाकार केंव्हा होणार? वाजवणार केंव्हा? आणि जमाना त्याच्या वादनाची कदर करणार केंव्हा? सगळंच अनिश्चित आहे.'' माताजींच्या सांगण्यावरुन दामोदरलालजी पूर्ण कुटुंबासह माताजींकडे आले. वसंतचे आई व भावांनी सुद्धा सांगितलं की वसंतला पूर्ण वेळ संगीत करू दे. आम्ही त्याची काळजी घेऊ.''

संगीताला वाहून घेतलेल्या शिष्यांच्या जीवननिर्वाहाचा माताजींनी नेहमीच विचार केलाय. संगीतावरील प्रेमामुळे उत्साहाच्या भरात संगीत तर होईल पण वास्तवात व्यक्ती लाचार होऊ नये, सांसारिक जबाबदाऱ्यांपासून दूर राहू नये, शिवाय साधनाही थांबू नये.

जेंव्हा वसंतजी जोधपूरहून मुंबईला माताजींकडे यायचे त्यावेळी दुपारी एक वाजता शिक्षण चालू व्हायचं ते रात्री १० पर्यंत चालायचं. माताजी जे शिकवत ते वाजवायचं आणि पक्कं करायचं तेवढ्या वेळात माताजी स्वतःचं काम करून येत. मग पुढचा पाठ दिला जायचा. मुंबईच्या सात आठ दिवसांत चार सहा महिन्यांची बेगमी होईल एवढं शिकवत असतं. तेंव्हा माताजी आठवड्यातून

दोनदा N. C. P. A. मध्ये जात असत. वसंतजींना घरी बसवतं. कोणी नसायचं. रियाज़ चालायचा.

वसंतजी म्हणतात, 'त्या काळी मिळालेल्या शिक्षणाचा आजही रियाज़ केला तर जन्मभर पुरेल तरी पूर्ण / पक्का होईलच असं सांगता नाही येत. आजवर कोणत्याही मैफिलीचं मला समाधान नाही मिळालं. असं मी केंव्हा वाजवणार? ते माताजींनाच ठाऊक!''

वसंतजींनी एक गंमत सांगितली. पिताजींनी आज्ञा केली होती की अन्नपूर्णा माँ जवळ रहायचं तर मौन रहा. त्या जे सांगतील ते कर. काही बोलू नकोस. शिक्षणाच्या वेळी दुपारनंतर थोडी विश्रांती असायची. माताजी चहा-पाणी करत. वसंतजी पिऊन घेत. तीन वर्षांनी अचानक एक दिवस माताजींनी विचारलं की त्यांचा चहा वसंतजींना आवडतो का? त्यावर वसंतजींनी सांगितलं की ते या आधी कधीच चहा पीत नसत पण वडिलांची आज्ञा पाळण्यासाठी ते काही बोलले नाहीत. तेंव्हापासून माताजींनी त्यांच्यासाठी चहा ऐवजी कोकाकोलाची व्यवस्था केली.

वसंतजी अत्यंत मितभाषी आहेत. हे लिहिणाऱ्यांनीही त्यांना फक्त स्वरभाषेत ऐकलंय. शब्द ते खूप कमी बोलतात. माताजी ऋषीकुमारांना म्हणतात, ''याच्याशी बोला आणि याला बोलतं करा हा का इतका कमी बोलतो?''

वसंतजी म्हणतात, ''माताजींनी दिलेल्या संगीतातच मला एवढा आनंद आहे की मला कोणी बोलवो अथवा न बोलवो मी माझ्यात पूर्ण! खूप सुंदर श्लेष करून ते म्हणतात,

''बोलवलं तर बोलायचं नाही तर मी बरा आणि माझं सरोद बरं!!!''

ebook by e sahity pratishthan
 www.esahity.com

# हा तर हिमालय : ज्ञानऋषि......

नित्यानंद हळदीपूर..... बासरीवादक...... सर्वप्रथम ते श्री देवेन्द्र मुरुडेश्वर यांच्याकडे बासरी शिकले. त्यांचे वडिल निरंजन हळदीपूर पं. पन्नालाल घोषांचे शिष्य! आणि देवेन्द्र हे पन्नालाल यांचे जावई!

पं. पन्नालालंची पुत्री श्रीमती शांतीसुधाजीं यांच्याबरोबर खूप वर्षांपूर्वी नित्यानंदजी माताजींना भेटले होते. त्यांच्याकडून येताना शांतीसुधाजींनी नित्यानंदांना सांगितलं ''प्रत्येक साधकाच्या आयुष्यात अशी एक वेळ येते की त्याला पुढचा मार्ग दिसत नाही. दिशा मिळत नाही. जेंव्हा तुझ्या साधनेत असं होईल तेंव्हा तू माताजींकडे जा. त्या आपल्या महियर घराण्याच्या ऋषि आहेत.'' हे बोलताना सुधाजींचा स्वर आदरयुक्त, डोळे भावपूर्ण होत. नित्यानंदांच्या ह्दयात ती गोष्ट तेंव्हापसून जाऊन बसली.

अनेक वर्षं उलटून गेली या गोष्टीला. राजीव तारानाथजी, उस्ताद अली अकबर खानांचे शिष्य माँ ना भेटायला आणि त्यांच्याकडून शिकायला मिळावं म्हणून मुंबईत आले. त्यांचा मुक्काम नित्यानंदांच्या घरी होता. श्री राजीवजी जेंव्हा माँ ना भेटायला जात तेंव्हा खालीच थांबत. कोणत्याही नवीन व्यक्तीला माँ च्या घरी सहज प्रवेश मिळत नसे. असं तीन चार वेळा झालं. तारानाथजी माँ ना भेटायला जात व नित्यानंदजी खालीच थांबत. एकदा नित्यानंदजींनी राजीवजींना माँ च्या भेटीची विनंती केली. तारानाथांची गोष्ट ऐकून माँ नी त्यांना वर बोलावलं. प्रेमानी बोलल्या आणि खाऊ घातलं. नित्यानंदांनी माँ ना शिकवण्याबाबत विनंती केली. सुरवातीला माँ नाही म्हणाल्या, ''आपण तर जाणकार गुरुकडे शिकत आहात.'' त्यावेळी नित्यानंद आकाशवाणीत काम करत होते आणि माँ नी सांगितलं, '' तुम्हाला मी रेडिओवर ऐकलं आहे. तुम्ही चांगलं वाजवता. मी काय शिकवू?''

शांतीसुधाजींचे शब्द आठवून ते म्हणाले, ''आप मुझे शिष्य के रूप में स्वीकारीऐ। मैं किसी व्यक्ती से नहीं संगीत ऋषि के पास सीखना चाहता हूँ।'' पण तेंव्हा माँ नाही म्हणाल्या.

पुन्हा एकदा कधी नित्यानंदजी तारानाथांचा निरोप द्यायला गेले व विचारलं तेव्हा त्या म्हणाल्या, ''थोडा समय दो। सोचके बताऊँगी। तुम्हें सीखने की तमन्ना है। बाबाने कहाँ है की जिसको सच्चे दिल से सीखना हो उसे मना करना पाप है। वैसेही जिसकी योग्यता नहीं उसको सीखाना पाप है।''

नित्यानंदजी पुन्हा दोन दिवसातच माँ समोर उपस्थित झाले.

दरवाजा उघडताच माँ म्हणाल्या, ''अरे आप! दो दिन पहले ही तो आये थे?''

नित्यानंद, '' हाँ जी! आप थोडे दिन बोले इसलिए वापस आ गया!''

माताजींनी नित्यानंदांना शिष्य म्हणून स्वीकारलं पण त्याआधी त्या म्हणाल्या, ''तुम तुम्हारे गुरु श्री देवेन्द्र मुरुडेश्वरजीं की अनुमति लेकर आओ।'' त्यांनी परवानगी घेतली आणि २ औंक्टोबर १९८६ मध्ये दसऱ्याच्या दिवशी माँ कडे शिकायला सुरवात केली.

पहिल्यांदा माँ नी नित्यानंदांना वाजवायला सांगितलं. आणखी काही वाजवलं तर फार पांडित्य दाखवल्यासारखं होईल. म्हणून त्यांनी यमन वाजवायला सुरवात केली. माँ नी सांगितलं जे वाजवायचं असेल ते १५ मिनिटात. नित्यानंदांनी १५ मिनिटात पुरं केलं. माँ म्हणाल्या, ''देखो, तुम प्रोफेशनल आर्टीस्ट हो। तुमने बजाया बराबर। पर राग की पकड़ आते ही समय निकल गया। जब थोडे समय में बजाना हो तो एक से दो मिनट में ही राग छा जाना चाहिए।''

त्यानंतर नित्यानंदांचा यमन सुरु झाला. समोरच्या भिंतीवर दरवाजा दिसू लागला. ''आता पुढं काय? रस्ता तर बंद झाला'' असा विचार करणाऱ्या साधकाला लांब पल्ल्याचा रस्ता दिसू लागला.

नित्यानंद म्हणतात, '' मी या इच्छेनं माँ कडे गेलो होतो की प्रचलित राग तर मी वाजवतोच आहे की, माँ जवळ फक्त अप्रचलित रागच शिकून घेईन. जे दुसरे कलाकार वाजवत नाहीत.'' मला वेगळं काहीतरी करायचं होतं.

यमन शिकून जेंव्हा उठलो तेंव्हा माझा अहंकार पार गळून पडला. बर्फाला तळपत्या सूर्याचं तेज लाभल्यावर त्याचं जसं पाणी होतं तसं! मला असं वाटलं की यमन राग मला माहितच नाहीये. मी एका हिमालयासमोर उभा आहे. ज्याच्या शिखराचं दर्शन माझ्यासारख्या लघु दृष्टीच्या माणसाला कसं होणार? मी रजा घेतली.

माँ च्या घरून खाली आलो. शून्यमनस्क झालो. मनोमंथन सुरू झालं. त्या दिवशी मी तीन निश्चय केले.

१) मी कार्यक्रम करणार नाही.

ebook by e sahity pratishthan


www.esahity.com

२) संगीतासाठी आकाशवाणीची नोकरी सोडून देईन.

३) कोणालाही शिष्य बनवणार नाही. ज्याला स्वतःलाच काही येत नाही तो इतरांना काय देणार? अंध व्यक्ती दुसऱ्यांना मार्ग कसा दाखवणार?

माँ ना ही गोष्ट कळल्यावर त्यांनी नोकरी सोडायला मनाई केली. आणि धैर्यानं साधना करत रहायला सांगितलं आणि पुन्हा हा शिष्य आपल्या मार्गाचा प्रवासी म्हणून चालू लागला.

नित्यानंद म्हणतात, ''माताजींकडे जाण्याआधी रागाचं स्वरूप म्हणजे काय? याचा काही विचारच केला नव्हता. रागाचे आरोह-अवरोह-विशेषकरून वक्र रागात- जोवर समजत नाहीत तोवर रागशुद्धी राहणार नाही. ज्यामुळे रागाचा प्रभाव परिणाम साधू शकणार नाही. स्वरलगाव, शांती देणारा, मुरकी आणि हरकतींविना, विचार, गायकी अंगाचं संगीत माँ कडे शिकलो.

संगीत-नाटक अकादमीचा २०१० चा पुरस्कार नित्यानंदांना मिळाला. संगीत क्षेत्रात भारतात हा सर्वात मानाचा/ प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. याचं संपूर्ण श्रेय नित्यानंदजी माताजींना देतात. ह्याचबरोबर सहारा इंटरनॅशनल अॅवॉर्ड, जदुभट्ट अॅवॉर्ड, कोलकाता 'स्वर-साधना रत्न' यांसारखे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. जेंव्हा Indian Festival फ्रान्स मध्ये झाला तेंव्हा त्यांना निमंत्रण होतं. त्यांनी तिथं वाजवलं.

शास्त्रीय संगीताच्या ज्या जाणकारांनी हरीजींना आणि नित्यानंदजींना ऐकलं असेल त्यांच्या लक्षात आलं असेल की दोघांच्या वादनात किती फरक आहे. सामान्यतः असं होतं की एकाच गुरुकडे एकाच घराण्याचं वादन शिकल्यानंतर शिष्यांमध्ये साम्य आढळतं. पण हे दोघे एकच वाद्य वाजवत असूनही दोघांची शैली वेगवेगळी! माँ नी दोघांना वेगवेगळ्या पद्धतीनं तयार केलंय. गुरु नेहमीच स्वतः शिकलेल्या पद्धतीनं शिष्य तयार करतो. पण उच्च ज्ञान आणि सर्जनात्मकता (सृजनात्मकता) ?? असेल तरच एक गुरु दोन शिष्यांना वेगळ्या पद्धतीनं घडवतो.

नित्यानंदजी माँ नी सांगितलेली एक सुंदर गोष्ट सांगतात, ''रियाज़ एकांतात आणि एकाग्रतेने व्हायला हवा. तुम्ही जेंव्हा अंघोळ करता तेंव्हा शरीराला स्वच्छ करण्यासाठी सर्व बाजूंनी मळ धुवून काढता. ही शुद्धीची प्रक्रीया तुम्ही सगळ्यांसमोर नाही ना करत. रियाज़ हीसुद्धा शुद्धीची प्रक्रीया आहे. अशुद्धी दूर करून शुद्ध रागस्वरूप प्रकट करणे.''

श्री रामकृष्ण परमहंस म्हणत, ''एकांतात जा. प्रभु प्रार्थना करा. संसाराचं वैराग्य आणि ईश्वरप्राप्तीची भावना पक्की होईल.'' माँ म्हणतात, एकांतात जा. रियाज़ करा. रागाला विशुद्धीचं रूप मिळेल.''

# तसं तर मला आठवत नाही.....

तसं तर मला आठवत नाही.......

''साहेब तुम्ही तर कलाकार दिसता. हे कोणतं वाद्य आहे?'' एका टॅक्सीवाल्यानं सुरेश व्यासांना विचारलं.

''हे सरोद आहे. मला वॉर्डन रोडला जायचंय. मी काही कलाकार नाही. सरोदचा विद्यार्थी आहे.''

''वॉर्डन रोड? तिथं माझ्या ओळखीच्या एक भगिनी राहतात'' टॅक्सीवाला म्हणाला. ''त्या खूप ज्ञानी आणि गुरु आहेत.''

''कोण?'' सुरेशजींनी विचारलं.

''अन्नपूर्णादेवी.''

''तू कसं ओळखतोस?'' सुरेश.

''माझं वतन बाँगला. संगीताचा प्रांत! संगीतातच कारकीर्द करायला मुंबईत आलो होतो'' टॅक्सी चालवताना तो सांगू लागला, ''संगीत दिग्दर्शक हेमंत कुमारांनी आश्रय दिला. त्यांच्या मुलीला घेऊन मी माँकडे यायचो. ती त्यांच्याकडे शिकायची. कितीतरी वर्षांपूर्वीची गोष्ट. संगीतात तर काहीच करू शकलो नाही पण मुंबईत टिकणेही कठीण! पोटाचं काय? मी ही गोष्ट अन्नपूर्णा देवींना सांगितली. त्यांनी मला प्रोत्साहन दिलं की मी ड्राइव्हिंग शिकावं. त्यांच्या पैशानं ड्राईव्हिंग शिकलो. पण पुन्हा काय? प्रश्न होताच! त्यांनी मला टॅक्सी परमिट साठी पैसे दिले. टॅक्सी मालकानं ही टॅक्सी मला चालवायला दिली. ज्यामुळे मी पोट भरू शकतोय.''

सुरेश व्यासांनी सांगितलं की ते माताजींकडे शिकतात.

टॅक्सी ड्रायव्हरच्या नजरेत सुरेशजींसाठी 'अहोभाव' दिसू लागला. माँ चं घर आल्यावर टॅक्सी

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

थांबली.

" कितना बिल हुआ?"

"अरे साब! आप तो माँ के विद्यार्थी! आपसे पैसे कैसे ले सकता हूँ?" भावपूर्णतेने टॅक्सी ड्रायव्हर म्हणाला.

सुरेश या विचारातच माँकडे पोचले. माँ ना सगळं सांगितलं. माँ इतकंच म्हणाल्या, "मला तर काही तसं आठवत नाही." एवढीच गोष्ट लक्षात ठेवावी - "नेकी कर और भूल जा!"

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# ह्या तर त्याच.....

अतुल मर्चन्ट. ऋषिभाईंचे विद्यार्थी! एका दुपारी ऋषिभाईंबरोबर वेळ घेतल्यानुसार त्यावेळी पोचले. पण ऋषिकुमारांना भेटायला कोणीतरी आल्यामुळे त्यांना थांबावं लागलं. पुस्तक वाचायला दिलं. हॉलमध्ये बसायला सांगितले. हॉलमध्ये एक बाई केर काढायला आल्या. त्यांनी अतुल यांना बाजूला व्हायला सांगितलं. थोड्या वेळानी पुन्हा त्या बाई फरशी पुसायला आल्या तेंव्हा पुन्हा अतुलना त्यांनी दुसरीकडे बसायला सांगितलं.

प्रो. पंड्यांचं काम झाल्यावर त्यांनी आत बोलावलं. बोलता बोलता अतुल म्हणाले, ''त्या केर काढणाऱ्या बाईंचा आवाज गोड आहे. त्यांना संगीत शिकायला मिळालं तर छान गातील.'' ऋषिकुमार, ''How do you know that she is not trained singer'' अतुल हसले व म्हणाले, ''नाहीतर अशी केर-फरशीची कामं का केली असती?'' ही गोष्ट इथंच थांबली. थोड्या दिवसांनी जेंव्हा अतुल पुन्हा प्रो. पंड्यांना भेटलें तेंव्हा आतून सरोदचा गोड आवाज येत होता. प्रो. पंड्या म्हणाले, ''आत जाऊन ऐका वसन्त काब्रा शिकत आहेत.'' अतुल मर्चन्टांनी हळूच आत प्रवेश केला.

त्या दिवशीच्या त्या केर काढणाऱ्या बाईच गोड गळ्याने काब्रांना शिकवत होत्या.

अतुलभाईंचा चेहरा कसा झाला असेल ते सांगायला नकोच!

अतिशय साधं सरळ..... कोणाला कळणार नाही. असं व्यक्तित्व!..... स्वतःचं काम स्वतः करणार..... कोणाला कळणार पण नाही. पोशाख साधा..... वागणं त्याहूनही साधं.......!

अगदी साध्या व्यक्तिमत्वामागे एक असामान्य व्यक्तिमत्व!

खूप सुंदर वाजलेलं सरोद आणि तेही माँ शिकवत असताना! आश्चर्यचकित अतुलभाई दुसऱ्या दिवशी पुन्हा ऐकायला गेले. अतुलभाई म्हणतात, ''राग बिहाग असेल आणि द्रुत गत वाजत होती.

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

माँ स्वयंपाकघरात काम करत होत्या. आतूनच म्हणाल्या ''निषादाची तरफ उतरली आहे'' वसन्तने पाहिलं तर उतरली होती. लावली. (ज्यांना वाद्य समजत नाही त्यांच्यासाठी सांगावं लागेल की सतार, सरोद, सूरबहार सारख्या वाद्यांत मुख्य तारांच्या खाली अवरोहात लावलेल्या तारांना तरफ म्हणतात. मुख्य स्वर वाजला की खालची तरफ आपोआप आंदोलित होऊन झंकारते.) अशा तारेतला फरक लांबून ऐकून कळणं आणि ते देखील अन्य अनेक प्रकारचे आवाज येत असताना शिवाय दूरून, काम करत असताना कळणं. यासाठी विलक्षण कानच हवा.

अजब कान! आणि अजब ध्यान!

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

# सान्निध्य सुरयोगिनीचं.......

१९८६ चा एप्रिल महिना. मला सांगितलं गेलं, प्रो. पंड्या म्हणून एक जण येतील त्यांची ट्रीटमेंट नीट लक्ष देऊन करा. ते खूप मोठं व्यक्तिमत्व आहे. इंटरनॅशनल कंपन्यांच्या एक्झिक्युटिव्हज् ना ते मॅनेजमेंट शिकवतात. मादन केमिस्ट मध्ये काम करणाऱ्या रमेशनं मला सांगितलं.

मला वाटलं असा माणूस नक्कीच पाश्चात्य पोषाखात येईल. ऋषिभाई जेंव्हा क्लिनिक वर आले तेंव्हा त्यांनी पांढरा पायजमा व भरतकामाचा झब्बा घातला होता. मला वाटलं कुठे कार्यक्रमाला जाऊन आले असतील. प्रत्येक सिटींगला ते ह्या प्रकारच्या पोशाखातच येत असत. आश्चर्य वाटलं. त्यांचं व्यक्तिमत्व खूप साधं सरळ! उन्नत कपाळ, गोरा रंग, हसतमुख चेहरा, पांढरे केस! खूप गोष्टींची माहिती होती! ज्या व्यक्तिचा व्यवसाय मॅनेजमेन्ट, ॲसरटिव्हिटि ट्रेनिंग, नेगोशिएशन, हायप्नोसिस इ. असेल अशा व्यक्तिचा पेहराव मात्र कलाकाराचा! खरोखर आश्चर्य!

थोड्या वेळानं त्यांनी सांगितलं माझ्या पत्नीचं डोळ्याचं / मोतीबिंदूचं ऑपरेशन करायचंय. तुमच्या डॉक्टरांनी डेंटल चेकअप करायला सांगितलंय. संध्याकाळची वेळ हवी.

मला वाटलं यांची पत्नीही अशाच मोठ्या हुद्यावर असणार म्हणून संध्याकाळची appoint-ment अपॉईंटमेंट हवीय. मी विचारलं ‘‘पत्नी काय करतात?’’ ते म्हणाले, ‘‘संगीत शिकवतात.’’ संध्याकाळी जेंव्हा प्रो. पंड्या पत्नीला घेऊन आले त्या अतिशय साध्या दिसणाऱ्या सावळ्या, नजर खाली झुकलेली, गोल चेहरा.....थोडं आश्चर्य वाटलं. पहिला प्रश्न, ‘‘काय त्रास होतोय?’’

‘‘खास काही नाही वर कधीकधी खाल्लेलं अडकतं!’’

त्यांचा स्वर इतका मधुर की असं वाटलं आजवर मी इतका गोड आवाज कधी ऐकलाच नाही. अतिशय शांत स्थिर दृष्टी. चेक अप पूर्ण झाला. प्रिस्क्रिप्शन लिहिण्यासाठी मी जेंव्हा नाव

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

विचारलं ते म्हणाले, ‘‘अन्नपूर्णादेवी’’ मी जिथल्या तिथेच थांबलो.

मी त्यांच्याबद्दल खूप वाचलं होतं. खूप ऐकलं होतं. विचार करू लागलो. बाबा अल्लाउद्दिन खानांची मुलगी आणि पं. रविशंकरांची बायको त्या ह्याच का? की आणखी कोणी? ज्या घराबाहेर पडत नाहीत त्यांचे पाय आज माझ्या क्लिनिकला लागले! खूप धन्य झालो!

ट्रीटमेंट दरम्यान एकदा मी प्रो. पंड्यांना विचारलं की, ‘‘अन्नपूर्णादेवी मला सतार शिकवतील का? तसं तर मी कधी सतार शिकलो नाहीये. तालीम वगैरे घेतली नाही. संगीताची गोडी खूप आहे.’’

लहानपणी भजन वगैरे ऐकत असे. रस्त्याने बासरी विकणाऱ्या माणसाच्या मागे मागे फिरत असे पण ज्ञान नाही. प्रश्न खूपच बालिश होतो. उस्ताद पंडित, साधना करणारे कुठे? आणि मी कुठे?

ऋषिकुमार ‘‘त्यांना विचारतो.’’ काही दिवसांनी एकदा ऋषिकुमार आले आणि म्हणाले, ‘‘त्या हो म्हणाल्या. पण पहिल्यांदा मी शिकवेन. मग पाहू.’’

पंधरवड्यानंतर गुरुपौर्णिमा आहे. तेंव्हा पाहू.’’

‘‘तुमची फी काय?’’

ऋषिकुमार ‘‘तुम्ही किती देऊ शकता?’’

मी म्हणालो, ‘‘दोनशे रुपये’’

‘‘एक गोष्ट सांगतो. माँच्या घरी विद्याप्रदानासाठी कधीच पैसा किंवा सेवा घेतली जात नाही.’’

ऋषिभाई त्यानंतर भार्गव म्युझिक मध्ये मला घेऊन गेले. सतार घेऊन दिली. गुरुपौर्णिमेला मी सतार घेऊन माँ कडे गेलो. दुपारची वेळ होती. आत उजव्या बाजूला माँ बसल्या होत्या. खिडकीतून पहात होत्या. जिथे समुद्र आहे. गुरुपौर्णिमा असल्यामुळे काही लोक आले होते. माँ नी बाबांच्या फोटोला हार घालायला सांगितला. ‘‘बाबांचा आशीर्वाद घ्या’’ मी माँ ना आणि ऋषिकुमारांना नमस्कार केला. माझी सतार त्यांच्यासमोर ठेवली. बोटांनी तारांना स्पर्श केला. थोडा झंकार झाला. अशा तऱ्हेने गुरुपौर्णिमेला संगीताचा पहिला धडा माँ समोर ऋषिकुमारांकडे सुरु झाला.

आज जेंव्हा मागचं आठवतं तेंव्हा वाटतं की माझं आणि माँ चं भेटणं अगदी सहज होतं. तेंव्हापासून आजपर्यंत त्यांच्या महानतेचा भार कधी कोणत्या शिष्याला वाटला असेल असं वाटत नाही. पहिल्या दिवसापासून आजतागायत त्यांच्याबद्दलचा मान, आदर, पूज्यता वाढतच राहिली आहे. त्यांना सखोल ओळखणं अशक्यच आहे. त्यांची व्यावहारिक सरलता, बोलण्यातील साधेपणा, यांचा माझ्या मनावर, हृदयावर सखोल परिणाम झालाय.

‘‘सखोल ज्ञानाचं निरपेक्ष वितरण’’

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

कोणत्याही प्रकारच्या उपकाराची भावना नाही. शिष्य कोणत्याही थराचा असो. त्याला वर आणायचं. शिष्याची प्रकृती, प्रवृत्ती जाणून त्याप्रमाणे त्याला शिक्षण देणार.

त्यांचे कितीतरी प्रसंग आज आठवतात. त्यांना शिकवताना पाहणं हा सुद्धा एक अनुभव आहे. खूप काही शिकलेले, विद्वान पंडितसुद्धा त्यांच्यासमोर शांतपणे, विनम्रपणे बसून रहात. एक एक 'तुकडा' घेऊन त्याचा सूक्ष्मातिसूक्ष्म अर्थ, व्याख्या, interpretation करून त्या स्वरसमूहाला कसं वाजवायचं याचं मार्गदर्शन गाऊनच त्या देतात तेंव्हा आपल्या लक्षात येतं की संगीताची त्यांची जाण किती सूक्ष्म, स्पष्ट, शुद्ध आणि परिपूर्ण आहे. खोली समजणारे ज्ञानी सुद्धा कुठं ठहराव, कुठं मींड, कुठे आंदोलन, कुठे कृंतन, कुठे 'दा', कुठे 'रा' कुठे श्वास, कुठे दम यांचं व्यवस्थित विश्लेषण.

एके दिवशी वसंत काब्रांचं सुंदर सरोद ऐकू येत होतं. ऋषिकुमार म्हणाले आत जाऊन ऐका, पहा हाच तुमचा आजचा धडा. जिथे बसून माँ शिकवत होत्या. त्याच्या मागे डायनिंग टेबलाजवळ मी खुर्चीवर बसलो. माँ ना शिकवताना मी आज प्रथमच पहात होतो. या आधी कधी तसा योग आला नव्हता.

एकच गोष्ट माँच्या मनात जशी आहे तशी येईपर्यंत त्या ती पुन्हा-पुन्हा गाऊन दाखवत. एक पाठ पूर्ण झाला. माँ वळल्या आणि म्हणाल्या, ''तुम्ही केंव्हा आलात?'' खूप मेहनत आहे यात. बाबांनी खूप मेहनतीनं मिळवलं आणि आम्हाला दिलं. तुम्हाला खूप सहज मिळतंय.''

माँ आत गेल्या. वसंतजी वाजवत होते. थोडे वाजवून झाल्यावर थोड्या वेळाने माँ म्हणाल्या, ''काय झालं? स्वर हालतायत? कोणत्या विचारात आहात? मन शांत करा.'' माझ्याकडे पाहून त्या म्हणाल्या, ''जैसा मन वैसा संगीत.''

शिष्याच्या चित्तातील चंचलता त्यांच्या नजरेतून सुटत नसे.

संगीताचे मूळ नियम, रागदारीच्या शास्त्राबरोबर तडजोड करणं माँच्या स्वभावात नव्हतं. कोणतेही Short cuts त्यांना अजिबात पसंत नाहीत. लोकरंजन तर खरंच! पण शुद्धता न सोडता.

साधनेने स्वरांना समजून, उमजून उपयोग करून रागाचं स्वरूप उभं करायचं म्हणजे श्रोत्यांच्या हृदयाला भिडेल. संगीताची शुद्धता, विद्वत्ता आणि मनाच्या शुद्धीचा आग्रह- ज्यामुळे सुंदर आणि पवित्र संगीत निर्माण होईल.

एकदा मी त्यांना विचारलं, ''माँ, तुमची बरोबरी करणारं संगीत आमच्या कल्पनेतच नाहीये. पण तुम्हाला मुग्ध करणारं संगीत तुम्ही ऐकलंय का?''

''बाबा जेंव्हा रात्री एकटेच वाजवत असत तेंव्हाचा अनुभव विलक्षण, पवित्र आणि दिव्य असायचा.''

खूप मोठ्या लोकांचा अहंकार माँ पुढे विलीन व्हायचा...... त्यांच्या अहंकारविरहीत ज्ञानामुळे!

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

कारण स्वतःच्या ज्ञानाची कुंपणापर्यंतच असलेली झेप लक्षात यायची.

संगीताच्या विद्यार्थ्यासाठी महत्त्वाची गोष्ट ही आहे की त्याच्या हृदयात हा भाव पाहिजे की मला येत नाही. मला खूप शिकायचंय. माँ समोर हा भाव आपोआप तयार होतो आणि खात्री पटते की मला आता कुठं जायचं नाहीए. मला माझं ध्येय सापडलंय. इथं मला सर्व मिळालं. कुठंही अडणार नाही. माझे विचार शंका, कुशंका, संशयाचं समाधान माझे गुरु करतील.

माँ अन्नपूर्णांच्या प्रत्येक शिष्याला हा अनुभव असेलच. माँ अन्नपूर्णा अशा गुरु आहेत की ज्या सर्व खजिना लुटायलाच बसल्यात. तुमच्यात जितकी शक्ती असेल तितकं घ्या. अमाप आहे.... अमाप राहिल.

कदाचित तुम्ही थकाल. बाबांनी जीवनभर कष्ट करून अनेक गुरु करून व्यासंग केला. एकाच पात्रात ही ज्ञानगंगा जमवली. त्यांच्या अंतीम अर्काच्या स्वरूपात माँ ना ते मिळालं. ते ज्ञान माँ नी मुक्त हस्तानी वाटलं. ''हीच इच्छा की काहीच इच्छा नाही.''

✻ ✻ ✻

''हे संगीत आत्मसात करणं अवघड आहे. नाही येत. रियाज़ करूनही नाही येत. कसं मिळवणार?'' पूर्ण गोष्ट ऐकून उत्तर एकच, ''आप डूब क्यों नहीं जाते?''

वार्तालापानंतर खोलीतून बाहेर पडताना माझे विचारचक्र सुरु झाले- खरोखर पोहायचं असेल तर बुडायलाच हवं. बाहेरचं जग विसरुन सूरसागरात डुंबायला हवं.

✻ ✻ ✻

माँ नेहमी म्हणतात की जे वाजवाल ते स्वतःशी प्रामाणिक राहून स्वतः खुश होऊन वाजवा. ज्या संगीतानं तुम्ही खुश होणार नाही तर मग जग कसं खुश होईल? मधुर संगीताबरोबरच हृदयात आर्द्रता येऊ दे. हृदयाला भावांनी भरा. डोळ्यातून पाणी येऊ दे. अश्रू वाहणे आणि हृदयस्पर्शी संगीत निर्माण होणे हीच साधनेची पराकाष्ठा आहे. अंतिम गंतव्यापर्यंत पोहोचण्याचं तेच प्रमाण आहे.

माँकडे शिकायला लागलो तेंव्हा सुरवातीला यमन चालला होता. माँ चा स्वरशुद्धीचा आग्रह! मला खूप ओरडायच्या. तुम्ही सुरावर लक्ष ठेवा. एकदा माँ ना विचारलं, ''तुमच्या गाभ्यात गंधार आहे तो माझ्यात कधी उतरणार? कारण मी ज्याला 'ग' म्हणतो तोच वाजवतो. 'त्या' गंधाराची किल्ली कोणती?''

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

माँनी दिलेलं उत्तर कोणत्याही साधकाला उपयोगी पडेल. ‘‘आपण शांतपणे श्रद्धेने करत रहा. माता सरस्वती कधी कोणाची उधारी ठेवत नाही.’’

आपण म्हणालो तरी त्या स्वत: ‘‘मी केलं मी मिळवलं असं कधीच म्हणत नाहीत.’’

त्यांच्याबद्दल मासिकात, पेपरांमध्ये छापून आलेली स्तुती– की जी मोठ्या व्यक्तींनी पूज्य भावानी केलेली– त्यांच्यापर्यंत पोचली तरी त्या म्हणत, ‘‘काय माहीत? मला काही नको! मी इतकी विद्वान आहे? मला लोकांनी ना पाहिलं ना ऐकलं! कसं काय लिहितात?’’

वर्षानुवर्षांच्या त्यांच्या सहवासानंतर मला हळूहळू त्यांच्या जीवनातील संघर्ष आणि सिद्धींच्या गोष्टी कळल्या. अनेक भौतिक सुखं त्यांच्या दाराशी हात जोडून उभी होती. पण त्यांनी सर्वांना परतवलं. अशी त्यांची बुद्धी स्थिर आहे. अशा महान व्यक्तीचं सान्निध्य मला लाभलं. परमेश्वर खूप दयाळू आहे हा अनुभव आल्याशिवाय राहत नाही. त्याचे आभार किती मानू?

प्रो. पंड्यांचा मी आजीवन ऋणी आहे. त्यांच्यामुळे मला हे भाग्य लाभलं. कोणत्याही प्रकारच्या प्रयत्नांशिवाय मला ह्या ‘ज्ञानसिंधू’चं जवळून दर्शन झालं. मी ऋषिभाईंना म्हटलं, ‘‘आपण संगीताची आणि या देशाची खूप सेवा केलीय. प्रेमानं जतन केलंय.’’

ebook by e sahity pratishthan

www.esahity.com

# परमप्राप्तीचे प्रेरक.........

आध्यात्माप्रमाणेच संगीतात साधकांचे चार प्रकार दिसतात. काही व्यक्ती संगीताचा उपयोग फक्त श्रवण आणि मनोरंजनासाठी करतात. दुसऱ्या प्रकारचे लोक जिज्ञासेपोटी शिकतील व फारतर थोडे पैसे त्यावर मिळवतील. तिसरा वर्ग थोडं पुढे गेलेल्या, शिकलेल्या, साधना केलेल्या, यश, प्रसिद्धी मिळवू शकलेल्या पंडितांचा आहे.

चौथा वर्ग मात्र असा आहे की संगीत तत्त्व समजून, उमजून, सर्वकाही प्राप्त होऊन सुद्धा त्यातील 'अध्यात्मिक तत्त्वावर लक्ष केंद्रित करून फक्त परमतत्व शोधणारा.

भारतभूमीमध्ये असे साधक होते! आहेत! कोणी ज्ञात आहेत तर कोणी अज्ञात!

भारतीय संस्कृतीचा पया अध्यात्म आहे. म्हणून कोणतेही शास्त्र विद्या किंवा कर्माच्या मुळाशी ऋषिमुनींनी परमेश्वरच पाहिला आहे. साधकाला कोणत्याही स्वरूपात त्याचं कर्मच येऊन मिळतंच! कर्मदिशेचं मुख जगाच्या समोर राहिलंय. भारतभूमीची परंपरा अशीच जाज्वल्य रत्नांनी आभूषित आहे.

संत कबीरांनी जीवन चादर श्रद्धा आणि ज्ञानाच्या तंतूंनी गुंफून भक्ती रंगात रंगवली. ''जशीच्या तशी धरली'' परमात्म्याला परत केली.

गोरा कुंभारानं घडे घडवताना भक्तीचा घडा घडवला. त्या कुंभानं जगदीश्वराला अभिषेक केला.

तुकाराम आणि मीरेनं स्वतःच्या तानपुऱ्यात 'सोऽहम् सोऽहम्' नाद केला.

नरसिंह मेहतानं हातात करताल घेतले आणि कृष्णाच्या तालावर नाचले. अखिल ब्रह्मांडाला लय तत्त्वं मानलं.

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

बाबा आणि अन्नपूर्णामाँ ‘सूरयोगी’ आहेत. त्यांनी आपल्या जीवनाला सुरांबरोबर जोडलं. योग केला. संगीत साधनेद्वारे परम तत्त्वाला साधलं.

निरपेक्ष भावानी साधना केली. साधनाची जी फलश्रुती आहे ती कोणत्याही आशेशिवाय जगापर्यंत पोहोचवली. भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायात सांगितलंय

‘‘।। असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पुरुषः ।।

अनासक्त भावानं केलेलं कर्म परम तत्वाची प्राप्ती करवून आणतो. संगीत साधनेद्वारा सर्वेश्वराला साधणाऱ्या या दोनही साधकांना महान विभूतींना माझे ‘‘शतशः प्रणाम !!!’’

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

दि. २१ एप्रिल २०१३ रविवाचा दिवस !

'सुरयोगिनीनु सुरोपनिषद्' ह्या पुस्तकाचा लोकार्पण सोहळ्याचा दिवस ! अंधेरीच्या भवन्स् कॉलेज हॉलमध्ये हा कार्यक्रम ठरला ! ज्यांच्यासाठी आणि ज्यांच्या जीवनावर हे पुस्तक लिहिलं गेलं त्या अन्नपूर्णा माँ तर ह्या प्रसंगी उपस्थित राहणार नाहीत हे माहीत असल्यामुळे लोकार्पणापूर्वी त्यांच्या चरणी 'मातार्पण' करण्याचा निश्चय झाला. गुढी पाडव्याचा शुभ दिवस ११ एप्रिल २०१३ गुरुवार हा निवडला गेला.

संध्याकाळी माँच्या घरी आकाशगंगा मध्ये ऋषिभाई आणि नित्यानंदजी यांच्या उपस्थितीत हा विधी पार पडला. प. पू. बाबा अल्लाउद्दिन खाँच्या चरणी पुष्प अर्पण करून माँच्या हातात पुस्तकाची पहिली प्रत दिली. माँनी प्रसन्न मुद्रेने व शांत चित्ताने पुस्तक हातात घेतले. त्यांच्या प्रसन्न हास्याचा फोटो पाहून त्या आश्चर्याने म्हणाल्या, ''हा माझा फोटो आहे का? हा आपल्याला कुठून मिळाला?'' सहज विचारलेल्या या प्रश्नात साश्चर्य आनंद होता. माँनी फोटो पाहिले. फोटोसाठी लिहिल्या गेले की काव्यपंक्ति मी त्यांना वाचून दाखवली. माँनी लक्षपूर्वक ऐकली.

ऋषींजी आणि नित्यानंदजी बाहेर डायनिंग टेबल वर बसले. ऋषिजी एकाग्रतेने पुस्तकाचे पान-न्-पान न्याहाळत / पाहात होते. केवळ साडे तीन महिन्यांच्या कालावधीत आकाराला आलेल्या ह्या पुस्तकाचे ऋषीजी आणि नित्यानंदजी साक्षी होते. कोणत्याही पूर्वसंकल्पाशिवाय छोट्या लेखांनी पुस्तकाचं रूप धारण केलं.

ऋषीजी म्हणाले, ''खरंच ! खूप छान काम झालंय.'' प्रसन्नपणे त्यांनी प्रशंसा पुष्पे उधळली. ''खूप सुंदर झालंय आणखी काय बोलू?'' ह्या छोट्या शब्दांमध्ये नित्यानंदजीचे सारे भाव उमटले होते.

रात्री घरी आल्यावर पुस्तक मी माझ्या मातोश्रींच्या चरणीसुद्धा अर्पण केले.

दिनांक बाराची रात्र आणि १३ ची पहाट यांच्यामध्ये ऋषीजी... माँच्या समर्पित साथीदारानं माँची साथ सोडली... अंतिम क्षणापर्यंत माँची सेवा करणाऱ्या ऋषीजींचा हात तेव्हाही माँच्या हातात होता. पहाटे तीनच्या सुमारास त्यांनी मान टाकली. ''क्या मैं अंदर आ सकता हूँ?'' हा प्रश्न विचारत माँच्या जीवनात प्रवेश करणारे ऋषीजी ''क्या मैं विदा ले सकता हूँ?'' हा प्रश्न न विचारताच अचानकपणे जीवनप्रवास थांबवून निघून गेले... पंचतत्वात विलीन झाले.

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com

पं. ऋषीकुमार पंड्या अतिशय प्रतिभावान, खूप संयमी व्यक्तिमत्त्व, चेहऱ्यावर नेहमीच स्मित! कामामध्ये चैतन्य, सहृदयी आणि अतिशय प्रेमळ !! खूप मान सन्मान मिळवलेलं व्यक्तिमत्त्व !!

माझ्या आयुष्यात पेशंट म्हणून आले आणि पुढे कायम गुरुस्थानी राहिले.

ह्या पुस्तकाचा ते आधारस्तंभ होते. माझ्या आणि माँच्या मधला एक अदृश्य सेतू होते. जे लिहायचो ते त्यांना वाचून दाखवायचो. त्यांच्या सूचना, समर्थन, मार्गदर्शन मिळायचं. पू. माताजी ज्या स्वप्रशंसा आणि प्रसिद्धी पासून कोसो दूर आहेत त्यांनी ऋषींजीसाठी व त्यांच्यामुळेच ह्या पुस्तक प्रकाशनाला नकार नाही दिला ! ऋषीजी आणि नित्यानंदजींनी पुस्तकाचा आंतर प्रवाह आणि भाव माताजींपुढे ठेवला आणि माताजी, बाबा यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या जीवन चरित्राचा प्रसाद 'सर्वग्राही' होऊ शकला/झाला.

ऋषीजी म्हणजे जगाचा व्यवहार आणि वर्तनाला समजून उमजून वैज्ञानिक दृष्टिकोनातून त्याला पार कसं करायचं हे जाणणारे, समजणारे कर्मयोगी !

आणि माताजी म्हणजे संगीताच्या गाभाऱ्यात नेऊन, स्थिर करून, शांतीच्या प्रदेशात विहार करणारी वैराग्यपूर्ण ध्यानयोगी !

ही जोडी वर वर पाहता भिन्न स्वभावाची ! पण ह्या दोघांमध्ये एक अद्वितीय प्रेम - जे शब्दबद्ध करणं माझ्यासारख्या सामान्य बुद्धीच्या व्यक्तीच्या क्षमते पलीकडचं आहे !!!

ज्याचं वर्णनच करता येणार नाही अशी उज्ज्वल उदारता आणि अतूट ज्ञान तृष्णा हे ऋषीजींचे गुण खरोखरच वाखाणण्यासारखे !

लोकापर्ण सोहळ्याच्या आधीचं त्यांनी जगाचा निरोप घेणं माझ्या मनाला कायमचं दु:ख देत राहीलं. परंतु त्यांचा दिव्य आत्मा या लेखनाला जरूर आशीर्वाद देत राहील याबद्दल खात्रीच आहे. संतोषाची गोष्ट इतकीच की गुढी पाडव्याच्या पवित्र दिवशी त्यांच्या हाता पहिली प्रत पडली होतीच !

जर त्या परम कृपाळू परमात्म्याने ही कृपा केलीच नसती तर?

ह्या पुस्तकाचे मराठी भाषांतर होत आहे याचा मला खूप आनंद आहे. ह्या रचनेसाठी एकमेव प्रेरणा व उद्देश हा की अन्नपूर्णा माँ आणि बाबा अल्लाउद्दिन खाँचे उदात्त चरित्र, प्रेरक जीवन, त्यागमय तपश्चर्या लोकांपर्यंत पोहचावी.

पवित्रता, त्याग आणि शांतीचा प्रसाद प्रत्येकाला मिळो !

अनुवादक सौ. ऊर्मिला आपटे यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. त्यांना प्रकाशनात साथ देणाऱ्या सौ. चेतना गोसावी यांचे खूप खूप आभार !

परमात्मा - प. पू. बाबा व पूज्या श्रीमती अन्नपूर्णांच्या चरणी सादर समर्पण !!

**सुनील शास्त्री**

ebook by e sahity pratishthan
www.esahity.com